पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी
# द पीपल्स पोस्ट
स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ अंक १४ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ मार्च २०२३

# अभूतपूर्व 'लाँग मार्च'



पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक १४ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ मार्च २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट   8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाइन पमटसाठा यथ स्कन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** भूमिपुत्रांना कोण एक बायको देईल का बायको… ३ / **रेशीम आणि किडे :** अर्थसंकल्प की घोषणापत्र? – **संजय पवार** – ५ / पेंढारी, कंत्राटदारांना पोसणारा, निसर्ग आणि श्रमजनविरोधी ‘खर्च संकल्प’ – **प्रा. एच.एम.देसरडा** – ७ / जो जे वांछील – **श्रीनिवास खांदेवाले** – ९ / स्वातंत्र्याचा अर्थ – **बी.जी. वाघ** – ११ / आधुनिक पाश्चात्य विचारसरणी आणि मानवी हक्क संकल्पनेचा विकास – **प्रा. नागार्जुन वाडेकर** – १४ / भारतीय पत्रकारितेतील पहिले स्टिंग ऑपरेशन घडवून आणणारे : गोपाळराव जोशी – **कामिल पारखे** – १८ / **कव्हर स्टोरी :** अभूतपूर्व ‘लाँग मार्च’ – **प्राचार्य सलतान राठोड** – २० / महाडचा मुक्तीसंग्राम – **बी.व्ही. जोंधळे** – २७ / एन.पी.एस. ही पेन्शन नाही, कर्मचाऱ्यांची आर्थिक लूट – **अस्मिता प्रशांत** – ३० / **व्यक्तिविशेष :** विवंचनेच्या वणव्यातच मनोहर झाले यशवंत – **डॉ. प्रकाश राठोड** – ३१ / **ग्रंथ परिचय :** ‘‘एक धांडोळा; सुसंवादी तनामनासाठी केलेला’’ – **एकनाथ बागूल** – ३३ / **कोणता भारत.. :** ३५ – तुरुंग भरलेत? काळजी नको, आता गुन्हेगार पाठवा नरकात । ऐकलंत का? चला, चला तिकडं हिंदू राष्ट्र जन्माला आलंय… । स्त्री शक्तीच्या नावानं चांगभले चांगभले… – **तात्या विंचू** **कविता :** मनोहरा! – **विक्रम जाधव** । आम्ही डोंगरासाठी लढतो तेव्हा.. – **प्रभू राजगडकर** । ऊर्जेचे वेल्हाळ – **प्रज्ञाधर ढवळे.**

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# भूमिपुत्रांना कोण एक बायको देईल का बायको...

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी कर्नाटकात निघालेली अविवाहित तरुणांची पदयात्रा पाहिली असती, तर त्यांनी आपल्या 'नटसम्राट' या प्रसिद्ध नाटकातील पुढील स्वगत बदलले असते आणि त्यात या पदयात्रींसाठी घराऐवजी बायको, पत्नी, अर्धांगिनी असा शब्द वापरला असता. त्यांच्या मूळ संवादातील हा काही अंश...

**कुणी, घर देता का रे घर?**
**एका तुफानाला कुणी घर देता का**
**माणसाच्या मायेवाचून**
**देवाच्या दयेवाचून**
**डोंगरा-डोंगरात हिंडत आहे**
**जिथून कुणी उठवणार नाही**
**अशी जागा ढुंढत आहे**
**कुणी घर देता का रे घर?**

**तुफानाला महाल नको**
**राजवाड्याचा सेट नको**
**पदवी नको, हार नको**
**थैलीमधली भेट नको**
**एक हवं लहान घर..**
**पंख मिटून पडण्यासाठी**
**एक हवी आराम खुर्ची**
**तुफानाला बसण्यासाठी**
**एक तुळशी वृंदावन हवंय**
**मागच्या अंगणात.. सरकारांसाठी**
**कुणी घर देता का रे घर?**

घराच्या शोधात असलेल्या तुफानाचे आर्त बोल ऐकून माणूस हेलावून जातो. पण घर काही मिळत नाही. थाटबाट नसलेलं, नुसता आडोसा देणारं घर हे वादळ मागतं आहे आणि स्वतःची अवस्था सांगताना म्हणत आहे, की

**तुफान आता थकून गेलंय**
**झाडाझुडपात, डोंगरदऱ्यांत**
**अर्ध-अधिक तुटून गेलंय**



छायाचित्र बीबीसी मराठीच्या सौजन्याने

**समुद्राच्या लाटांवरती**
**वणव्याच्या जाळावरती**
**झेप झुंज घेऊन घेऊन**
**तुफान आता थकलंय...**

नटसम्राटमधील नटाची जी आर्त अवस्था झाली होती, ती तशीच आता आपल्या देशातील अनेक भूमिपुत्रांची, देशाला जगवणाऱ्या बळीराजांच्या पुत्रांची झालीय. या पुत्रांशी लग्न करायला कुणी मुली तयार नाहीत. त्यांना मातीत खेळणारा नवरा नकोय, तर पंख्याखाली लोळणारा नवरा हवाय. त्यांना बांधांच्या मध्ये जगायचं नाही, तर मॉलमध्ये खेळायचं, त्यांना चिखल नाही तुडवायचा, तर नट्यांच्या गालासारखे सुंदर चकचकीत रस्ते तुडवायचे, त्यांना डोक्यावर जेवण घेऊन मळ्यामध्ये जायचं नाही, तर ऑनलाईन जेवण मागायचं किंवा हॉटेलच्या दारात अल्सिशयन कुत्र्यांप्रमाणे वेटिंगमध्ये बसायचं, कुणाशी लग्न करायचं आणि कुणाशी नाही याचं स्वातंत्र्य त्यांना आहे. त्याचा आदर करायला हवा. त्याच वेळी लग्नासाठी कोणी मिळत नाही म्हणून पदयात्रा काढणाऱ्या, मोर्चा काढणाऱ्यांचाही विचार करायला हवा; पण कोण करणार?

आपल्या थोर संस्कृतीत उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असं सूत्र मांडलेलं आहे. शहरीकरण, जागतिकीकरण, स्पर्धा यांच्या ओघात ते उलटं झालंय. म्हणजे उत्तम नोकरी आणि कनिष्ठ शेती असं झालंय. साऱ्या मुलींनाही नोकरी करायची आहे आणि शहरातच म्हणजे विकास केंद्रात नोकरीवाला नवराच करायचा आहे. खेड्यात आणि शेतीत तिला जगायचं नाहीय. शेतीशी नाळ जोडलेल्या तरुणांना शेतीतच मातीशी इमान ठेऊन जगायचं आहे,

तर काहींना नोकरी मिळत नाहीय म्हणून गावाकडं चल, गावातच रहा असं म्हणत शेतावर जायचं आहे. त्याची शेती कितीही समृद्ध असली, कितीही उत्पन्न मिळत असलं तरी त्याच्याशी लग्न करायला मुली पुढं येत नाहीत. त्यांच्या दृष्टीनं जीवन सुंदर करण्याचा मार्ग फक्त आणि फक्त शहरातून जातो, नोकरीतून जातो. शेतातून जात नाही. शेती म्हणजे माती, धूळ, चिखल, जमिनीवरच्या भेगा, झोपडे, पालापाचोळा... कशासाठी तिथं रहायचं? हा प्रश्न मुलींच्या मनात. तो एका अर्थानं बरोबरही ठरतो. पण विकासाच्या केंद्राची तुलना चुकीची ठरवतो. या साऱ्या धामधुमीत संसार नवऱ्याशी करायचा, मातीशी करायचा, नोकरीशी करायचा, की झगमगत्या शहराशी करायचा, हा प्रश्न भिंतीला पाल चिकटावी तसा चिकटूनच राहतो. फेविकॉल लावून पाल चिकटावी तसा तो चिकटलाय. हलायलाच तयार नाही. त्यातून शेतकरी नवरा नको गं बाई, गावची शिव नको गं बाई, गावाची पांद नको गं बाई, धूळ उडवणारी खिलारी जोडी किंवा धूर ओकणारा ट्रॅक्टर नको गं बाई, यांसारख्या गोष्टी तयार झाल्या. शेतकरी होण्यात तरुणांची चूक नाही आणि त्याला नाकारण्यात मुलींची चूक नाही. दोघेही आपापल्या पातळीवर ठीक वाटतात. पण या बिनलग्नाच्या मुलांचं करायचं काय, हा प्रश्न लटकतच राहतो.

आपल्याला नाकारणाऱ्या व्यवस्थेचं लक्ष वेधून घेण्यासाठी काही मुलांनी आंदोलने, निवेदने, पदयात्रा, नवस यांसारखे मार्ग पकडले. समाजाला आवाहन केलं आणि आपल्या लग्नाचा विषय मांडला. ब्रह्मचारी म्हणून आम्ही किती जगायचं, वय वाढल्यानं आम्हीही निब्बर होतो आहोत. आमचीही मुलाबाळांची, संसाराची स्वप्नं आहेत. हे असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक पोरांना अनेक पोरींनी सहजपणे नाकारलं आहे. शेतकरी नवरा नको, असं स्पष्ट सांगितलं आहे. नवरा विनाअनुदानावरचा मास्तर, शिपाई कोणीही चालेल. हॉटेलमध्ये टेबल पुसणारा वेटर चालेल, हमाल चालेल, वॉचमन चालेल. पण शेतकरी नवरा नको गं बाई, असा अनेक मुलींचा संकल्प आहे. या संकल्पामुळे गावाकडची अनेक चांगली पोरं बिनलग्नाची राहू लागली आहेत. असं कसं तरी समाजचक्र फिरेल आणि अविवाहितांची गर्दी वाढेल असं कोणत्या पंचांगात दिसलं नसणार. पण ते आता प्रत्यक्ष घडताना आपण पाहतो आहोत. पोरांच्या प्रश्नाचं उत्तर ना समाजाकडे आहे, ना सरकारकडे आहे. प्रश्न खूपच चिघळला तर कुणीतरी दिल्लीतील पुढारी बिनलग्नासाठीचा भत्ता म्हणून पोरांच्या खात्यावर काही रक्कम जमा करेल, त्यांची मते पळवेल. देशातील काही भागात आजही मुलगी नको, अशी भावना असलेले खूप लोक आहेत. अशा ठिकाणी मुलींची संख्या कमी म्हणून अनेक पोरं बिनलग्नाची फिरतात, तर जेथे मुलींचं प्रमाण बऱ्यापैकी आहे तेथे शेतकरी नवरा नको आहे. एकूण काय, तर बिनलग्नाच्या पोरांची संख्या वाढते आहे. शहरात शिकली सवरलेली पोरं आणि पोरी लग्न लांबणीवर टाकतात. जगण्यासाठी सुरक्षितता नाही, नोकरीची गॅरन्टी-वॉरन्टी नाही, हे त्यामागचं कारण. दुसरं म्हणजे कोणत्याही जबाबदारीत काही पोरांना अडकायचं नाही. मुलाबाळात अडकायचं नाही. काही जण अविवाहित राहून जे काही सुख मिळवायचं ते मिळवताहेत. नवी भांडवलशाही कुटुंब आणि विवाहसंस्थेची कशी वाट लावते, हे आपण अनुभवत आहोत. हे असेच चालू राहणार असल्याने थोड्याच दिवसांत कमी लोकसंख्येचा देश ही बिरूदावली आपण प्राप्त करू याविषयी शंका बाळगण्याचे काही कारण नाही. लग्न नको, मुले नको या भूमिकेतून दुसरं काही घडण्याची शक्यता नाही.

लग्नासाठी मुली मिळाव्यात यासाठी शेतकरी पुत्रांनी सोलापुरात गेल्या वर्षी मोर्चा काढला होता. या मोर्चामध्ये सोलापुरात नवरदेवाचा वेश परिधान करून घोड्यावर बसलेले, वरातीतून निघालेले दोन-तीन डझन नवरे सहभागी झाले होते. कोणी एक बायको देता का बायको, कोणी किसानपुत्रांशी लग्न करता का लग्न... हीच अपेक्षा ते व्यक्त करत होते, साद घालत होते. आमचं काय चुकलं, असा प्रश्न विचारत होते. प्रश्न जन्माला आले आणि शहरातल्या गर्दीत मरून गेले. कोणी त्यांच्याविषयी स्पीडब्रेकरजवळ थांबून श्रद्धांजली वाहिली नाही किंवा या अपेक्षांच्या मरणाची बातमी कोणा पेपरातही आली नाही. सोलापुरात काही घडलं नाही. निदान आमच्याकडे तरी घडेल, या भावनेनं सोलापूरच्या सीमेवर असलेल्या मंड्या जिल्ह्यात सुमारे शंभरेक किसानपुत्रांनी पदयात्रा काढली. मंड्यापासून १२० किलोमीटरवर असलेल्या एका मंदिरात ती पोहोचली. आमचं लग्न होवो असा नवस या भावी नवऱ्यांनी किंवा पोरी मिळत नाहीत म्हणून अविवाहित जीवन जगणाऱ्यांनी केला. त्यांनी आपल्या पदयात्रेला 'ब्रह्मचाऱ्यांची पदयात्रा' असं नाव दिलं होतं. या पोरांचे प्रश्न थोडे वेगळे आहेत. तेथे मुलींची संख्या आणि शेतीतलं उत्पन्न घटलंय. दरिद्री पोराशी आपल्या पोरीची गाठ मारावी, असं पोरीच्या बापाला वाटत नसावं. पोरीलाही तसं वाटल्यास त्यात नवल वाटण्याचं काही कारण नाही. ज्या पोरी पोरांप्रमाणेच गरीब आहेत, त्यांना शहरातला नोकरीवाला नवरा हवाय. त्यांच्या शोधात त्या आहेत आणि पोरं जी हताश आहेत, ती पोरींच्या शोधात आहेत. यापैकी काहींना अनेक पोरींनी नाकारलंय, काहींचं लग्नाचं वय खूप पुढं सरकलंय, काहींच्याकडे प्रेमात पडून पोरी कटवण्याची क्षमता राहिलेली नाही. १२० किलोमीटर चालत जाणं तसं काही सोपं नाही. एका अर्थानं समाजासमोर आत्मक्लेश करून घेण्याचा हा प्रकार आहे. पण तो पाहून कोणाला पाझर फुटणार की नाही, हा प्रश्न गुलदस्त्यातच आहे. देवाकडे नुसती प्रार्थना करून काय होणार? अजून कोणत्या देवाने वधू-वर सूचक मंडळ काढलेलं नाही. पुजाऱ्यांनी काढलं असेल; पण त्यातही कोणाला शेतकरी नवरा नको आहे. एक मोठा सामाजिक पेच तयार झाला आहे. गरिबांच्या लग्नासाठी पैसे वाटणाऱ्या व्यवस्थेला या नव्या वर्गाशी काही देणेघेणे नाही. कुठं आणि किती काळ हा प्रश्न न सुटता राहणार, याचे उत्तर अजून तरी कोणा समाजशास्त्रज्ञाकडे नाही. पोरी मिळत नाहीत म्हणून अविवाहित राहण्याची वेळ लाखो तरुणांवर येणे ही काही चांगली गोष्ट नाही. समाज कसा कुरुप बनतो आहे, हेच ती गोष्ट सांगते. हे सारं पाहून कुणीही कच्चाबच्चा कवी कुसुमाग्रजांच्या कवितेचे अवडंबर पुढील शब्दांत करण्याचा प्रयत्न करू शकतो...

**अरे कुणी एक बायको देता का बायको?**
**लग्नाचं, संसाराचं स्वप्न पाहणाऱ्या पोरांना**
**मातीशी, शेतीशी इमान राखणाऱ्या किसानपुत्राला**
**कष्ट करून देश जगवणाऱ्या बळीराजाला**

(उर्वरित पान २६ वर..)

रेशीम आणि किडे

# अर्थसंकल्प की घोषणापत्र?

**या अर्थसंकल्पात रूढ अर्थसंकल्पात जसे नियोजन असते, त्यापेक्षा कुठल्याही राज्य वा केंद्र सरकारच्या निवडणूकपूर्व अर्थसंकल्पाप्रमाणे यात घोषणांचा पाऊस पाडलेला दिसतो.आदल्याच दिवशी मांडलेल्या आर्थिक सर्वेक्षणात राज्याची आर्थिक स्थिती कशी आहे, हे अभ्यासकांना कळले होते. त्यामुळे अर्थमंत्री महसूल वाढ, नवी गुंतवणूक, नवे रोजगार पर्यायाने नवा ग्राहक तयार करून व्यापार उदिम व इतर क्षेत्रांना व्यवसायवृद्धीसाठी काही ठोस व दूरगामी योजना आखतील, अशी अपेक्षा होती. मात्र, अर्थमंत्र्यांनी यावेळी अर्थभान जपण्याऐवजी पुढील निवडणुकीचं भान व त्यासाठी आवश्यक ते सोशल इंजिनिअरिंग सरकारी पैसा खर्च करून साधण्याचे आणि या लोकप्रिय समृद्धी मार्गावरून वेगाने सत्तेत पुनरागमन करायचे मनसुबे या अर्थसंकल्पाच्या पानापानावर दिसतात.**



संजय पवार

अवघ्या आठ महिन्यांचे वय असलेल्या भाजपपुरस्कृत महाशक्तीच्या भाजप-सेना युती सरकारचा पहिलाच अर्थसंकल्प या महाशक्तीयुतीचे प्रवर्तक व पक्षीय आदेशाने उपमुख्यमंत्रीपदी बसाव्या लागलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी अर्थमंत्री या नात्याने विधानसभेत मांडला.

आमदार, विरोधी पक्षनेता आणि नंतर २०१४ साली थेट मुख्यमंत्री झालेल्या फडणवीसांकडे यंदा प्रथमच अर्थखाते आले. फडणवीसांची २०१४ पूर्वीची प्रतिमा अभ्यासू, आक्रमक; पण संयत असा विरोधी पक्षनेता अशी होती. २०१४ मध्ये थेट दिल्लीच्या आशीर्वादाने मुख्यमंत्रीपद लाभल्यावर त्यांच्यातला सुप्त राजकारणी जागा झाला. सर्वप्रथम पक्षांतर्गत आणि नंतर विरोधी पक्षातील काटे दूर करतानाच पंचवीस वर्षे युतीत असलेल्या शिवसेना या मित्रपक्षाचीही मिजास उतरविण्याची जी दीर्घकालीन योजना राबविली जात होती, त्याला आठ महिन्यांपूर्वी मूर्त स्वरूप देण्याचं कामही फडणवीसांनीच केलं. पण या ऐतिहासिक कामगिरीचं फळ म्हणून श्रेष्ठींनी लादलेलं उपमुख्यमंत्रीपद हे भाजपसहित तमाम राजकीय विश्लेषक व सर्वसामान्य जनता यांना आजही न सुटलेले कोडे आहे.



**फडणवीसांच्या वागण्या-बोलण्यात सत्तेचा दर्प!**

२०१९ ला सर्वाधिक आमदार असूनही उद्धव ठाकरेंच्या हटवादीपणामुळे सत्ता गेलेल्या फडणवीसांचा उत्तरोत्तर तोल बिघडत गेला. एकेकाळचा संयत विरोधी पक्षनेता व समन्वयी माजी मुख्यमंत्री अचानक आक्रस्ताळी झाला! यावर विधिमंडळाबाहेर अभिनेते नाना पाटेकर व विधिमंडळात अजित पवार यांनी त्यांना इतकं हायपर होऊ नका, प्रकृतीला हानीकारक ठरेल, असा काळजीयुक्त सल्ला दिला. तो काहीकाळ त्यांनी पाळला; पण २०१९ ला गेलेली सत्ता २०२२ ला कारस्थान रचून परत मिळविल्यावर व सक्तीचे उपमुख्यमंत्रीपद

स्वीकारावे लागल्यावर फडणवीस पुन्हा आक्रमक, कर्कश्श आणि आता तर काहीसा सत्तेचा दर्प त्यांच्या वागण्या बोलण्यात दिसू लागलाय. आता तर ते उघड उघड बदला वगैरे भाषा वापरू लागलेत!

या पार्श्वभूमीवर त्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पावर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या ऐवजी मध्यावधी वा लोकसभेसोबत पुढच्या मार्च-मे मध्ये जर लागल्या, तर या सरकारचा हा त्याअर्थी पहिला व शेवटचा अर्थसंकल्प अशा साशंकतेची मोठीच सावली दिसते.

**अर्थसंकल्पाच्या पानापानावर समृद्धी मार्गावरून वेगाने सत्तेत पुनरागमनाचे मनसुबे!**

या अर्थसंकल्पात रूढ अर्थसंकल्पात जसे नियोजन असते, त्यापेक्षा कुठल्याही राज्य वा केंद्र सरकारच्या निवडणूकपूर्व अर्थसंकल्पाप्रमाणे यात घोषणांचा पाऊस पाडलेला दिसतो. आदल्याच दिवशी मांडलेल्या आर्थिक सर्वेक्षणात राज्याची आर्थिक स्थिती कशी आहे, हे अभ्यासकांना कळले होते. त्यामुळे अर्थमंत्री महसूल वाढ, नवी गुंतवणूक, नवे रोजगार पर्यायाने नवा ग्राहक तयार करून व्यापार उदिम व इतर क्षेत्रांना व्यवसायवृद्धीसाठी काही ठोस व दूरगामी योजना आखतील, अशी अपेक्षा होती. मात्र, अर्थमंत्र्यांनी यावेळी अर्थभान जपण्याऐवजी पुढील निवडणुकीचं भान व त्यासाठी आवश्यक ते सोशल इंजिनिअरिंग सरकारी पैसा खर्च करून साधण्याचे आणि या लोकप्रिय समृद्धी मार्गावरून वेगाने सत्तेत पुनरागमन करायचे मनसुबे या अर्थसंकल्पाच्या पानापानावर दिसतात.

**लाभार्थ्यांसाठी शेकड्यांपासून कोटींपर्यंतची तरतूद?**

या अर्थसंकल्पात देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, या न्यायाने 'घेशील किती दो कराने' असे आवाहनच समाजातील विविध घटकांना केले गेलेय. धर्म, जात, भाषा, लिंग असा कुठलाही भेदभाव न करता अगदी भिंग लावून शोधून शोधून लाभार्थी घटक काढलेत व त्या प्रत्येकासाठी शेकड्यांपासून कोटींपर्यंतची तरतूद केली गेलीय.

अर्थसंकल्प वाचत असताना अर्थमंत्री योजना सांगताहेत, की आजवर महापुरूष म्हणून गणलेल्यांना जात प्रमाणपत्र वाटताहेत असं वाटावं, अशा जाती व पंथातले महापुरूष शोधून त्यांच्या नावे स्मारक वा मंडळ व निधीची तरतूद ते वाचत होते. जसजशी यादी वाढत गेली तशी एक शंका मनात आली. एकनाथ शिंदेंसोबत आलेले ४० आमदार व काही अपक्ष यांना मंत्रीपदांची अपेक्षा आहे. कारण त्यातले बरेच आधी मंत्री होते; पण सर्वांनाच मंत्रीपदे अशक्य.त्यावर उपाय म्हणून ही खंडीभर महामंडळे आर्थिक तरतुदीसह स्थापलीत का? तसं असेल, तर या आमदारांच्या जाती, पोटजाती आता तपासल्या जातील!

या अशा लोकप्रिय योजनांचे पुढे काय भजे होते ते आपण पाहत आलोच आहोत. या नव्या महामंडळांच्या व स्मारकांच्या यादीसोबत आधीच स्थापित महामंडळे, त्यांची आजवरची कामगिरी व स्थिती पहा. तीच गोष्ट स्मारकांची. सापडला महापुरूष की करा स्मारकाची घोषणा! निधीही सांगितलेला असतो. या अर्थसंकल्पातील प्रस्तावित स्मारकांच्या यादीआधी जी स्मारके घोषित केलीत त्यांची सद्यस्थिती पाहिली, तर त्यातील बहुतांश कागदावरच असतील.

**जातीचा महापुरुष आणा व महामंडळ वा स्मारक घेऊन जा!**

अरबी समुद्रातले शिवस्मारक, इंदूमिलमधील डॉ. बाबासाहेबांचे स्मारक वा बाळासाहेबांचे अरबीसमुद्र तटावरचे स्मारक यांची सरकार व विरोधकांना राजकीय आठवण तरी असते. बाकी राम गणेश गडकरींसह अनेक लेखक, कलावंत यांच्या स्मारकांच्या घोषणा झाल्या. अगदी सध्याच्या शुद्ध नवहिंदुत्ववादी सत्ताधाऱ्यांचे दैवत सावरकर यांच्या जन्मगावच्या स्मारकाचीही 'प्रस्तावित' या शेऱ्यापलिकडे फाईल सरकली नसेल, तिथे दादासाहेब फाळके वगैरे तर विस्मरणातच असतात.

यंदाचा अर्थसंकल्प वाचून या सरकारने जातीचा महापुरूष आणा व महामंडळ वा स्मारक घेऊन जा, असे नवे धोरण तर आखले नाही ना, असं कुणालाही वाटू शकतं! याच अधिवेशनात विरोधी पक्षनेते अजित पवारांनी सरकारी जाहिरातीतील काचफुटक्या एस.टी. चा फोटो सभागृहात फडकवून सरकारला अडचणीत आणले. सरकारने एस.टी.च्या दुरूस्तीवर भर देण्याऐवजी ती एस.टी. कुठल्या आगारातील हे शोधून तिथले तीन कर्मचारी बडतर्फ केले!

या सरकारात विशेषत: भाजप मंत्र्यांच्या तैनातीत काही स्वयंसेवक अधिकृत अनधिकृतपणे ठेवलेत. ते हे शोधकार्य करतात. कुठल्या आगाराची एस.टी. हे शोधले, तसेच पूर्वी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षाची राजकीय कुंडली शोधून महामंडळाला निरोप देऊन अध्यक्ष बदलला, तसाच घोषित साहित्य पुरस्कारही वापस घेतला! ही उलट पुरस्कार वापसी आश्रित व अंकित माध्यमांनी जाजमाखाली सारली.

तर एस.टी. महामंडळ तोट्यात. कर्मचाऱ्यांना वेतनवाढ नाही. आगारात सोयी-सुविधा नाहीत. पगार वेळेवर नाहीत, अशी समस्यांची मोठी यादी आहे. महाविकास आघाडी सरकार असताना जो संप झाला, त्यात आगंतुकपणे उडी घेतलेले पडळकर व खोत हे दोन नेते ऐनवेळी रणछोडदास झालेले महाराष्ट्राने पाहिले. (याच सरकारने फुटक्या काचेच्या एस.टी.ला जबाबदार कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले तेव्हा हे नेते कुठे होते?) त्यांच्या जागी आलेल्या सदावर्तेंनी पार शरद पवारांच्या घरावर चाल करून जाण्यास कर्मचाऱ्यांना उचकवले, या संशय/आरोपावरून त्यांना विविध कोर्ट, कस्टडी व जेलवारी करावी लागली. सरकारीसेवेत विलिनीकरणाचा मुख्य मुद्दा आता सर्वच विसरलेत. अशा या कायम तुटीत महामंडळाची प्रवासीसेवा नव्या अर्थसंकल्पानुसार राज्यातील महिलांना ५०% सवलतीत मिळणार आहे! (यात वय ० ते किती हे स्पष्ट नाही.प्रवासाचे अंतर निर्देशित नाही.) हा पन्नास टक्के अर्थभार हे सरकार कसा व कुठून सोसणार? आज घडीला सरकारला त्यांचे पगार वेळेवर देता येत नसताना ही रेवडी विश्वगुरू मोदींना चालते का?

**ही केंद्राच्याच योजनेची विस्तारित योजना**

शेतकरी तर सर्वच राजकीय पक्षांचा आवडता लाभार्थी गट! (कारण बहुतांश सत्ताधाऱ्यांसह विरोधी आमदार, खासदार पर्यायाने मंत्रीही स्वत: पेशाने शेतकरी आहेत!) या अर्थसंकल्पातही विश्वगुरू नमोंच्या नावे शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये थेट खात्यात येणार आहेत. ही केंद्राच्याच योजनेची विस्तारित योजना.

पीक विम्यावरून बरंच (उर्वरित पान १० वर...)

# पेंढारी, कंत्राटदारांना पोसणारा आणि निसर्ग श्रमजनविरोधी 'खर्चसंकल्प'



प्रा. एच.एम.देसरडा

**महाराष्ट्र राज्याचे राज्य उत्पन्न ३५ लाख कोटी रुपये आहे. त्यातील २० टक्के कररूपाने यावयास काहीच अडचण नसावी. मात्र, सरकार धनिकांना हात लावण्यास कचरते. त्यांच्याकडून चोखपणे पुरेसा कर वसूल करून गोरगरिबांच्या कल्याणाच्या योजना कार्यान्वित करणे हे सरकारचे मुख्य दायित्व आहे. त्याऐवजी सरकार गरिबांना देवाधर्माच्या नावाने झुलवत ठेऊन धनिकांच्या तुंबड्या भरण्यात गर्क आहे. यंदाचा फडणवीस 'खर्च संकल्प' (अर्थनव्हे!) हा धूर्तपणाचा अर्क आहे. याविरुद्ध जनआंदोलन हाच पर्याय आहे.**

नुकताच विधिमंडळात २०२३-२४ या वित्तवर्षासाठी साडेपाच लाख कोटी रुपये खर्चाचा क्षेत्र जात, देवस्थान, पुढारी नामावली, योजना, खाते इत्यादीनिहाय तपशील देणारा अर्थसंकल्प म्हणजे अर्थमंत्री फडणवीस यांचे 'पंचामृत' महाराष्ट्र देशी सध्या चर्चेत आहे. गेली चाळीसेक वर्षे मी केंद्र व राज्याचा अर्थसंकल्प ऐकतो, वाचतो, टी.व्ही. आल्यापासून जमेल तेथे पाहातो (माझ्या घरात टी.व्ही. नाही). मात्र, अर्थसंकल्पाचे झकास कीर्तन होऊ शकते हा अनुभव आगळावेगळाच म्हटला पाहिजे. ह.भ.प. फडणवीस यांनी अवघ्या महाराष्ट्राला पंचामृताचे तीर्थ पाजले! कोणत्याही जिल्ह्याचे, पुढाऱ्याचे, देवाचे, संतमहंताचे नाव न विसरता काही 'तरतूद' केली आहे. सत्ताधारी आमदार, मंत्र्यांचे हात बाके वाजतवाजत सुन्न झाली नाहीत! बरं आहे, की अर्थसंकल्पातील किचकट शब्दप्रयोग, संकल्पना यात बहुसंख्य आमदार-खासदारांना स्वारस्य नसते. अर्थात, तपशीलाचा पेनड्राईव्ह बॅगेत सुरक्षित देण्यात आला!

**विधिमंडळात चर्चा कशाची ? :**

बहुसंख्य आमदारांना खरे स्वारस्य एकाच मुद्देमालाचे असते, आपल्यासाठी किती तरतूद! कंत्राटं कुणाला द्यायची, बिले काढण्यासाठी किती टक्केवारी, हा रोकड सवाल! मात्र, यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण बाब नीट समजावून घेणे अत्यावश्यक आहे, की अर्थसंकल्पाच्या अगडबंब आकारमानातील निम्म्याहून अधिक रक्कम चार बाबींवर खर्च होते. त्या आहेत : वेतन, निवृत्तीवेतन, राज्य सरकारने घेतलेल्या कर्जावरील व्याज व कर्जाची परतफेड यावर अनुक्रमे २४, ११, १० व ९ टक्के म्हणजे ५४ टक्के रक्कम खर्च होते. म्हणजे सरकार कोणत्याही पक्ष व आघाडीचे असले तरी ते अदा करावेच लागते. तात्पर्य, नोकरशाही व पेन्शनवाले (मी होणार व येणार) तरी सर्व महसूल त्यातच जिरेल...

आधी उल्लेख केलेल्या बांधील खर्चाखेरीज अन्य महसुली खर्चाच्या 'योजना' (वाचा खैरात, खिरापत वाटप) यावर तब्बल २५ टक्के खर्च होणार. सोबतच स्थानिक स्वराज्य संस्थांना जीएसटीच्या



भरपाईसाठी ४ टक्के आणि अर्थसाह्य (अनुदाने) पाच टक्के. याचा अर्थ अर्थसंकल्पीय एकूण खर्चापैकी ८८ टक्के खर्च लवाजमा, मंत्रीसंत्री, दानअनुदाने यावर खर्ची पडेल. राहता राहते फक्त १२ टक्के रक्कम भांडवली खर्चासाठी आणि त्यातही कंत्राटदारांचा मलिदा आहेच!

**रस्ते-वीज-सिंचनादी प्रकल्पांसाठी पैसा ? :**

साहजिकच, प्रश्न विचारला जाईल, की जर सरकारकडे पुरेसा पैसा नाही तर अब्जावधी रुपये लागणारे प्रकल्प कसे उभारले जातात ? याचे उत्तर आहे : देशीविदेशी वित्तसंस्था, बँकांकडून कर्ज घेऊन ते उभारले जातात. समृद्धी महामार्ग याचे अत्यंत मासलेवाईक उदाहरण आहे. यंदा अर्थमंत्र्यांनी घोषित केलेले बहुसंख्य प्रकल्प हे कर्जाधारित आहेत. यासंदर्भात हे सांगणे अप्रस्तुत होणार नाही, की नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग २०१४-१९ च्या काळात फडणवीस मुख्यमंत्री व एकनाथ शिंदे त्याखात्याचे मंत्री असताना त्यांनी हा 'समृद्धी महामार्ग' हेरला... आता फक्त खुर्च्या बदलल्या, खर्च व मिळकतधाटणी तीच आहे! जय महाराष्ट्र, जय भवानी, जय शिवाजी!

**मोदीजींच्या नावाने १० लाख घरे :**

देवेंद्रने नरेंद्रच्या नावे ठोस गौरव योजना केली नाही असे कसे होईल? यासाठी लागणारे किमान वीस हजार कोटी रुपये येणार कुठून? तर बँका, वित्तसंस्थांकडून. या सर्व 'गुंतवणुकीत' २० टक्के इतके कंत्राटी कमिशन धरले तरी दोन हजार कोटी रुपये 'राजकीय-

आर्थिक उलाढालीसाठी' अलगद मिळतील. नाव गोरगरीब बेघरांचं; चांगभलं सत्ताधारी टोळीचं! ग्यानबाच्या मराठी शब्दात सांगायचे तर प्रचलित चौकटीतील अर्थसंकल्प म्हणजे ताक आहे. ते हलवत बसण्यात काही अर्थ नाही. लोणी अन्यत्र आहे. लाखो कोटींची कर्जे घेऊन रस्ते, वीज, सिंचन व अन्य पायाभूत सेवासुविधा प्रकल्प उभारण्यातच कंत्राटे-कमिशनला भरपूर वाव आहे. होय, हे येणाऱ्या पिढ्यांच्या माथी कर्ज असते. यंदा महाराष्ट्र राज्य सरकारचे कर्ज ७ लाख कोटी रुपयांवर पोहोचेल. याखेरीज सरकारने 'बांधा-चालवा-हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर अनेक प्रकल्प उभारले व तो पायंडा भरघोस वेगाने पुढे चालला आहे. दुसरे खासगी उद्योग, बहुराष्ट्रीय, कंपन्यांना चौफेर सवलती देऊन प्रकल्प उभारले जात आहेत.

सर्वाधिक घातक बाब म्हणजे यातील बहुसंख्य प्रकल्प हे पर्यावरणाची हानी करणारे आहेत. मोदी सरकारने तर पर्यावरण मंत्रालयास औद्योगिक परवाने देणारे दुकान बनवले आहे. वेगवेगळ्या सबबीखाली पर्यावरणीय आघातांची शहानिशा न करता प्रकल्पांना मंजुरी दिली जाते. त्यात प्रचंड वृक्षतोड होते, जसे की आरे वसाहतीतील कारशेडबाबत झाले. कोकणातील अनेक तेलशुद्धीकरण व रसायन प्रकल्प जे बराच काळ तहकूब होते त्यास शिंदे-फडणवीस सरकार मुक्तपणे परवानग्या देत आहेत. राज्यातील वनक्षेत्र, अभयारण्ये, कांदळवने (मॅनग्रोव्ह), समुद्रकिनारे यांची स्थिती अत्यंत विदारक असून मुंबई-पुण्यासह राज्यातील बहुसंख्य शहरे दिवसेंदिवस अत्यंत प्रदूषित होत आहेत. राज्यातील हवा, पाणी यांची गुणवत्ता अत्यंत रसातळाला गेली आहे. उसासारखे पीक राज्यातील ७० टक्के पाणी (क्षेत्र फक्त सात टक्के) बरबाद करते आणि आपली आजीमाजी सरकारे साखर निर्यात करण्यात धन्यता मानतात! खरं तर, ती साखर निर्यात नसून 'पाणी निर्यात' आहे. कहर म्हणजे आता साखरेला जगात व भारतात मागणी नसल्यामुळे ऊस साखरेऐवजी इथेनॉल बनविण्यासाठी वापरण्यास प्रोत्साहन व अनुदान दिले जात आहे. गंमत म्हणजे, पवार, गडकरी व फडणवीस यांची यात अभेद्य युती आहे. शेतीत धान्याऐवजी इंधन (इथेनॉल) बनविणे ही सरळसरळ संसाधनांची उधळपट्टी व नैतिक अधोगती आहे.

**घोटाळेच घोटाळे! :**

विरोधी पक्षनेते असताना २०१४ सालच्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी सिंचन घोटाळ्याचे गाडीभर पुरावे जमा केले होते. मुख्यमंत्री होताच त्यांनी ते सर्व थंड्या बस्त्यात गुंडाळून ठेवले. पुढे भल्या पहाटे दादा (अजित) बरोबर स्थापन केलेल्या सरकारात सर्वात पहिला निर्णय (वाचा, सौदा) काय घेतला, तर दादांवरील केसेस रद्द केल्या... मात्र २०१४-१९ च्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात सिंचन शब्दच ते विसरले! होय, त्याऐवजी सुरू केले जलयुक्त शिवार अभियान! आधीचा दादा-सिंचन घोटाळा ७० हजार कोटींचा होता. त्यामानाने 'जलयुक्त'चा फार कमी, फक्त दहा हजार कोटींचा! कोटीवर कोटी ही तर मंत्रालयाच्या ६ व्या मजल्यावरची रोजची कार्यकथा आहे. मात्र, जलयुक्त शिवाराने महाराष्ट्राची सर्व पाणलोट रचना उद्ध्वस्त केली, हे प्रस्तुत लेखकाने त्याच्या जनहित याचिकेद्वारे चव्हाट्यावर आणले! आता यंदाच्या बजेटमध्ये जलयुक्त शिवार-२ ची घोषणा करण्यात आली आहे. मागेल त्याला शेततळे, मागेल त्याला ठिबक, एवढेच काय त्यांनीच अर्थसंकल्पाच्या शेवटी म्हटले आहे : जो जे वांछील, तो ते लाहो. नेता-बाबू- थैल्ला-झोला (आधुनिक शेटजी-भटजी) यांची युती जिंदाबाद, असे आहे हे पंचामृत!

**राजकीय अर्थशास्त्र :**

अर्थसंकल्प हा मूलत: राजकीय असतो. त्यात राज्यकर्ता पक्ष व आघाडीचे सामाजिक-आर्थिक विचार, भूमिका प्रतिबिंबित होते. त्यांचा जो निवडणूक जाहीरनामा, वचननामा असतो, त्याबरहुकूम धोरणे आखण्यास व अंमलबजावणी करण्यास आक्षेप घेण्याचे कारण नाही. मात्र, सध्याचे धोरण एकच आहे, की सत्तेतून पैसा व पैशाद्वारे सत्ता कशी रेटता येईल; हा एक कलमी कार्यक्रम आहे. जो जिता वो सिकंदर!

खरं तर, महाराष्ट्रातील सर्व आजीमाजी सरकारे ही फक्त वरच्या १० टक्के लोकांचे हित जोपासत आली आहेत. आजमितीला 'महाराष्ट्रातील तेरा कोटी लोकसंख्येपैकी तब्बल दहा कोटी लोक वंचित व उपेक्षित आहेत. सामान्य शेतकरी, शेतमजूर, कोळी, वनमजूर, बांधकाम मजूर, घरकाम करणारे स्त्री-पुरुष, रोजंदारीचे काम करणारे लोक म्हणजेच एकूण श्रमजीवी जनता यांच्या वाट्याला राज्यातील उत्पन्नाचा फक्त ३० टक्के हिस्सा मिळतो. त्यांची लोकसंख्या मात्र ९० टक्के आहे. तात्पर्य, आज जे चालले आहे, ते दहा टक्क्यांची दिवाळी, नव्वद टक्क्यांचा शिमगा!

**दलित-आदिवासींची स्थिती :**


राज्यातील या तीन कोटी (एससी., एस.टी.) लोकसंख्येसाठी त्यांच्या संख्येनुसार कायदेशीर बाब म्हणून विकास निधीची तरतूद करावी लागते. मात्र, २०२२-२३ साली त्यातील फक्त निम्मीच रक्कम खर्च झाली. याचा अर्थ, सरकार या जातीवर्गाच्या लोकांच्या कल्याणाविषयी उदासिन आहे. राज्यात अद्यापही आदिवासी भागातील बालमृत्यूचे प्रमाण, कुपोषणाचे प्रमाण फार अधिक आहे. मानव विकासात महाराष्ट्र देशात ५ व्या क्रमांकावर आहे. शेतकरी आत्महत्त्येच्या जोडीला आता विद्यार्थी आत्महत्या चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्राच्या रोजगार हमीची तर पुरती वाट लागली आहे. फुले-आंबेडकरांच्या स्वप्नांचा समतामूलक महाराष्ट्र निर्माण होण्याऐवजी धनदांडग्यांचा, भूमाफियांचा महाराष्ट्र ही आजची शोकांतिका आहे. बांडगुळे तुपाशी, गोरगरीब जनता उपाशी!

**श्रीमंतांवर अधिक कर लावा :**

महाराष्ट्र राज्याचे राज्य उत्पन्न ३५ लाख कोटी रुपये आहे. त्यातील २० टक्के कररूपाने यावयास काहीच अडचण नसावी. मात्र, सरकार धनिकांना हात लावण्यास कचरते. त्यांच्याकडून चोखपणे पुरेसा कर वसूल करून गोरगरिबांच्या कल्याणाच्या योजना कार्यान्वित करणे हे सरकारचे मुख्य दायित्व आहे. त्याऐवजी सरकार गरिबांना देवाधर्माच्या नावाने झुलवत ठेऊन धनिकांच्या तुंबड्या भरण्यात गर्क आहे. यंदाचा फडणवीस 'खर्च संकल्प' (अर्थनव्हे!) हा धूर्तपणाचा अर्क आहे. याविरुद्ध जनआंदोलन हाच पर्याय आहे. ●●●

**(लेखक नामवंत अर्थतज्ज्ञ व महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# जो जे वांछील....



श्रीनिवास खांदेवाले

**आर्थिक सर्वेक्षणाने एक सत्य समोर आणले आहे, ते म्हणजे अर्थव्यवस्था कोरोनानंतर एकदम तीव्र गतीने न वाढता संथगतीने वाढत आहे. मागील वर्षी (२०२१-२२) ती १२.१% ने वाढेल असा अंदाज बांधला गेला होता. त्याऐवजी ९.१% ने वाढली. चालू आर्थिक वर्षात ती ६.८% ने वाढेल, असे दिसत आहे.**

**आर्थिक सर्वेक्षण** मार्चच्या पहिल्या आठवड्यात २०२२-२३ मध्ये काय घडले त्याचे सर्वेक्षण (अहवाल) सादर केले गेले व लगेच दुसऱ्या दिवशी २३-२४ चे अंदाजपत्रक सादर केले गेले. अर्थसंकल्पात पुढील वर्षाचा मानस असतो, अंमलबजावणीत काय (उत्पन्न, खर्च इत्यादी) घडले याबाबतची चालू वर्षाची सुधारित आकडेवारी असते आणि त्याही आधीच्या वर्षाचे लेखापरीक्षण केलेले प्रत्यक्ष आकडे असतात. लक्षात येईल, की अंदाजपत्रकात जे जाहीर केले तसे घडेलच असे नाही. २२-२३ च्या सर्वेक्षणातच म्हटले आहे, की अनुसूचित जातींच्या कल्याण योजनांवरील संकल्पित रु. १२,२३० कोटींपैकी १५ फेब्रुवारी २०२३ पर्यंत केवळ रु. ४८५१.०१ कोटीच (म्हणजे सुमारे ३२-३३%) खर्च झाले. जिल्हास्तरीय योजनांमध्ये प्रस्तावित रु. २,७२८.६४ कोटींपैकी रु. ६८१.८१ कोटी (सुमारे २५%); राज्यस्तरीय योजनांमध्ये रु. ९५०१.३६ कोटींपैकी रु. ३८९९.३३ कोटीच (२६%) खर्च होऊ शकले. अनुसूचित जमातींच्या कल्याण योजनांमध्ये रू. १२,५६२.८९ कोटींपैकी फक्त रु. ५,८३२ (४६%) कोटी खर्च झाला. तूट कमी करण्यासाठी खर्चच केला गेला नाही आणि विधानसभेने मंजूर केलेला पैसा वितरित केला गेला नाही, अशाही तक्रारी आहेत. मग संबंधित विषयांमध्ये (आणि इतर विषयांमध्येसुद्धा) लोक कल्याणाचे काय झाले असेल? डिसेंबरमध्ये विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात खर्च न झालेला (किंवा होऊ न दिलेला) निधी इतर (आवडत्या) कार्यांवर खर्च केला जातो. म्हणून अनेक वेळा अर्थसंकल्प एका प्रकारचा असतो आणि निष्पत्ती वेगळीच निर्माण होते.

सर्वेक्षणाने एक सत्य समोर आणले आहे, ते म्हणजे अर्थव्यवस्था, कोरोनानंतर एकदम तीव्र गतीने न वाढता संथगतीने वाढत आहे. मागील वर्षी (२०२१-२२) ती १२.१% ने वाढेल असा अंदाज बांधला गेला होता. त्याऐवजी ९.१% ने वाढली. चालू आर्थिक वर्षात ती ६.८% ने वाढेल, असे दिसत आहे.

**२०२३-२४ चा संकल्प**

पुढील (२३-२४) वर्षात सरकारचे महसुली जमा रु. ४,४९,५२२.६१ कोटी, महसुली खर्च रु. ४,६५,६४५.०२ कोटी आणि महसुली तूट रु. १६,२२१.४१ कोटी असणार आहे. भांडवली जमा रु. ९७,९२७.३७ कोटी, भांडवली खर्च रु. ८१,८०४.९६ कोटी अपेक्षित आहे. राजकोषीय तूट रु. ९५,५००.८० कोटी असेल. २३-२४ या वर्षात शासनाचे अंतर्गत कर्ज रु. १,३१,२०७.१७ कोटी रुपयांनी वाढेल. कर्ज हा एकूण जमा उत्पन्नाचा २१.७९% हिस्सा असेल. शासनाचा स्वतःचा कर महसूल एकूण महसुली उत्पन्नाच्या ४९.५३%, केंद्रीय करांतील हिस्सा एकूण महसुलाच्या १०.७२% कर्ज २१.७९% असे ते ढोबळ चित्र असेल. पुढील वर्षीचे कर्ज यंदाच्या कर्जापेक्षा जास्त असणार आहे आणि एकूण संचित कर्ज २२-२३ मधील एकूण कर्ज (डेट स्टॉक) रु. ६,३९,४२५ कोटींच्या तुलनेत रु. ७,०७,४७२ कोटी असणार आहे. कर्ज सतत वाढत असले व राज्य स्थूल उत्पन्नाच्या १८.२३% होणार असले, तरी रिझर्व बँकेने घालून दिलेल्या २५.० टक्के सीमेच्या आत असल्यामुळे आवाक्यात आहे, असे सरकारचे म्हणणे आहे.

**आगामी निवडणुका व अर्थसंकल्प**

लोकशाहीत प्रत्येक राज्यकर्त्या पक्षाला पुन्हा (पुन्हा) निवडून येऊन राज्य करायचे असते व त्यासाठी लोकांची मते हवी असतात. त्याचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग असा, की शहरी व ग्रामीण जनतेला पुरेसा रोजगार देऊन, समाधानकारक मजुरी व उत्पन्नाचे दर देऊन, सर्वांना तांत्रिक शिक्षण देऊन, निवृत्तीवेतन देऊन एक प्रगतिशील, स्वस्थ व अहिंसक समाज निर्माण करायचा आणि त्या कामगिरीवर मते मागायची. दुसरा मार्ग असा, की जनतेला असंख्य गोष्टी फुकट देण्याच्या घोषणा करायच्या (रेवडी वाटणे) आणि मते घेऊन टाकायची आणि सरकार त्या गोष्टी देऊ शकले नाही तर म्हणायचे की त्या निवडणुकीच्या काळात मारलेल्या थापा होत्या. महाराष्ट्रात विकास प्रक्रियेचा भाग म्हणून विविध जाती-जमातींच्या विकासाकरता थेट सरकारी विभागातून सुविधा न देता त्यासंबंधीचे महामंडळ काढायचे, तेथील कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा (जमेल तितके दिवस) नाकारायचा, संबंधित समाजाच्या नेत्याला मंत्रिमंडळ टाळून महामंडळाचे अध्यक्षपद द्यायचे म्हणजे लाभार्थी

खूश आणि संबंधित समाजघटकाला आपले राजकीय अस्तित्व सिद्ध झाल्याचे समाधान. या महामंडळांना पुरेसा निधी मिळत नाही, ती तोट्यात चालतात हा नेहमीच्या अनुभव; परंतु त्यातून विविध गटांना आत्मसमाधान मिळते, हा व्यवहारिक अनुभव गाठीस असल्यामुळे अर्थमंत्र्यांनी सध्या अस्तित्वात असलेल्या बारा महामंडळांच्या जोडीला एका झटक्यात पाच नव्या महामंडळांची घोषणा करून टाकली, अगदी 'जो जे वांछील, तो ते लाहो' या पसायदानाप्रमाणे!

मात्र पुढे दिलेल्या आकड्यांवरून २३-२४ मधील आर्थिक सत्य काय आहे, ते संक्षिप्त अर्थसंकल्प, तक्ता क्रमांक २ वरून जाणून घेऊः विकास खर्च (सामाजिक सेवा, आर्थिक सेवा, स्थानिक संस्था व पंचायतराज असे एकूण १८ विषय) २२-२३ च्या रु. ३,०८,९५०.१९ कोटी ह्या सुधारित अंदाजापेक्षा कमी रु. ३,००,७७८.०० कोटी इतकाच प्रस्तावित आहे. त्यात आरोग्य व कुटुंब कल्याण, कृषी विकास, ग्रामविकास, पाटबंधारे व पूरनियंत्रण, ऊर्जा, उद्योग व खनिजे, सर्वसाधारण आर्थिक सेवा, पंचायतराज संस्था या विकासाचा गाभा असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या प्रत्येक विषयांवर पुढील वर्षातला संकल्पित निधी कमी आहे. माहिती व प्रसारणावर मात्र २२-२३ च्या रु. २८०.१५ कोटींच्या तुलनेत आणखी रु. ३३१.३१ कोटी (११८.२६%) जास्त म्हणजे एकूण रु. ६१३.४५ कोटी एवढा खर्च प्रस्तावित आहे. साहजिक आहे, निवडणुका आहेत तर प्रतिभानिर्मिती करता एवढा खर्च येणारच. विकासेतर खर्चात ज्या आर्थिक सेवा आहेत त्यावर २२-२३ मधील सुधारित अंदाजाच्या रु. ६,१७२.१४ कोटींना जबरदस्त कात्री लावून २३-२४ करता रु. ४,६८४.२६ कोटी इतकाच संकल्पित आहे; परंतु प्रशासकीय सेवांच्या खर्चात २२-२३ च्या रु. ३६,९४०.७४ पासून घसघशीत वाढवून २३-२४ मध्ये रु. ४६,३८०.७५ कोटी एवढी वाढ प्रस्तावित आहे.

सारांश, राज्य या संस्थेतर्फे अर्थसंकल्पाद्वारे अर्थव्यवस्था अधिक उत्पादक, अधिक कल्याणकारी व्हावी अशी अपेक्षा असते. पण २३-२४ चा महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प समाजाचे वेगळेच दर्शन घडवितो. आणखी काही महामंडळासाठींच्या मागण्या सरकारकडे पोचल्या आहेत, असे वृत्त आहे! ●●●

**(लेखक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आहेत.)**

# अर्थसंकल्प की घोषणापत्र?

**(पान ६ वरून)** राजकारण घडत असतं. शेतकरी आत्महत्या, हमीभाव, आपत्तीत पंचनामे व नुकसानभरपाई, या जोडीला आता पीकविमा हे इतर कायमस्वरूपी प्रश्नातले नवे पीक. तर शेतकऱ्यांची तक्रार ही, की आम्ही विम्याचे हप्ते भरतो. पण विमा कंपन्या योग्य ती भरपाई देत नाहीत. काही कंपन्या तर पळून गेल्या! आता अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांना असा दिलासा दिलाय, की तुमचे हप्ते सरकारच भरेल! सरकारचं आर्थिक सर्वेक्षण पैसे नाही, असे दर्शवते. पण महिलांना प्रवास सवलत, पीक विमा हप्ता भरणे यासाठी सरकार पैसे कुठून उभे करणार, हे सांगत नाही.

आजवर शेतकरी पीक विमा कंपनीच्या कार्यालयात खेटे घालायचे. हप्ते भरूनही नन्नाचा पाढा ऐकायचे. उद्या जर या कंपन्या म्हणाल्या, की सरकारने तुमचे हप्तेच अजून पाठवले नाहीत, तर शेतकऱ्यांनी कुठे जायचे? जे सरकार अनेकांचे पगार वेळेत करत नाही, ते वेळेत हप्ते भरू शकले नाही तर?

आणखी एक शंका फडणवीसच अर्थमंत्री असल्याने. पूर्वी ते मुख्यमंत्री असताना त्यांनी सरकारच्या काही विभागांना नेहमीच्या बँकेला डावलून axis बँकेत खाती उघडायला वा हस्तांतरित करायला लावली होती. उद्या हीच प्रेमळ सक्ती पीक विमा कंपन्यांवरही होऊ शकेल का? व्यवहार चतूर भाजपचे ते अर्थमंत्री असून त्यांच्या सुविद्य व सर्वकलानिपुण पत्नी याच axis bank येथे कार्यरत असल्याने पूर्वी हा प्रयोग झालेला आहे. नंतर तो निर्णय बदलला गेला वा काही विभागापुरताच मर्यादित राहिला!

भाजपच्या मतदारांत सर्व वयोगटातील व जाती, पंथातील महिला मतदारांचा टक्का जास्त असल्याने अर्थसंकल्पीय घोषणापत्रात त्यांचा लाभार्थीगटात प्राध्यान्याने समावेश केलाय. प्रवासी सवलत, तसेच मुलींच्या शिक्षणासाठी भरघोस मदत यातून पारंपरिक उच्चवर्णीयांसोबत नवहिंदुत्वाचे कलम झालेले ओबीसी, तसेच आठवलेपुरस्कृत संघम शरणं मतदारांना याचा घसघशीत लाभ होईल, असे निदान आता कागदावर तरी दिसतेय. नंतर बाबू लोक जात, पंथ, आर्थिक स्तर याची वर्गवारी करून योजनेची पिसे काढतीलच.

महात्मा फुले आरोग्य योजनेतील वाढ ही पुन्हा बाबू लोकांना नव्या कुरणाची सोय ना ठरो. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना विस्तार हा बहुधा शिंदे गटाच्या आमदार, खासदार कार्यकर्ते यांना झुणका भाकर केंद्रासारखी रोजकमाई हमी योजना म्हणूनच विस्तारली असावी. कारण राज्यकारभारापासून अर्थसंकल्पापर्यंत सर्वत्र भाजपपेक्षाही फडणवीसांची छाप दिसते.

अर्थसंकल्पाच्या भाषेत 'पंचामृत'सारख्या ब्राह्मणी परिभाषेचा उपयोग यातून राज्यात मराठी भाषा भवन होवो, मराठी भाषा विद्यापीठ होवो, की संत विद्यापीठ किंवा चक्रधर सन्मान योजना होवो, भाजप आपल्या मूळ संस्काराचे कलम वा पुनरूज्जीवन स्वतंत्र वा शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या मदतीने राज्यात समरसतेने करत राहणार. कारण कसबा व चिंचवडने एक संदेश दिलेला आहे. त्या निकालाचा टोचलेला काटा विशेषत: कसब्यातला. इतका टोचलाय, की अर्थसंकल्पात सावित्रीबाई फुल्यांनी स्थापित पुण्यातील पहिल्या मुलींच्या शाळेचे स्थळ भिडेवाडा याच्या स्मारकनिधीची तरतूद जाहीर होताच, भाजपचे पराभूत आमदार रासने व इतरांनी जोतीबा व सावित्रीबाईंच्या तसबिरींचे पूजन करून त्यांना पुष्पमाला घालून तिथेच ब्राह्मणी फुगडीचा खेळ हे भाजपीय पुरूष खेळले!

या अर्थसंकल्पावरचे हे प्रतिकात्मक भविष्यच या कार्यकर्त्यांनी या फुगडीतून दाखवून दिले! ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# स्वातंत्र्याचा अर्थ



बी.जी. वाघ

**स्वातंत्र्याचा अर्थ आपल्या शरीर, मन, बुद्धी, भावना यावर व्यक्तीचे असलेले सार्वभौमत्व. घटनेने आपल्याला ते दिलेले आहे; परंतु सामान्य माणसाला ते मिळाले नाही, याची यथार्थ जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. समताधिष्ठित समाज निर्माण झाल्याशिवाय ते स्वातंत्र्य सामान्य माणसांना मिळणार नाही. घटना समितीतील त्यांचे शेवटचे कळकळीचे भाषण आपल्याला पुन:पुन्हा अभ्यासावे लागते.**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षता ही आपल्या घटनेची चिद्सूत्रे (living principles) आहेत. ही सूत्रे मोठ्या सामाजिक, धार्मिक संघर्षातून, चिंतन-मंथनातून विचारवंतांच्या विद्रोहातून पुढे आली आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीने या तत्त्वांचा पहिल्यांदा उद्घोष केला. त्यामागे अनेक शतकांचा वैचारिक संघर्ष होता. हा संघर्ष आधी धर्म आणि विज्ञानात होता. विज्ञान जिंकले आणि धर्म मागे पडत गेला; परंतु हे सहज झाले नाही. त्यासाठी अनेक लेखक, कलावंत, विचारवंत आणि वैज्ञानिक यांचे बळी गेले. हिप्सिया या विदुषीला चर्चने जिवंत जाळले होते. गॅलिलिओचा छळ करण्यात आला. ब्रूनोलाही जिवंत जाळण्यात आले होते. केपलरने घाबरून आपली पुस्तके प्रकाशित केली नाहीत. काहींना त्यासाठी देश सोडावा लागला. धर्मसत्ता व अनियंत्रित राजसत्ता ही मध्ययुगीन अंधःकाराला कारणीभूत होती. या दोन्ही सत्ता फ्रेंच राज्यक्रांतीने उद्ध्वस्त केल्या. त्यातून पुढे अमेरिकन राज्यक्रांती घडली. त्यानंतर रशियातील बोल्शेविक क्रांतीने जगाचा इतिहास आणि भूगोलच बदलून टाकला. या क्रांतीमागे प्रेरणा होत्या त्या स्वातंत्र्याच्या; परंतु त्याची परिभाषा नेहमी बदलत राहिली आहे. 'कायद्याप्रमाणे वागण्याचा व्यक्तीचा अधिकार म्हणजेच त्याचे स्वातंत्र्य' अशीही व्याख्या एका विचारवंताने केली आहे. कायदा म्हणजे सार्वभौम सत्तेच्या आज्ञाच. त्यामुळे व्यक्तीला मनाचे, बुद्धीचे किंवा सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्य असे नाहीच. फ्रेंच राज्यक्रांतीने मात्र व्यक्तीला मूलभूत स्वातंत्र्यच दिले असे नाही, तर जन्माने आणि दर्जाने सर्व व्यक्ती समान हे तत्त्व अधोरेखित केले. त्यामागे रुसो, व्हॉल्टेअर, डिडेरो यांसारख्या विचारवंतांचे परिश्रम होते. ही क्रांती रक्तरंजित होती. रॉवेस्पियर या जहाल नेत्याचा खून झाला. या अराजकातूनच पुढे नेपोलियनचा उदय झाला. क्रांती झाली तेव्हा नेपोलियन वीस वर्षांचा होता. त्याने म्हटले आहे, 'फ्रान्सचा राजमुकुट गटारीत पडला होता, तो मी माझ्या तलवारीच्या टोकाने उचलला आहे.' याचा अर्थ अराजकतेत स्वातंत्र्याचा लोप होतो. तथापि, नेपोलियन तत्कालीन तरुणांचा आदर्श होता. बर्ट्रांड रसेल म्हणतात त्याप्रमाणे अठराव्या शतकाचे तीन प्रतिभावंत होते : गटे, बायरन आणि नेपोलियन. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरही नेपोलियनचा प्रभाव होता. नेपोलियन अत्यंत प्रतिभावंत सेनानी आणि सर्वोत्कृष्ट माणूस होता. त्याची




'नेपोलियन संहिता' प्रसिद्धच आहे. बायरन हा निव्वळ कवीच नव्हे, तर स्वातंत्र्ययोद्धाही होता. गटेला पाहिल्यानंतर नेपोलियन म्हणाला होता, 'माणूस असावा तर असा.' बायरनने म्हटले आहे : Those who will not reason are bigots, those who can not are fools and those who dare not are slave.

**रुसोला राज्यविहीन निसर्गअवस्था सर्वश्रेष्ठ वाटत होती**

अठराव्या शतकाने आपल्याला काही मूलभूत संकल्पना दिल्या. त्यातील स्वातंत्र्य ही मूलभूत कल्पना होती. एका बाजूला धर्माची अविवेकी सत्ता, कठोर धर्मनिंदेचे कायदे, कालबाह्य मूल्ये व नीतिव्यवस्था... त्यामुळे खऱ्या धर्माच्या नीतिमत्तेचा लोप झाला होता. श्रद्धा (अंध) आणि विवेक (reason) यातील तो संघर्ष होता, तसाच तो लोकशाही मूल्ये व सरंजामशाही यातीलही होता. रुसोला राज्यविहीन निसर्गअवस्था सर्वश्रेष्ठ वाटत होती. माणसे निर्वस्त्र फिरत असतील व मुक्त स्वातंत्र्याचा आनंद लुटत असतील, तर विकासाच्या नावाने त्यांना बंधनात टाकणारे तुम्ही कोण, असा प्रश्न त्याने विचारला होता. कार्ल मार्क्सनेदेखील क्रांतीनंतर राज्यविहीन व्यवस्था येईल आणि सर्वजण समतेचा, स्वातंत्र्याचा, सामाजिक व आर्थिक न्यायाचा पूर्ण आनंद घेऊ शकतील, असे म्हटले होते. मार्क्सचा आदर्शवाद प्रत्यक्षात अस्तित्वात आला नाही. त्याऐवजी समूह सत्तावाद पुढे आला. समतेसाठी स्वातंत्र्याचा बळी देणे मार्क्सला अभिप्रेत नव्हते. राज्यविहीन समाजात समतेसह मुक्त स्वातंत्र्यच मिळू शकते. राज्य एक दमनकारी शक्ती आहे. भय व दंड ही तिची बलस्थाने आहेत. स्वातंत्र्य हवे असेल तर सत्ता लोकांच्याच हातात असावी; परंतु त्यासाठी लोक कोण, हे समजून घ्यावे लागेल. भारताच्या राज्यघटनेच्या सरनाम्यात 'आम्ही भारताचे

लोक' हा शब्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वापरला आहे. त्यामागे त्यांची इतिहासाची सखोल जाण व सूक्ष्म दृष्टी दिसून येते. लोकांच्या मान्यतेशिवाय कुठलीही घटना यशस्वी होऊ शकत नाही. 'लोक' या संकल्पनेत लोकांची सामूहिक इच्छाशक्ती, समान ध्येये व त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्याची प्रतिबद्धता दिसून येते. 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांचा आग्रह डॉ. आंबेडकरांनी यासाठीच धरला होता, की भारत कधी एक राष्ट्र नव्हते. अनेक जातीसमूहांचा, विविध परंपरांचा, धर्मांचा, अनेक सांस्कृतिक संघर्षांचा, परस्परविरोधी धार्मिक व जातीय हिंसांचा, मतांचा मेळ घालून समान ध्येयांसाठी त्यांना प्रवृत्त करणे अत्यंत आवश्यक होते. ती समान ध्येये घटनेच्या उद्दिष्टांच्या ठरावात प्रतिबिंबित झाली होती. देवाच्या, धर्माच्या नावाने त्यांना एकत्र आणणे अशक्य होते. भारतातील सर्व समस्यांचे मूळ येथील धर्मव्यवस्थाच होती. फ्रेंच, अमेरिकन, रशियन राज्यक्रांतीने मानवमुक्तीचे एक तत्त्वज्ञान जगापुढे आणले होते. भारताला आधुनिक, बलशाली, स्वतंत्र, समतावादी बनवायचे असेल तर इतिहासापासून त्याला मुक्त करून आधुनिक, प्रगत, वैज्ञानिक मूल्यांशी त्याला बांधणे आवश्यक होते. अज्ञान आणि अंधश्रद्धेलाच धर्म मानणाऱ्यांसाठी 'आम्ही' या शब्दाचा निव्वळ जातीय व धार्मिक अर्थ होता. त्याला 'राष्ट्र' या व्यापक संकल्पनेशी जोडण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी घटनेत या शब्दाला अग्रभागी ठेऊन केले. 'स्वातंत्र्य' आणि 'राष्ट्र' हे शब्द त्यामुळे परस्परांना पर्यायवाचक ठरले. राज्य व राष्ट्र या कल्पना स्वातंत्र्याला पूरक आहेत. राष्ट्रच व्यक्तीच्या स्वातंत्र्याची ग्वाही देऊ शकते. रुसोच्या सामाजिक करार सिद्धांताप्रमाणे व्यक्ती आपले स्वातंत्र्य आपल्या सामूहिक रूपाला अर्पण करत असते. त्यामुळे सुरक्षितता, युद्ध या कारणांमुळे ते नष्ट होत नाही. आपण आपल्या स्वातंत्र्याचा त्याग करू शकत नाही, तसेच ते कुणाला हिरावूनही घेता येत नाही. अपवादात्मक परिस्थितीत असे होत असेल, तर ती काही आदर्श परिस्थिती नाही.

**मुळात 'लोक' ही संकल्पना संदिग्ध आहे**

स्वातंत्र्याविषयी अतिशय सखोल चिंतन 'ऑन लिबर्टी' (On liberty) या ग्रंथात दिसतो. त्याचे लेखक आहेत प्रसिद्ध विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल. हा एक अत्यंत प्रभावी राजकीय विचारवंत होता. हर्बर, स्पेन्सर, बेंथॅम, ह्यूम, कार्लाईल अशा महान विचारवंतांच्या उपयुक्ततावादी, उदारमतवादी, उत्क्रांती आणि विकास अशा तात्त्विक आणि बौद्धिक विचारप्रवाहांचा त्याच्यावर प्रभाव होता. 'ऑन लिबर्टी' हे पुस्तक सन १८५९ मध्ये प्रकाशित झाले. ते 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचे अनेक अंगांनी विश्लेषण करते. मुळात 'लोक' ही संकल्पना संदिग्ध आहे. सत्ताधाऱ्यांचा वर्ग आणि सामान्य जनता यांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. जॉन स्टुअर्ट मिलने बहुसंख्याकांच्या हुकूमशाहीवर भाष्य केले आहे. बहुसंख्याकांच्या मताविरुद्ध जाण्याची सामान्य माणसांची इच्छा असते; परंतु सरकारच्या विरोधी जाण्याची त्यांच्यात क्षमता नसते. अशा वेळी त्यांना संरक्षणाची गरज असते. व्यक्तीचे स्वातंत्र्य हे बहुधा बहुसंख्याकांच्या नियंत्रणाखाली असते. बहुसंख्याकांची मते, विचारप्रणाली, प्रथा, रितीरिवाज यांना व्यक्ती विरोध करील तर दंडित होईल. कधी कायद्याने, तर कधी सामाजिक नियंत्रणासाठी व्यक्तीचे हित व अधिकार हिरावले जातात. व्यक्तीच्या विवेकशीलतेवर व त्याच्या सद्सद्विवेकावरही बहुसंख्याक सत्ता आक्रमण करत असते. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक नियंत्रण यातील समतोल व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचा बळी देऊन साधता येणार नाही. कुठलीही दोन राष्ट्रे किंवा दोन व्यक्ती किंवा दोन कालखंड (ages) सारखाच विचार करत नाहीत. त्यामुळे इतिहासकालीन व्यक्ती, आदर्श समाजव्यवस्था यांविषयी शंका घेतली पाहिजे. विशेषतः जुन्या प्रथा आणि परंपरा यांचे समर्थन तर्कबुद्धीने करता येत नाही; परंतु लोक त्यांचे समर्थन करतात व इतरांनाही करायला भाग पाडतात. दुसऱ्यांच्या वर्तणुकीवर व विचारांवर बंधने आणणे, त्यासाठी सामाजिक पूर्वग्रह, अंधश्रद्धा किंवा धर्मश्रद्धेचा वापर करणे अत्यंत छळणारे असते. इतरांविषयी तुच्छता, द्वेष, मत्सर, औद्धत्य आणि इतरांचा अपमान करण्याची वृत्ती ही बहुसंख्याक सत्तेची वैशिष्ट्ये असतात. वंशभेद, पंथभेद, लैंगिक असमानता ही उच्चवर्णियांच्या नीतिमत्तेतूनही प्रकट होते. अल्पमतवाल्यांना किंवा अल्पसंख्याक वर्गसमूहांना कधी बहुसंख्याक होण्याची संधीच नसते. त्यामुळे वैचारिक, बौद्धिक, नैतिक किंवा सद्सद्विवेकाचे स्वातंत्र्यच नाकारले जाते. बहुसंख्याकांच्या प्रथा-परंपरा, मतप्रवाह यांना नाकारण्याचे स्वातंत्र्यच खरे स्वातंत्र्य असते. सरकारला खासगी जीवनात हस्तक्षेप करण्याचा काहीही अधिकार नसतो; परंतु सरकार ते नैतिकतेच्या नावाने (moral coercion) करत असते. लहान मुले, स्त्रिया यांच्या स्वातंत्र्याचा विचार होत नाही. प्रत्येक व्यक्तीचा तिच्या शरीरावर व मनावर पूर्ण अधिकार असतो. तिची ती सार्वभौम सत्ता म्हणजेच स्वातंत्र्य आहे. व्यक्तीने आपल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊ नये व इतरांचे नुकसान करू नये किंवा काही सामाजिक दुष्कृत्यांबद्दल तिला जबाबदार धरण्यात यावे यापलीकडे स्वातंत्र्यावर निर्बंध असू नयेत. लोकांना त्यांच्या विवेकाप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य दिले तर ते अंतिमतः समाजाच्या फायद्याचेच असते. दीडशे वर्षांपूर्वी जॉन स्टुअर्ट मिलने बहुसंख्याकवादाचा आणि बहुसंख्याकांच्या हुकूमशाहीचा धोका ओळखला, हे आश्चर्यकारक आहे. प्रतिकूल मत मांडण्याचा प्रत्येकाला मूलभूत अधिकार आहे, हे तो स्पष्टपणे सांगतो.

बहुसंख्याकवाद म्हणजे नेमके काय, याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे सध्याची राजकीय संस्कृती आणि त्यातून उफाळून आलेला धार्मिक, वांशिक राष्ट्रवाद होय. हिंदू विषमतामूलक संस्कृती हे भारतीय घटनेसाठी कायम एक आव्हान राहिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि नेहरूंना या धोक्याची जाणीव होती. समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांना जमिनीत पेरून त्यांना भारतात अहिंसक पद्धतीने, शांततेने क्रांती घडवायची होती. या देशातील अज्ञान, अंधश्रद्धा, गरिबी, सामाजिक व धार्मिक विषमता यांचे मूळ येथील धर्मव्यवस्था होती. ती बदलणे शक्य नसले तरी सरकार जर निधर्मी असेल व घटनात्मक संस्था निष्पक्ष व तटस्थ असतील, तर तिला नियंत्रित करता येणे शक्य होते. घटनात्मक राष्ट्रवाद हे हिंदू राष्ट्रवादाला सक्षम पर्याय देणारे होते; परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व सरकारांनी हिंदू राष्ट्रवादाचा प्रखर वैचारिक प्रतिवाद केला नाही; उलट त्यांना ते नकळत बळ देत गेले. त्यांना जवळ घेत गेले. सरकारमध्ये, प्रशासन

यंत्रणेत, शिक्षणव्यवस्थेत ते आत खोलवर जाऊन बसले. मीडिया, वर्तमानपत्रे, सुशिक्षित मध्यमवर्ग हे घटक सुरुवातीपासूनच त्यांचे सहानुभूतीदार होते. देशातील व्यापारी, उद्योगपती यांना काँग्रेसची डावी विचारसरणी मुळातच पसंत नव्हती. त्याचा फायदा या उजव्या शक्तींनी मोठ्या प्रमाणात घेतला. देशातील शूद्र, अतिशूद्र जाती परंपरावादी व धर्मवादीच राहिल्या आहेत. हे एक गुलामीचे तत्त्वज्ञान आहे, जे घटनेच्या मूळ उद्दिष्टांना विरोध करणारे, विषमतावादी व्यवस्थेला बळकट करणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'या देशाचे दोन मुख्य शत्रू आहेत. ते म्हणजे शेठजी आणि भटजी. एक वर्ग देशाचे नैतिक, धार्मिक व सामाजिकदृष्ट्या शोषण करतो. धर्माच्या साह्याने लोकांची विवेकशक्ती नष्ट करत त्यांना गुलाम करतो, तर दुसरा वर्ग त्यांचे आर्थिकदृष्ट्या शोषण करतो आणि पहिल्या वर्गाला 'मीडिया' व 'मनी' पुरवून देशातील पुरोगामी, प्रगतिशील विचारव्यवस्थेला नष्ट करतो. थोडक्यात, स्वातंत्र्य आणि समता या दोन मूल्यांना तो विरोध करतो. 'मनुस्मृती' प्रणित व्यवस्था या दोन्ही वर्गांना आदर्श वाटते. त्यामुळे त्यांचे स्थान बळकट होते व त्यांच्याशी स्पर्धा करण्याइतपत उर्वरित दोन वर्गांत (शूद्र व अतिशूद्र) क्षमताच उरत नाही. स्वातंत्र्याचा अर्थ आपल्या शरीर, मन, बुद्धी, भावना यावर व्यक्तीचे असलेले सार्वभौमत्व. घटनेने आपल्याला ते दिलेले आहे; परंतु सामान्य माणसाला ते मिळाले नाही, याची यथार्थ जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. समताधिष्ठित समाज निर्माण झाल्याशिवाय ते स्वातंत्र्य सामान्य माणसांना मिळणार नाही. घटना समितीतील त्यांचे शेवटचे कळकळीचे भाषण आपल्याला पुन:पुन्हा अभ्यासावे लागते. ते म्हणाले होते : Political democrocy can not last unless there lies at the base of it social democrocy. What does social democrocy mean? It means a way of life which recognizes liberty, equality and fraternity as the principles of life. These principles of liberty, equality and fraternity are not to be treated as separate items in a trinity. Liberty can not be divorced from equality. Equality can not be devorced from fraternity. Nor can liberty and equality devorced from fraternity. Without equality, liberty would produce the supremcy of the few equality without liberty would kill indivisual initiative.

**घटनात्मक व्यवस्थेला व आधुनिक मूल्यव्यवस्थेला मोठा धोका**

डॉ. आंबेडकर निव्वळ घटनेचे शिल्पकार नव्हते. ते एका आदर्श समाज व राज्यव्यवस्थेचेदेखील शिल्पकार होते. स्वातंत्र्य हे समतेशिवाय राहू शकत नाही. माणूस गरजांपासून मुक्त झाल्याशिवाय तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र होत नाही. भारतात जितकी सामाजिक, आर्थिक विषमता आहे, तितकी जगात कोठेही नाही. जातिव्यवस्थेमुळे हा देश हजारो वर्षे दारिद्र्यात खितपत राहिला, कारण माणसांना ना व्यवसाय स्वातंत्र्य होते ना कर्म स्वातंत्र्य. 'मनुस्मृती'ने शूद्रांना संपत्तीचा अधिकार नाकारला होता. ही व्यवस्था घटनात्मक मार्गाने आमूलाग्र बदलण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकर यांनी केला. समाजवाद आणि लोकशाही यांचे सुंदर संतुलन आपल्या घटनेत आहे. पंडित नेहरू हे फेबियन सोशालिस्ट होते किंवा फेबियन सोशालिझमचा त्यांच्यावर सखोल प्रभाव होता. हा उदारमतवादी विद्वानांचा समाजवाद होता. तो बौद्धिक स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक व आर्थिक समतेचा पुरस्कर्ता होता. डॉ. आंबेडकर, पंडित नेहरू आणि महात्मा गांधी या तिघांच्याही विचारांचा समन्वय आपल्याला घटनेत दिसतो. महात्मा गांधींचा खून एका कर्मठ विचारसरणीने केला. त्याला 'गोडसेवाद' म्हणता येईल. त्याचे सामर्थ्य वाढत चालले आहे. आमचा धर्म श्रेष्ठ म्हणणाऱ्या लोकांच्या रक्तात हुकूमशाहीची गुणसूत्रे असतातच; परंतु हे धर्मप्रेम नव्हे, तर धर्माचा वापर शस्त्रासारखा करून समाजात द्वेष, हिंसा, बुद्धिभेद यांच्या साह्याने राजकीय सत्ता हस्तगत करून आपला मनुस्मृतीप्रणित छुपा अजेंडा राबवणे, हे त्यांचे ध्येय आहे. भारतातील शूद्र जाती मुळातच अविवेकी आहेत. त्यांना धर्म आणि देश यातील अंतर कळत नाही. धार्मिक उन्मादात ते आपल्या घटनात्मक अधिकारांचा, मिळालेल्या स्वातंत्र्याचा, विकासाचाही विचार करत नाहीत. त्यामुळे देशातील घटनात्मक व्यवस्थेला व त्यातील आधुनिक मूल्यव्यवस्थेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

**...तेव्हा गणतंत्र व्यवस्था नष्ट होते**

संविधान सभेची प्रथम सभा संविधान सभागृह, नवी दिल्ली येथे दि. ९ डिसेंबर १९४९ रोजी झाली. सभेचे प्रथम अध्यक्ष सच्चिदानंद सिन्हा होते. त्यांनी आपल्या भाषणात अमेरिका, फ्रान्स, स्वित्झर्लंड आदी देशांतील घटनांचा परामर्श घेऊन म्हटले, की 'संविधानाच्या इमारतीची रक्षक सामान्य जनता जर मूर्खतापूर्ण, उपेक्षापूर्ण आणि आचाररहित व्यवहार करणार असेल, तर ही इमारत क्षणभरात उद्ध्वस्त होईल. गणतंत्र व्यवस्थेची स्थापना नागरिकांची बुद्धिमत्ता, त्यांची जनसेवेची भावना आणि त्यांची गुणग्राहकता या आधारावर होते; परंतु प्रामाणिक राहण्याचे धैर्य दाखवतात म्हणून बुद्धिमान आणि विवेकपरायण व्यक्तींना जेव्हा जनसभेतून बहिष्कृत करण्यात येते आणि सिद्धांतहीन व्यक्ती जनतेला धोका देण्याच्या हेतूने जनतेची खोटी प्रशंसा करून आणि लांगुलचालन करून सन्मान प्राप्त करतात, तेव्हा गणतंत्र व्यवस्था नष्ट होते, हे सर्वांनी लक्षात असू द्यावे असे मला वाटते.'

भारतातील तत्त्वशून्य, भ्रष्ट राजकारण्यांसाठी आणि येथील मूर्खतापूर्ण, उपेक्षापूर्ण आणि आचाररहित जनतेसाठी हा एक संदेश आहे. घटना राबवणारे लोक नालायक असू शकतात. कारण कुठल्याही प्रकारे त्यांना सत्तेवर राहायचे असते; परंतु सर्वसामान्य जनतेने जागरूक राहण्याची आवश्यकता असते. कारण त्यांच्या संरक्षणासाठी, विकासासाठीच घटना असते. व्यक्तीची सुरक्षितता, स्वातंत्र्य, त्याची प्रतिष्ठा, त्याची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक शोषणापासून मुक्तता हे घटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. कुठलाही धर्म किंवा धर्मग्रंथापेक्षा घटना अधिक पवित्र आहे, याची जाणीव जनतेला असेल तरच व्यक्ती, समाज व राष्ट्र स्वतंत्र राहील व बलशाली होईल. ●●●

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत.)**

# आधुनिक पाश्चात्य विचारसरणी आणि मानवी हक्क संकल्पनेचा विकास



प्रा. नागार्जुन वाडेकर

**'मानवी हक्क' ही संकल्पना विकसित होत असताना जसे विविध संस्कृती, परंपरा आणि सम्राटांचे योगदान आहे, तसेच आधुनिक तत्त्ववेत्यांनी त्यांच्या विचारांतूनसुद्धा माणसांचे हक्क ही संकल्पना दृढ होत आली आहे. प्रस्तुत लेखात आपण आधुनिक काळातील पाश्चात्यविचारांतून विकसित मानवी हक्कांचा इतिहास पाहणार आहोत. आधुनिक युगामध्ये अनेक पाश्चात्य विचारवंतांनी वेगवेगळ्या सिद्धांताद्वारे मानवी हक्कांच्या उत्क्रांतीस हातभार लावला.**

माणसाला आपले जीवन आनंदी, सन्मानाने जगता यावे, व्यक्तित्वाचा विकास करून आयुष्य अर्थपूर्ण करता यावे याकरिता पोषक आणि सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे, हे आपण मागच्या लेखात पाहिले. १० डिसेंबर १९४८ रोजी संमत झालेला मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामासुद्धा हेच वैश्विक स्तरावर मान्य करताना स्पष्ट करतो, की सर्व माणसं स्वतंत्रपणे जन्माला येतात आणि हक्क व प्रतिष्ठेच्या बाबतीत समान असतात. तसेच तर्क आणि विवेकाने ते संपन्न असतात आणि त्यांनी एकमेकांशी बंधुभावाच्या भावनेने वागले पाहिजे.



'मानवी हक्क' ही संकल्पना विकसित होत असताना जसे विविध संस्कृती, परंपरा आणि सम्राटांचे योगदान आहे, तसेच आधुनिक तत्त्ववेत्यांनी त्यांच्या विचारांतूनसुद्धा माणसांचे हक्क ही संकल्पना दृढ होत आली आहे. प्रस्तुत लेखात आपण आधुनिक काळातील पाश्चात्यविचारांतून विकसित मानवी हक्कांचा इतिहास पाहणार आहोत. आधुनिक युगामध्ये अनेक पाश्चात्य विचारवंतांनी वेगवेगळ्या सिद्धांताद्वारे मानवी हक्कांच्या उत्क्रांतीस हातभार लावला.

**ॲरिस्टॉटल (ई.स.पूर्व चौथे शतक)**

ॲरिस्टॉटल हा ग्रीक तत्त्वज्ञ आणि वैज्ञानिक होता. त्याला पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि राजकीय विज्ञानाचे संस्थापक मानले जाते. ॲरिस्टॉटलने मानवी हक्कांविषयी असे सिद्धांतन केले नव्हते; परंतु त्याच्या नैसर्गिक कायदा आणि न्यायाच्या सिद्धांताचा मानवी हक्कांच्या नंतरच्या विचारवंतांवर प्रभाव पडला. त्याच्या मते, मानव तर्कसंगत प्राणी आहे. सद्गुण आणि विवेकाने जगून आनंद मिळविण्याचा त्याचा नैसर्गिक हेतू आहे. मानव सामाजिक आणि राजकीय प्राणी असल्याने त्याला कायदे आणि घटनांद्वारे शासित असलेल्या, चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणाऱ्या, लोकांमधील नैसर्गिक मतभेदांचा आदर करणाऱ्या समुदायामध्ये राहणे गरजेचे वाटते. ॲरिस्टॉटलने नागरिकांना मुक्त आणि समान सहभाग घेण्यास आणि विचारविनिमय करण्यास अनुमती देईल, अशा राजेशाही, उमराव आणि लोकशाही एकत्र असणाऱ्या मिश्रव्यवस्थेचा विचार मांडला. त्याच्या मते, अशी नैसर्गिक विवेकी प्रणाली असावी, जिथे न्यायाच्या व्यवस्थेस खरोखर आधार मिळेल. त्याच्या 'पोलिटिक्स' या ग्रंथाचा नंतर आलेल्या नैसर्गिक कायदा, न्याय, लोकशाही आणि मानवी हक्कांच्या सिद्धांतांवर प्रभाव दिसतो.

**थॉमस ॲक्विनास (१२२५-१२७४)**

ॲक्विनास हा एक इंग्लिश तत्त्ववेत्ता होता. त्याच्या मते, योग्यरित्या कार्यरत बुद्धी असलेल्या आणि जगाच्या अनुभवाचा अभ्यास असणाऱ्या प्रत्येकाला कल्पना आहे, की नैसर्गिक कायद्यात काही मूलभूत आणि स्पष्ट नियम असतात. त्याच्या मते, सर्व मानवांना जन्मजात प्रतिष्ठा व मूल्य आहे आणि ही प्रतिष्ठा व मूल्य हाच मानवी हक्कांचा आधार आहे. मानवांना जीवनाचा, स्वातंत्र्याचा

आणि आनंदाचा पाठपुरावा करण्याचा हक्क आहे, तसेच मानवांना मालमत्तेचा हक्क आहे आणि हा अधिकार नैसर्गिक कायद्यावर आधारित आहे. नैसर्गिक कायदा हा सर्व मानवी हक्कांचा आधार आहे आणि तो सर्व न्याय्य कायद्यांचा पाया आहे, यावर त्याचा विश्वास होता.

**ह्युगो ग्रोटियस ((१५८३–१६४५)**

ह्युगो ग्रोटियस हा डच तत्त्ववेत्ता होता. त्याच्या मानवी हक्कांची आधुनिक संकल्पना ॲरिस्टॉटलच्या विचारांवर आधारलेली आहे. त्याच्या मते, मानव प्राणी स्वभावतः समंजस आणि समाजप्रिय आहे. त्याला शांततेने आणि एकोप्याने जीवन जगण्याची इच्छा असते. त्याने नैसर्गिक हक्कांच्या आधुनिक संकल्पनेची ओळख करून दिली. ग्रोटियस म्हणतो, प्रत्येक जण स्वतंत्र आहे, आपल्या स्वतः च्या अधिकारक्षेत्रात स्वायत्त आहे. स्वतःचा जीव वाचविण्याच्या उद्देशाने प्रत्येकास स्वाभाविक हक्क असतात. मानवास मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क प्राप्त झालेले आहेत. म्हणून प्रत्येकाने हे मान्य केले पाहिजे, की प्रत्येक व्यक्ती स्वतःचा जीव वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा हक्कदार आहे. त्याच्या स्वाभाविक हक्कांच्या संकल्पनेची सुरुवात व्यक्तीपासून होते. पण त्यात तो संपूर्ण मानवजातीचा समावेश करतो. राज्याराज्यांमधील संबंध दृढ होण्यासाठी आणि युद्धावर नियम लागू करण्यासाठी त्याने युद्धाशी संबंधित समस्यांवर प्रकाश टाकला. त्याच्या मते, युद्ध म्हणजे 'न टाळता येणारा विनाश' आहे. त्याच्या युद्ध आणि शांततेच्या कायद्यावर या पुस्तकावरून त्याला आधुनिक आंतरराष्ट्रीय कायद्याचे जनक मानले जाते.

**थॉमस हॉब्ज (१५८८ – १६७९)**

थॉमस हॉब्ज या एका महत्त्वाच्या ब्रिटिश आधुनिक तत्त्ववेत्त्याने (Social Contract Theory) 'सामाजिक कराराचा सिद्धांत' मांडला. या सिद्धांतावर १६४२ साली ब्रिटनमध्ये झालेल्या नागरी युद्धातील त्याच्या अनुभवांचा आणि राजाला दिल्या गेलेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेचा प्रभाव पडलेला दिसतो. त्याच्या मतानुसार, जनतेने आपल्या संरक्षणासाठी आणि अधिक सक्रिय समाजासाठी आपले व्यक्तिगत अधिकार राज्याच्या स्वाधीन केलेले असतात. पूर्वी प्रत्येक व्यक्ती नैसर्गिक साधनसंपत्तीसाठी दुसऱ्याला मारत होती, म्हणून जनतेने राज्याला आपले नैसर्गिक कायदे, अधिकार आणि स्वातंत्र्य बहाल केले. त्याबदल्यात त्यांना नागरी हक्क आणि सुरक्षितता प्राप्त झाली. अशा प्रकारे राज्याच्या निर्मितीचा सामाजिक करार प्रत्यक्षात आला म्हणून जनतेच्या त्या अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारांची असली पाहिजे. त्याच्या मते, मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या जीविताची सुरक्षितता होय. जीविताच्या सुरक्षेचा हक्क अन्य कोणत्याही हक्कांपेक्षा सर्वतोपरी आहे, मूलभूत स्वरूपाचा आहे. हॉब्जने अधिकारयुक्त राज्य सुचविलेले असले, तरी प्रत्येकाने आपल्या काही मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी, स्व-हितासाठी सामाजिक कराराच्या माध्यमातून राज्याची निर्मिती केलेली असते. त्यामुळे राज्याने जनतेला विश्वासात घेऊन शासन चालवायला हवे. अशा प्रकारे मानवी हक्कांच्या विकासामध्ये सामाजिक कराराच्या सिद्धांताची संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारक होती.



**जॉन लॉक (१६३२ – १७०४)**

जॉन लॉक हा आणखी एक महत्त्वाचा ब्रिटिश तत्त्वज्ञ होऊन गेला. त्याच्या मते, मनुष्यप्राणी हा मुळात मुक्त, समान आणि स्वतंत्र आहे. म्हणून शांतता, सदिच्छा आणि परस्पर सहकार्य या स्वाभाविक परिस्थिती टिकवण्याच्या अटी आहेत. कायदा बनविणाऱ्या, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या आणि कायद्याच्या संदर्भात निर्णय देणाऱ्या संस्थांच्या अभावातून असुरक्षितता निर्माण झाली म्हणून संरक्षण आणि सुरक्षेच्या बदल्यात आपले काही वैयक्तिक हक्क सोडण्याचे मान्य करून व्यक्तीने सामाजिक कराराची निर्मिती केली. लॉकच्या मते, जीवन, स्वातंत्र्य आणि मालमत्तेच्या मूळ हक्कांसह लोक मुक्त आणि समान जन्मतात. आपल्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी प्रत्येक व्यक्तीने परस्परांमध्ये जो करार केला, त्यातूनच राज्याची निर्मिती झाली. लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्याची असते, तर लोकांना त्यांच्या सरकारला संमती देण्याचा आणि त्यांच्या नैसर्गिक हक्कांचे उल्लंघन केल्यास त्यास प्रतिकार करण्याचा किंवा उलथून टाकण्याचा हक्क असल्याचा दावा त्याने केला. लॉकने प्रत्येक व्यक्तीस केंद्रस्थानी ठेवले आणि त्याला अदेय (देऊन टाकता न येणारे) असे नैसर्गिक हक्क आहेत, असे सांगितले. कोणत्याही व्यक्तीने अन्य व्यक्तींच्या जीवन, आरोग्य, स्वातंत्र्य किंवा कब्जा यामध्ये ढवळाढवळ करता कामा नये. लॉकने मानवी प्रतिष्ठा आणि आनंदासाठी आवश्यक म्हणून धार्मिक सहिष्णुता आणि विवेकाच्या स्वातंत्र्याचा बचाव केला. या कल्पना आधुनिक लोकशाही सरकारच्या आणि हक्कांच्या मूलभूत संकल्पना बनलेल्या आहेत. त्याच्या नैसर्गिक कायदा आणि नैसर्गिक हक्कांच्या सिद्धांताचा अमेरिकन आणि फ्रेंच क्रांतीवर प्रभाव पडला. लॉकने दिलेल्या या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्याला आधुनिक राजकीय तत्त्वज्ञान आणि उदारमतवादाचे संस्थापक म्हणून

ओळखले जाते.

**चार्ल्स मॉन्टेस्क्यू (१६८९ – १७५५)**

मॉन्टेस्क्यू हा प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ त्याच्या स्वातंत्र्याच्या संस्थेविषयक लिखाणातील तत्त्वासाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या 'मुक्तिवाद्यांची वैशिष्ट्ये'मध्ये त्याने नैसर्गिक कायद्याच्या तत्त्वासह आणि काही अंशी नैसर्गिक हक्कांच्या अविकसित तत्त्वांसह स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनास पाठिंबा दिलेला आहे. मॉन्टेस्क्यूचा स्वाभाविक कायदा आणि हक्कांवर आणि विशेषत: स्वातंत्र्याच्या हक्कांवर विश्वास आहे. मॉन्टेस्क्यू हा कट्टर धार्मिक असल्याने व्यक्तिवादी नव्हता. त्याने दैवी कायद्यावर भर दिला, तसेच त्याने काही अंशी मानवी हक्कांच्या लौकिक रूपांतरावर जोर दिला. त्याने 'पार्शियन पत्रे' आणि 'कायद्याचे सत्व'मध्ये मांडलेल्या स्वातंत्र्याच्या मुद्यावरून असे दिसून येते, की तो राजकीय आणि कायदेशीर संस्थांचे योग्य परीक्षण करण्यासाठी तत्पर होता. स्वातंत्र्याशी त्याची बांधिलकी होती. मॉन्टेस्क्यूने आनंदाचा पाया म्हणून स्वातंत्र्याकडे पाहिले. त्याला विश्वास होता, की राजकीय स्वातंत्र्य हे व्यक्ती, संस्था आणि सामाजिक वर्ग यांच्यामधील सत्ता विभाजनावर अवलंबून आहे. संस्थात्मक पातळीवरसुद्धा व्यक्तिगत स्वातंत्र्याची हमी मिळविण्यासाठी वैधानिक, कार्यकारी आणि न्यायिक प्रक्रियेमध्ये सत्तेचे विभाजन होणे आवश्यक आहे, यावर त्याने भर दिला. शासनाच्या साधनांचे परीक्षण आणि शिल्लक रकमेची त्याची कल्पना आधुनिक राज्य आणि लोकशाही शासनाचा पाया बनलेली आहे.

**जीन जॅक रुसो (१७१२–१७७८)**

रुसो हा एक फ्रेंच तत्त्वज्ञ होता. त्याने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पनांना महत्त्व दिले. रुसोने सामान्यपणे समाजाच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, प्रत्येक व्यक्तीस अस्तित्व राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या किमान सर्व गोष्टींची हमी देणे ही समाजाची सामुदायिक जबाबदारी आहे. मानव मूलतः चांगले आहेत; परंतु समाज त्यांना भ्रष्ट करतो. त्याच्या मते, मानवांना स्वातंत्र्याचा नैसर्गिक हक्क आहे आणि या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी राज्याची भूमिका असावी. सामाजिक कराराच्या संकल्पनेनुसार समाज आणि सरकार तयार करण्यासाठी व्यक्तींमध्येही करार आहे. त्याचा असा विश्वास होता, की मानवांना स्वातंत्र्याचा नैसर्गिक हक्क आहे आणि सरकार लोकांच्या इच्छेवर आधारित असावे. ज्या सरकारमध्ये सर्व नागरिकांचा सहभाग नसतो, अशा सरकारच्या कायदेशीरपणावर रुसोचा विश्वास नाही. त्याच्या मते, लोकमान्य सार्वभौमत्वातून प्राप्त झालेले सर्व नागरी अधिकार अदेय आहेत. रुसोच्या मते, कायदे आणि अधिकार 'सामान्य इच्छेतून' जन्म घेतात. शासनाचा कायदा केवळ सामान्य इच्छा व्यक्त करतो. सर्वसामान्य इच्छा ही नेहमीच बरोबर असते आणि संपूर्ण समाजासाठी कल्याणकारी असते. त्याच्या सिद्धांताचा १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीवर आणि त्यानंतर समाजवादी चळवळीच्या निर्मितीवर प्रभाव पडला.

**इमॅन्युअल कांट (१७२४ – १८०४)**

इमॅन्युअल कांट हा जर्मन तत्त्ववेत्ता होता. त्याच्या मते, प्रत्येक व्यक्तीस काही मूलभूत हक्क असतात. त्या हक्कांना कायद्याने संरक्षण मिळाले पाहिजे. कांटने स्वाभाविक हक्क आणि संपादन केलेले हक्क यांच्यामध्ये फरक केलेला आहे. त्याने मानवी स्वातंत्र्य या केवळ एकाच नैसर्गिक हक्काला मान्यता दिलेली आहे. मानवी स्वातंत्र्य हे सामान्य कायद्यानुसार प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्यासह एकाच वेळी अस्तित्वात असल्याप्रमाणे असते. कांटने असे सुचविले आहे, की सर्वांचे कल्याण होईल असे प्रत्येकाने कार्य केले पाहिजे. प्रत्येकाचे वैयक्तिक स्वातंत्र्य इतरांच्या स्वातंत्र्याला मारक ठरता कामा नये. मानवाचे मूल्य आणि प्रतिष्ठा समान आहे आणि प्रत्येकाला आदराने वागविले पाहिजे आणि हानीपासून संरक्षित केले पाहिजे. मानवांना स्वातंत्र्य आणि सन्मानाचा हक्क आहे आणि त्यांना कधीही संपुष्टात आणले जाऊ नये. त्याकाळी वैयक्तिक स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या बहुसंख्याकांच्या नियमावलीवर विश्वास असणाऱ्या लोकशाहीला म्हणजेच 'प्रत्यक्ष लोकशाहीला' त्याचा विरोध होता. मानवी हक्कांवरील कांटची संकल्पना नैतिकतेच्या आणि विवेकबुद्धीच्या तत्त्वांवरून तयार झालेली आहे. कांटची मानवी हक्कांची संकल्पना म्हणजे नैतिक पाया आहे. नैतिकता कर्तव्याच्या किंवा कर्तव्याच्या भावनेवर आधारित आहे. नैतिकतेवर आणि विवेकबुद्धीच्या तत्त्वांवर आधारलेल्या हक्कांच्या संकल्पनेला विश्वव्यापी किंवा सार्वत्रिक बनविणे, तसेच हक्कांचा उपभोग घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अटींनुसार शांततेच्या आवश्यकतेवर कांटने भर दिला आहे.

**थॉमस पेन (१७३५–१८०९)**

थॉमस पेन एक ब्रिटिश–अमेरिकन उदारमतवादी तत्त्वज्ञ, लेखक आणि राजकीय कार्यकर्ता होता. त्याने मानवी हक्कांची आधुनिक समज निर्माण करण्यास मदत केली. त्याच्या 'कॉमन सेन्स' आणि 'अमेरिकन क्रायसिस' या ग्रंथांनी अमेरिकन क्रांती आणि फ्रेंच क्रांतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. वसाहतवाद्यांना ब्रिटनमधून स्वातंत्र्य घोषित करण्याचे आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याचे आवाहन केले. त्याने 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथातून फ्रेंच राज्यक्रांतीचा बचाव केला आणि लोकशाही, प्रजातंत्र, मानवी हक्क आणि समाजकल्याण यांची पाठराखण केली. त्यानंतर 'द एज ऑफ रीझन'मधून संघटित धर्माला आव्हान दिले आणि तर्कसंगततेला प्रोत्साहन दिले. तो स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सार्वत्रिक मानवी हक्कांचा पुरस्कर्ता होता. त्याच्या या कृतींचा नंतरच्या लोकशाही, सामाजिक न्याय आणि जगभरातील मानवी हक्कांच्या चळवळींवर परिणाम झाला. त्याने सरकारची कायदेशीरता आपल्या नागरिकांच्या संमतीवर अवलंबून असते आणि सर्व लोकांचे हक्क सरकारद्वारे संरक्षित केले पाहिजेत, ही कल्पना मांडली.

**जेरेमी बेन्थॅम (१७४८–१८३२)**

बेन्थॅम हा अजून एक इंग्लिश तत्त्ववेत्ता होता. त्याने त्याच्या प्रसिद्ध अशा उपयुक्ततावादाच्या सिद्धांतामध्ये अदेय हक्कांच्या संकल्पनेस निराधार म्हणून नापसंती दर्शविलेली आहे. त्याला असे वाटते, की कायद्यांचा उगम स्वभाव नसून उपयुक्ततेचा सुजाण हेतू आहे. बेन्थॅमच्या मते, सर्व गोष्टींचा स्त्रोत, प्रमाण, उपयुक्तता, व्यक्ती, शहाणपण, भावना, स्वायत्तता, स्वयं– शासनाची आणि स्वयं–निदेशाची सक्षमता इत्यादी गोष्टींमध्ये आहे. 'दुःख आणि आनंद' हा बेन्थॅमच्या उपयुक्ततावादाचा पाया आहे. प्रत्येक माणूस


सुखी होण्याचा आणि दुःख टाळण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याच्या मते, आनंद आणि दुःख यांचे काही घटकांच्या आधारावर मूल्यांकन करता येते. उदाहरणार्थ, तीव्रता, कालावधी, निश्चिती, इत्यादी. कायद्याचे सुकृत्य किंवा कुकर्म यांचे मोजमाप करता येऊ शकते. हे मोजमाप माणसाच्या दुःख आणि आनंद यांच्या स्वानुभवावर करता येईल. म्हणून जास्तीत जास्त संख्येने लोकांना सुखी करणे हे राज्याचे आणि कायद्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. राज्य जेव्हा व्यक्तीच्या आणि समुदायाच्या हितसंबंधांचा आदर राखील तेव्हाच हे शक्य होईल, असे त्याला वाटते. त्याने व्यक्तिगत हक्क किंवा आनंदाबरोबर सामुदायिक हक्क किंवा आनंददेखील महत्त्वाचे असतात, यावर भर दिला.

**मेरी वॉल्स्टोनक्राफ्ट (१७५९–१७९७)**

मेरी वॉल्स्टोनक्राफ्ट या एक इंग्लिश लेखिका, तत्त्ववेत्त्या आणि महिलांच्या हक्कांसाठी झगडणाऱ्या कार्यकर्त्या होत्या. त्यांनी असा युक्तिवाद केला, की महिलांना पुरुषांप्रमाणेच हक्क असले पाहिजेत. महिलांना शिक्षणामध्ये समान प्रवेश आणि सार्वजनिक जीवनात भाग घेण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. शिक्षणाचा हक्क, राजकीय प्रतिनिधित्व आणि आर्थिक संधी यांसह महिला आणि पुरुषांना समान हक्क असावेत. हे हक्क न्याय्य आणि नैतिक समाज तयार करण्यासाठी आवश्यक आहेत, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या मते, महिलांच्या हक्कांचा अभाव पुरुष आणि स्त्रियांमधील अंतर्निहित मतभेदांमुळे नसून सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे आहे.

**जॉन स्ट्यूअर्ट मिल (१८०६–१८७३)**

जॉन स्ट्यूअर्ट मिल हा आणखी एक महत्त्वाचा ब्रिटिश तत्त्वज्ञ होऊन गेला. त्याने 'ऑन लिबर्टी' या ग्रंथात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संवेदनशील समर्थन करून उपयुक्ततावादाला कडाडून विरोध केला आहे. बहुमत मिळवून जुलमी राजवट अमलात आणण्याचा उपयुक्ततावाद हा एक प्रकार आहे, असे त्याचे मानणे आहे. मिल असे म्हणतो, की बौद्धिक आणि सामाजिक प्रगतीसाठी मुक्त संभाषण ही एक आवश्यक अट आहे. मौन राहिल्यामुळे सत्य पूर्णपणे समजत नाही. त्याच्या मते, अभिव्यक्ती व समूह–स्वातंत्र्य निरपवाद असू शकत नाही. आपापले स्वातंत्र्य प्राप्त करण्याची इतर व्यक्तींची क्षमता हिरावून न घेता असे स्वातंत्र्य अस्तित्वात असले पाहिजे. मिलने कोणत्याही स्वरूपातील गुलामगिरी, महिलांचे दमन आणि बहुमताने वर्चस्व मिळविणे याविरुद्ध आवाज उठवला. त्याने त्याच्या प्रातिनिधिक सरकारवरील विचारांमध्ये युरोप आणि अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविणाऱ्या चळवळींना पाठिंबा दिला. महिला या समाजाच्या महत्त्वाच्या घटक आहेत आणि महिलांना राजकीय निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये समान हक्क मिळाले पाहिजेत, असे त्याला वाटते. प्रातिनिधिक सरकार हा शासनाचा सर्वोत्तम नमुना आहे याबाबत मिल सहमत असला, तरी त्याला बहुमताच्या जुलमी राजवटींची भीती वाटते. त्याच्या मते, बहुमत हे नेहमीच बरोबर असते असे नाही. बहुमत अल्पसंख्याकांच्या मतास वश करण्याचा प्रयत्न करीत असते. मिलला वाटणारी ही भीती आजच्या मानवी हक्कांसाठी धोक्याची सूचना आहे.




**जॉन रॉल्स (१९२१ – २००२)**

जॉन रॉल्स हे एक उदारमतवादी अमेरिकन तत्त्वज्ञ होते. त्यांनी स्वाभाविक कायद्याच्या सिद्धांताचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, न्यायाची मूलभूत तत्त्वे ही सामान्य गरजा प्राप्त करण्याचे सर्वसामान्य मार्ग आहेत. त्यांच्या 'द थिअरी ऑफ जस्टीस'मध्ये जॉन रॉल्स असा युक्तिवाद करतात, की स्वातंत्र्य आणि समानता या एकमेकांना पर्यायी संकल्पना नाहीत. रॉल्स ठामपणे सांगतात, की न्याय टिकवून ठेवण्याची एकमेव तार्किक प्रणाली म्हणजे लिंग, वर्ग किंवा वंशाची पर्वा न करता लोकांना समान वागणूक देणे. त्यांनी 'प्राथमिक सामाजिक मालमत्ता' यामध्ये मूलभूत स्वातंत्र्य, संधी, अधिकार आणि किमान संपत्ती यांचा समावेश केला आहे.

मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यात (१९४८) पुन्हा एकदा नैसर्गिक आणि अदेय हक्कांवर भर दिला गेला. प्रत्येक व्यक्तीच्या नैसर्गिक आणि अदेय हक्कांची कल्पना, म्हणजे या उत्क्रांतीचा पाया होय. हक्कांच्या या सिद्धांतास कित्येक विचारवंतांनी आव्हान दिलेले होते, तरी तो पुनरुज्जीवनाचा कालावधी होता. आता आपण मानवी हक्कांवरील जागतिक, अविभाज्य आणि अदेय अर्थबोधन पाहत असतो. अशा तऱ्हेने मानवी हक्कांची प्रचलित संकल्पना ही बऱ्याचशा पाश्चात्य विचारवंतांनी दिलेल्या योगदानाचे फलित आहे. आज आपण मूलभूत हक्क, मानवी हक्क आणि व्यक्तीस्वातंत्र्याचा वापर करताना हे लक्षात घ्यायला हवे, की हे आपल्यापर्यंत सहज आलेले नाही, तर त्यासाठी प्रदीर्घ संघर्ष करावा लागलेला आहे. त्यामुळे आपल्या प्रत्येकावर दुसऱ्याच्या हक्कांच्या रक्षणाची आणि त्याचा गैरवापर होणार नाही हे पाहण्याची मोठी जबाबदारी आहे.

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# भारतीय पत्रकारितेतील पहिले स्टिंग ऑपरेशन घडवून आणणारे : गोपाळराव जोशी



कामिल पारखे

**गोपाळराव जोशी यांचे 'ग्रामण्य प्रकरण किंवा पंचहौद चर्चमधील चहापान प्रकरण' हे स्टिंग ऑपरेशन महाराष्ट्राच्या आणि भारतीय इतिहासात गाजलेले आणि सर्वपरिचित असले, तरी भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात या प्रकरणाची साधी दखलही घेतली जात नाही.**

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास गोपाळराव जोशी हे नाव वगळून पूर्ण होऊच शकत नाही. आधुनिक वैद्यकशास्त्रात पदवी मिळवणाऱ्या डॉक्टर होणाऱ्या हिंदुस्थानातल्या पहिल्या महिला आनंदीबाई जोशी यांचे पती म्हणून गोपाळराव जोशी ओळखले जात असले तरी, ही त्यांची पूर्ण ओळख नाही. इतिहासात मात्र हे पात्र नकारात्मक दृष्टिकोनातून, त्यांच्या विविध अवगुणांवर बोट ठवून रंगवले गेले आहे. एक इरसाल, विक्षिप्त हेकेखोर व्यक्ती, आपल्या बायकोने शिकावं, डॉक्टर व्हावं म्हणून त्यांचा खूप छळ करणारा नवरा, पुण्यातल्या आणि मुंबईतल्या भल्याभल्या लोकांना जेरीस आणणारा, पण अत्यंत बुद्धिमान असणारा गोपाळराव जोशी अगदी वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. वर उल्लेख केलेली अनेक स्वभाववैशिष्ट्ये गणपतरावांच्या जीवनातील विविध प्रसंगांतून दिसून येतात. श्री. ज. जोशी यांनी आनंदीबाई आणि गोपाळराव जोशी.. यांच्या जीवनांवर लिहिलेली 'आनंदी गोपाळ' ही कादंबरी बरीच गाजली. मात्र गोपाळराव यांच्या एका वेगळ्याच कामगिरीकडे पूर्ण दुर्लक्ष झालं आहे. ती कामगिरी म्हणजे भारतीय पत्रकारितेच्या आणि नियतकालिकांच्या इतिहासात एक वैशिष्ट्यपूर्ण भूमिका त्यांनी बजावली. त्यांनी केलेल्या या कामगिरीकडे नुसते उपद्व्याप, चहाटळपणा, नुसती उठाठेव अशा दृष्टिकोनातून बघितलं गेलं आहे.

**ग्रामण्य प्रकरण किंवा पंचहौद चर्चमधील चहापान प्रकरण**

गोपाळ विनायक जोशी यांची ही अभूतपूर्व कामगिरी म्हणजे भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात विसाव्या शतकाच्या अखेरीस त्यांनी अगदी ठरवून घडवून आणलेले एक स्टिंग ऑपरेशन. त्यांच्या या स्टिंग ऑपरेशनमध्ये पुण्यातील विविध क्षेत्रांतील भलीभली, थोर मंडळी अलगदपणे अडकली. गोपाळरावांचे हे स्टिंग ऑपरेशन ग्रामण्य प्रकरण किंवा पंचहौद चर्चमधील चहापान प्रकरण म्हणून इतिहासात अधिक प्रसिद्ध आहे. मात्र या प्रकरणात गोपाळराव जोशी खलनायक म्हणून रंगवले जातात आणि नायकाची भूमिका जाते बळवंतराव ऊर्फ लोकमान्य टिळक यांच्याकडे. न. चिं. केळकर यांनी



लिहिलेल्या लोकमान्य टिळक यांच्या चरित्रात, रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या आत्मचरित्रात आणि त्या काळात लिहिलेल्या गेलेल्या अशा अनेक ग्रंथांत या चहाच्या पेल्यांसंबंधीच्या वादळाविषयी विस्तृतपणे लिहिलं गेलं आहे.

**गोपाळराव त्यावेळी पूर्णवेळ पगारी बातमीदार नव्हते**

स्टिंग ऑपरेशन या सदरात येणारे सर्व घटक गोपाळरावांच्या या उपद्व्यापात आहेत. ही घटना गोपाळरावांच्या तल्लख बुद्धीने एक विशिष्ट उद्देश ठेवून आणि खूप दिवस आधीच ठरवून घडवून आणली आहे. घडल्यानंतर उद्दिष्ट साधण्यासाठी पुण्यातल्या 'पुणे वैभव' या वृत्तपत्रात हा सर्व वृत्तांत भरपूर रंगवून त्यात चवीसाठी आणखी मीठमसाला टाकून छापून आणला आहे. विशेष म्हणजे, स्टिंग ऑपरेशनमध्ये या खळबळजनक वृत्ताचे श्रेय गोपाळरावांना देण्यात आलं आहे. या बातमीला गोपाळराव जोशी यांची बाय लाईन म्हणजे नाव आहे. अर्थात, गोपाळराव त्यावेळी पूर्णवेळ पगारी बातमीदार नव्हते. त्याकाळी अशी पगारी नोकरी अपवादाने असणार. कारण नियतकालिकांचे मालक, संपादक एक तर हौशी किंवा ध्येयवादी

असत.

**विविध क्षेत्रांतील लोकांचा स्टिंग ऑपरेशनसाठी भरणा**

ही बातमी पूर्ण तपशीलवार प्रसिद्ध झाल्यानंतर योग्य तो किंवा गोपाळरावांना अपेक्षित असलेला परिणाम लगेचच झाला. पुण्यातले समाजजीवन त्यामुळे पूर्ण ढवळून निघाले. त्यात मग इतर अनेकांनी आपली पोळी भाजून घेतली. या चहापानाच्या प्रकरणात कोणकोण अडकले होते याची नुसती यादी पाहिली, तरी त्यावरून विविध क्षेत्रांत उडालेला धमाका लक्षात येईल. एखाद्या सुगरणीने खाद्यपदार्थांच्या चवीसाठी विविध घटकांचा वापर करावा, तसे गोपाळरावांनी आपले डोके वापरून पुण्यातील सामाजिक, राजकीय, सनातनी, पुरोगामी अशा विविध क्षेत्रांतील लोकांचा या स्टिंग ऑपरेशनसाठी भरणा केला होता.

या लोकांमध्ये देशातील एक प्रमुख राजकीय आणि सामाजिक नेते असलेले लोकमान्य बाळ गंगाधर टिळक होते, न्यायमूर्ती म. गो. रानडे होते, भारत सेवक समाजाचे संस्थापक आणि नंतर उदयास येणाऱ्या गांधीजींचे गुरु गोपाळ कृष्ण गोखले, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे वगैरे वगैरे.

या प्रकरणात मुख्य व्यक्ती आणि सर्वाधिक हानी पोहोचणारी व्यक्ती अर्थातच लोकमान्य टिळक होते. दीड-दोन वर्षे या प्रकरणामुळे खूप लोकांना, खूप कुटुंबांना मनस्ताप सहन करावा लागला. पुण्यातल्या दोन विरुद्ध टोकांना असलेल्या लोकांनी या वेळी प्रतिस्पर्धी गटावर पुरता हल्ला करून या प्रकरणातली रंगत अनुभवली. दीर्घकाळ चाललेल्या या ग्रामण्य प्रकरणात लोकमान्य टिळकांना दोनदा प्रायश्चित घ्यावे लागले. या प्रकरणाचा सक्षमोक्ष लावण्यासाठी आणि दोषी लोकांना शिक्षा सुनावण्यासाठी खुद्द शंकराचार्यांची मदत घेण्यात आली होती.

विशेष म्हणजे, गोपाळराव जोशी यापैकी कुठल्याही गटात मोडणारे नव्हते. या स्टिंग ऑपरेशनमुळे पत्रकार गोपाळराव जोशी यांचे एकमेव इप्सित साध्य झाले. हे उद्दिष्ट म्हणजे त्याकाळच्या पुणे शहरातील लोकांचा सनातनीपणा, सुधारक मंडळींची प्रत्यक्ष जीवनातील विसंगती उघडकीस आणणे. हां, इथं सांगायलाच हवं, तर गोपाळराव जोशी हे भारतीय कुटुंब नियोजन चळवळीचे आद्य प्रवर्तक र.धों. कर्वे यांच्या सहकारी शकुंतला परांजपे यांचे चुलत आजोबा, सिने-दिग्दर्शिका सई परांजपे यांचे चुलत पणजोबा.

**ख्रिस्ती धर्माची टिंगल आणि हिंदू धर्माचीही टिंगलच!**

शकुंतला परांजपे यांनी गोपाळराव जोशी यांचं व्यक्तिचित्र रेखाटलं आहे. 'निवडक शकुंतला परांजपे' या पुस्तकात हा लेख आहे. या लेखात शकुंतलाबाई लिहितात, ''गोपाळरावांना ढोंग आणि दांभिकपणा बिलकुल खपत नसे. नाना सोंग करून दुसऱ्याचं ढोंग चव्हाट्यावर आणण्याची त्यांना फार खोड. पाणी शिंपडल्यानं माणूस बदलतो काय, असं म्हणून स्वारी बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती झाली आणि पुढल्या रविवारी प्रार्थनेच्या वेळी धोतर नेसून उघड्या पोटावर जानवे घालून चर्चमध्ये जाऊन बसली. तेव्हा तेथील पादऱ्यानं हळूच सुचवलं, की तुम्ही आता ख्रिस्ती झालात, तेव्हा जानवं वगैरे काढून नीट पोशाख करावा. जानवं घालू नये. असं बायबलमध्ये कुठं सांगितल आहे? असा सवाल गोपाळरावांनी पादऱ्याला केला आणि लवकरच संगमात स्नान करून, आता माझी सर्व पाप धुवून निघाली आणि मी पूर्ववत हिंदूच आहे, असा आधार धर्मग्रंथातून भटभिक्षुकांना दाखवला. ख्रिस्ती धर्माची टिंगल आणि हिंदू धर्माचीही टिंगलच!'' गोपाळरावांच्या अशा या व्यक्तिमत्त्वाला साजेसं असं हे स्टिंग ऑपरेशन आहे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' नियतकालिक सुरू करून मराठी पत्रकारितेचा पाया रचला. महाराष्ट्र सरकारतर्फे ६ जानेवारी हा पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. 'दर्पण'च्या स्थापनेनंतर पाच दशकांनी म्हणजे १४ ऑक्टोबर १८८० रोजी गोपाळराव जोशी यांनी हे स्टिंग केलं. अर्थात, 'स्टिंग ऑपरेशन' हा पत्रकारितेत रूढ झालेला अलीकडचा शब्दप्रयोग.

भारताच्या इतिहासात काही वर्षांपूर्वी करण्यात आलेले काही स्टिंग ऑपरेशन्स खूप गाजले. भारतीय जनता पक्षाचे पहिले (आणि आतापर्यंतचे एकमेव) दलित पक्षाध्यक्ष म्हणून गाजावाजा केलेले बंगारु लक्ष्मण हे लाच घेताना एका स्टिंग ऑपरेशनमध्ये लोकांनी २००१ साली पाहिले. त्यावेळी केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार होते आणि त्यामुळे पक्षाध्यक्षाची मुदत पूर्ण होण्याआधीच बंगारु यांना दरवाजा दाखवण्यात आला होता. त्याच काळात जॉर्ज फर्नांडिस यांच्या समता पक्षाच्या नेत्या जया जेटली यांच्यासह इतरही स्टिंग ऑपरेशनमुळे वादाच्या भोवऱ्यात अडकले होते. हे स्टिंग ऑपरेशन 'तेहेलका डॉट कॉम' या न्यूज पोर्टलने केले होते.

लोकसभेचे अकरा सदस्य २००५ साली संसदेत प्रश्न विचारण्यासाठी लाच घेताना अशाच एका स्टिंग ऑपरेशनमध्ये पकडले गेले होते, त्यामध्ये भाजपचे सहा, बहुजन समाज पार्टीचे तीन आणि काँग्रेसचा आणि लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाचा प्रत्येकी एक खासदार होता. अलीकडच्या काळात मात्र स्टिंग ऑपरेशन घडवून आणण्याचं धाडस कुणाही वृत्त एजन्सीनं वा पत्रकारानं केलेलं नाही.

**एक अत्यंत यशस्वी स्टिंग ऑपरेशन**

गोपाळराव जोशी यांचे हे स्टिंग ऑपरेशन महाराष्ट्राच्या आणि भारतीय इतिहासात गाजलेले आणि सर्वपरिचित असले, तरी भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात या प्रकरणाची साधी दखलही घेतली जात नाही. पत्रकारितेसाठी देशातील पत्रकारितेच्या अभ्यासक्रमांत सोडा, महाराष्ट्रातील आणि पुणे-मुंबईच्या पत्रकारितेच्या अभ्यासक्रमांतसुद्धा या देशातील पहिल्यावहिल्या सर्वाधिक गाजलेल्या स्टिंग ऑपरेशनविषयी शिकवले जात नाही. पुण्यातील पंचहौद चहापान किंवा ग्रामण्य प्रकरण याकडे पत्रकारितेच्या माध्यमातून घडवून आणलेले एक अत्यंत यशस्वी स्टिंग ऑपरेशन या दृष्टिकोनातून मुळी कधी पाहिले गेलेले नाही. 'बदलती पत्रकारिता' (सुगावा प्रकाशन २०१८) या माझ्या पुस्तकात या स्टिंग ऑपरेशनवर एक प्रकरण आहे.

गोपाळराव जोशी यांचे एकूण व्यक्तिमत्व अत्यंत वादग्रस्त असले तरी देशाच्या पत्रकारितेच्या इतिहासात पहिलेवहिले स्टिंग ऑपरेशन घडवून आणून समाजजीवनातील अनेक विसंगती चव्हाट्यावर आणण्याचे श्रेय त्यांना निश्चितच द्यावे लागेल. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व ब्लॉगर आहेत.)**

# अभूतपूर्व ‘



# लाँग मार्च





**प्राचार्य**
**सलतान राठोड**

**आज 'लाँग मार्च' संपलेला असला तरी शासनाशी लढणे कॉम्रेड गावितांना काही नवीन नाही. १९७२ मध्ये सुरगाण्यात दुष्काळ पडला असताना रोजगार हमी योजनेंतर्गत होणारा भ्रष्टाचार असेल किंवा १२ जून १९८७ चा सुरगाणा तालुक्यातील वांगणबारी तथा दांडीची बारी येथील वन विभाग आणि अतिक्रमणधारक आदिवासी बांधव यांच्यातील लढा असेल, नाशिकमधील महामुक्काम मोर्चा असेल, जेलभरो असेल, रास्ता रोको असेल किंवा लाँग मार्च असेल याबाबतीत गावित नेहमी पुढे असतात व शासनाला आपल्या मागण्यांची जाणीव करून देतात.**

२०१८ मध्ये नाशिकवरून घोंगावत निघालेले लाल वादळ (लाँग मार्च) मुंबईत येऊन धडकले, सुपरफास्ट धावणारी मुंबई अचानक बंद पडू लागली अन् तत्कालीन फडणवीस सरकारला खडबडून जाग आली. त्यांनी त्वरित सर्व मागण्या मान्य केल्या. ऐतिहासिक लाँग मार्च शमवून सरकारलाही हायसे वाटले असावे, अन् मुंबईकरांनाही. मोकळा श्वास घेत पुन्हा मुंबईच्या गतीला सुरुवात झाली. गोरगरीब शेतकऱ्यांच्या मागण्या मुंबईकरही विसरले आणि तत्कालीन सरकारही. मात्र 'लाल वादळा'चे नेतृत्व करणारे हंगामी विधानसभा अध्यक्ष तथा माजी आमदार जे.पी. गावित विसरले तर ते कॉम्रेड कसले. कॉम्रेड गावित यांनी पुन्हा १२ मार्च २०२३ रोजी 'लाँग मार्च'चा एल्गार पुकारला अन् हजारो वन अतिक्रमणधारक शेतकरी, शेतमजुरांनी आपली शिदोरी आणि लाल निशाण घेऊन दिंडोरी, (जि. नाशिक) येथे जमत मुंबईचा पायी मार्ग धरला. पावलोगणिक उत्साह वाढत कष्टकऱ्यांची तुफान गर्दी जमा होत शिंदे सरकारची धडकी भरवू लागली. 'अभी नही, तो कभी नही' या उक्तीप्रमाणे कष्टकरी शेतकरी पेटून उठले आणि थंडी, वारा, ऊन, पावसाची तमा न बाळगता तीर्थयात्रेला जावे त्या आनंदोत्सवात कष्टकरी लाल वादळाच्या माध्यमातून गावित यांच्या नेतृत्वाखाली मुंबईला निघाले. अनुभव गाठीशी असलेल्या चाणक्य फडणवीसांनी शिंदेंना इशारा देत वादळ मुंबईबाहेरच थांबवण्याच्या सूचना केल्या. शिंदे सरकारनेही पालकमंत्री दादा भुसे यांना पुढे करत सदर वादळ गावितांच्या माध्यमातून मुंबईच्या बाहेरच थांबवण्याच्या सूचना केल्या. शिंदे सरकारने दिलेली जबाबदारी पार पाडताना नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या नाकी नऊ आले. असाच लाँग मार्च दोन वर्षांपूर्वी कोरोना काळाच्या अगोदर जे.पी. गावित यांनी हाक देत नाशिक ते मुंबई दुसरा लाँग मार्च सुरू केला होता. मात्र फडणवीसांचे चाणक्य समजले जाणारे गिरीश महाजन पालकमंत्री असताना त्यांनी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आपल्या सर्व मागण्या शासनाने मान्य केल्याचे सांगत वाडीवऱ्हे इथूनच हा मोर्चा मागे वळवला होता.

### 'लाँग मार्च' थांबविण्यात दादा भुसेंना अपशय

मात्र हा अनुभव गाठीशी असल्याने माजी आमदार जे. पी. गावित यांनी कोणत्याही प्रकारे सरकारशी तडजोड न करता विधानभवनावरच मोर्चा न्यायचा, या नेटाने पायी मोर्चा चालूच ठेवला. दादा भुसेंनी पुढाकार घेत लाँग मार्च थांबवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र त्यात त्यांना सपशेल अपयश आले. जे. पी. गावित यांनी सरकारशी चर्चा चालू राहील अन् लाँग मार्चही चालू राहील, अशी भूमिका घेतल्याने सर्वांचेच धाबे दणाणले. 'लाल वादळ' कसारा घाट उतरू लागले अन् मीडियाच्या माध्यमातून भारतभर 'लाल वादळा'चे वारे घोंगावू लागले तसे शिंदे सरकारच्या छातीत धडकी भरू लागली. गावितांवर प्रेम करणारी कष्टकरी जनता जिवाची तमा न बाळगता मजल दरमजल करीत कोरडी शिदोरी संपवत मुंबईकडे कूच करतच राहिली. अनेकांच्या पायांना फोड येत होते, पायातून रक्त निघत होते, म्हातारी माणसं मेटाकुटीला आली होती. तरीसुद्धा ही म्हातारी माणसं आम्ही मेलो तरी बेहत्तर पण माझ्या नातवाला माझी जमीन मिळाली पाहिजे, या ईर्षेने चालतच राहिली. २०१८ मध्ये दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा चालू असतानाच मुंबईमध्ये लाल वादळ धडकले होते. त्यावेळी गर्दीमुळे वाहतूक खोळंबणार अन् मुलांचा पेपर बुडणार या भीतीने पालकांच्या हृदयाचे ठोके चुकले होते. सरकारनेही त्यावेळी गावितांना मोर्चा थांबवण्याची व मुलांची गैरसोय टाळण्याची विनंती केली होती. मात्र कार्यकुशल असलेल्या गावितांनी सरकारचा डाव ओळखत रात्रीच मोर्चा आझाद मैदानावर नेत विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान तर टाळलेच; पण सरकारचे नाकही दाबले. एवढा अनुभव पाठीशी असताना या वेळेचे 'लाल वादळ' काहीही करून मुंबई बाहेरच थांबावे यासाठी शिंदे सरकारने आटोकाट प्रयत्न केले. स्वतः मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेत वेळोवेळी चर्चा करीत मुंबईच्या वेशीवरच लाल वादळास थांबवले. विधानभवनाच्या पटलावर सर्व मागण्या ठेवत शिंदे सरकारने सकारात्मक निर्णय घेत माकपाच्या मागणीप्रमाणे त्वरित अंमलबजावणीला सुरुवात झाली. लाँग मार्चची तीव्रता सुरगाणा तालुक्यात जास्त असल्याने नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डी. गंगाधरन् व मुख्यमंत्र्यांच्या सचिवांसह इतर अधिकारी सुरगाण्यात दाखल झाले. महाराष्ट्रासह नाशिक जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना सक्तीचे आदेश काढत जिल्हाधिकाऱ्यांनी वन दावे त्वरित निकाली काढण्याचे आदेश काढले अन् 'लाँग मार्च' पुन्हा माघारी फिरला. लाल वादळ थांबविल्याने शासनाचा जीव भांड्यात पडला अन् मोर्चेकऱ्यांनी गावी परत जात विजयोत्सव साजरा केला. मागण्या मान्य झाल्या.

### शेतकरीही कॉम्रेड गावितांबरोबर यशस्वी झाले

यावेळच्या लाँग मार्चचे वैशिष्ट्य म्हणजे, गावितांनी लाल कांद्याचा प्रश्न ऐरणीवर घेत बहुजन शेतकऱ्यांना आपलेसे केले. कांदा प्रश्न उठवित अनेक पक्ष रस्त्यावर उतरतात. मात्र, चालत कोणीच नाही. अशा वेळेस गावितांनी कष्टकरी शेतकऱ्यांचा कांदा प्रश्न

मागणीत घेत अनेक शेतकरी जवळ केले व मोर्चाच्या माध्यमातून तीनशेवरून तीनशे पन्नास रुपये असे भरघोस अनुदान मंजूर करून घेतले. यामुळे शेतकरीही कॉम्रेड गावितांबरोबर यशस्वी झाले. डी. सी.पी.एस. धारक नोकरदार वर्गासहित गावितांनी लाँग मार्चमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते. अनेक नोकरदार या मोर्चात सामील झाले होते.



आजही सुरगाणा तालुक्यातील गावोगावचे प्लॉटधारक मागण्या मान्य झाल्याने, वाढीव क्षेत्र आपल्याला मिळेल, सातबारावर आपले नाव लागेल, कसत असलेले क्षेत्र मिळेल या आनंदात आहेत. मात्र लाल फितीत अडकलेले सरकारी बाबू पुन्हा एकदा कायद्याची बाजू तपासून पाहणार, पुन्हा पुरावे गोळा करायला लावणार, पुरावे नाही तर जमीन नाही म्हणत त्यांचे अधिकार दाखवणार आणि लाभधारक लाभाविनाच पुन्हा अजून एका लाँग मार्चची वाट पाहणार.




**सरकार गोरगरिबांच्या हातावर तुऱ्या देऊन मोकळे होते**

खरे तर, कायदा गोरगरीब, सामान्यांसाठी असून अधिकाऱ्यांनी तो गोरगरीब कष्टकऱ्यांना अनुकूल असा वापरला, तर सातबारा गोरगरीब शेतकऱ्यांच्या नावावर झाल्याशिवाय राहणार नाही. गावस्तरावरील वन कमिटीस सर्व अधिकार २००६ च्या कायद्यान्वये मिळाले होते. त्यावेळीदेखील म्हणजे २ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २००२ मध्ये कर्मवीर दादासाहेब गायकवाड व कॉम्रेड गोदुताई परुळेकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने जे.पी. गावित व डॉ. डी.एल. कराड यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक आंदोलन करणाऱ्या पन्नास हजार लोकांना अटक करून पुन्हा सोडण्यात आले. त्याचवेळी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००५ मध्ये लाल किल्ल्यावर आपल्या भाषणातून वन संरक्षण कायदा मंजुरीबाबत घोषणा केली व डिसेंबर २००६ मध्ये त्याला मंजुरी मिळाली. या कायद्यान्वये अनेक वर्षांपासूनचा कॉम्रेड गावित यांचा लढा यशस्वी झाला. अनेकांच्या जमिनी नावावर झाल्या. मात्र, लालफितीच्या कचाट्यात अडकून आजही हजारो गोरगरीब लाभाविनाच फरफटत आहेत. जनता गावितांच्या एका हाकेसरशी रस्त्यावर उतरते अन् लाल फितीत अडकलेले अधिकाऱ्यांचे सरकार कायदा पुढे करत पुन्हा गोरगरिबांच्या हातावर तुऱ्या देऊन मोकळे होते.



२००६ चा वनाधिकार कायदा झाला त्यावेळी गाव लेवलची



'वन कमिटी' ज्या दावेदारांचे दावे मंजूर करून शिफारस करेल ते दावे शासनाने मंजूर करावेत असे ठरले. असे असताना नंतर तालुका कमिटी, उपविभागीय कमिटी व जिल्हा कमिटी स्थापन झाली. काटेकोर अंमलबजावणी होत असताना गोरगरिबांवर जाचक अटी लादून अतिक्रमणधारकांना वंचित ठेवण्यात आले. त्यात वन विभाग आसुरी वृत्तीने वागताना दिसते.

**इंग्रजांपेक्षाही अतिरेकी छळवाद**

आजही वन विभागाच्या शिफारशीनुसार दंडाची पावती वरील जे क्षेत्र असेल तेवढेच क्षेत्र शासन मंजूर करते. वाढीव क्षेत्राचा विचारच केला जात नाही. अनुसूचित जमातीव्यतिरिक्त इतर वन परंपरागत शेती करणाऱ्या अतिक्रमणधारकांना ७५ वर्षांपूर्वीच्या रहिवासी दाखल्याची मागणी केली जाते. ही जाचक अट आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून आता ७५ वर्ष झाली आहेत. २००६ मध्ये कायदा मंजूर झाला तेव्हा स्वातंत्र्यालाच ६८ वर्षे होत होती. म्हणजे इंग्रजांचे राज्य असतानाचे गोरगरीब भारतीयांचे रहिवासाचे पुरावे मागणे म्हणजे इंग्रजांपेक्षाही अतिरेकी छळवाद तत्कालीन सरकारने मांडून ठेवला आहे. या व अशा अनेक अटी-शर्तींवर मंजूर झालेले अतिक्रमणधारकांचे दावे तुटपुंजे आहेत. हे सरकार गोरगरिबांचे नसून श्रीमंतांचे, भांडवलदारांचे व व्यावसायिकांचे असल्याचे सिद्ध होते. या सरकारला जाब विचारण्यासाठी कॉम्रेड गावितांनी पायी लाँग मार्च काढत सरकारच्या यापूर्वीच्या मागण्यांची आठवण काढून देत धिंडवडे काढले. स्वतः मुख्यमंत्र्यांनी विधानभवनाच्या पटलावर कॉम्रेड गावित व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मागण्या ठेवत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेत 'लाँग मार्च' वाशिमवरच थांबवला.

आज 'लाँग मार्च' संपलेला असला तरी शासनाशी लढणे कॉम्रेड गावितांना काही नवीन नाही. १९७२ मध्ये सुरगाण्यात दुष्काळ पडला असताना रोजगार हमी योजनेंतर्गत होणारा भ्रष्टाचार असेल किंवा १२ जून १९८७ चा सुरगाणा तालुक्यातील वांगणबारी तथा दांडीची बारी येथील वन विभाग आणि अतिक्रमणधारक आदिवासी बांधव यांच्यातील लढा असेल, नाशिकमधील महामुक्काम मोर्चा असेल, जेलभरो असेल, रास्ता रोको असेल किंवा लाँग मार्च असेल याबाबतीत गावित नेहमी पुढे असतात व शासनाला आपल्या मागण्यांची जाणीव करून देतात.

आजही 'लाँग मार्च'च्या माध्यमातून आपल्या मागण्या शासनाने मान्य केल्याचे सांगितले असले तरी, शासनाने तथा अधिकाऱ्यांनी याबाबतीत हयगय केली, तर यापुढे आगळेवेगळे आंदोलन जे.पी. गावित उभारतील यात शंका नाही. कॉम्रेड जे.पी. गावित यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या 'लाँग मार्च'ला डॉ. डी.एल. कराड, डॉ. अशोक ढवळे, डॉ. अजित नवले, कॉ. किसन गुजर, कॉ. इरफान शेख, धर्मुशेठ पागरिया, कॉ. मोहन जाधव, हिरामण गावित, कॉम्रेड इंद्रजित गावित, कॉ. ऊर्मिला गावित, कॉम्रेड सावळीराम पवार, कॉम्रेड सुभाष चौधरी, कॉम्रेड वसंत बागुल, कॉ. भिका राठोड, कॉम्रेड हनुमान गुंजाळ, सीताराम ठोंबरे, कॉम्रेड रामजी गावीत, कॉ बाळासाहेब गांगुर्डे, प्रभाकर गावित, महेश टोपले, कॉ भरत शिंदे, भाऊसाहेब पवार, डॉ देवराम गायकवाड,कॉ देविदास आडोळे, कॉ विजय घांगळे, कॉ. जनार्दन भोये, देविदास गावित, रमेश चौधरी,



राजू पाटील, कॉ. शफीक शेख, त्र्यंबक ठाकरे, कॉ. रामचंद्र गांगुर्डे, कॉ. कैलास राऊत, कॉ. के. डी. भोये आदी असंख्य कार्यकर्त्यांचा मोठा हातभार लाभला. कॉम्रेड गावित व कॉम्रेड कराड हे मोर्चेकऱ्यांसमवेत पायी चालले, हे वाखाणण्यासारखे होते. ●●●

**(लेखक प्राचार्य तथा गोरमाटी पुस्तकाचे लेखक साहित्यिक आहेत.)**

## ‘लाँग मार्च’चे विशेष

- कॉ. जे.पी. गावित सुरुवातीपासूनच लोकांसोबत चालत होते.
- कॉ. डी. एल. कराडांसारखा साथीदार सोबत
- संपूर्ण कुटुंब आंदोलनात उतरले
- उपसभापती इंद्रजित गावित यांनी आंदोलनाची दिशा भव्य बनवली
- कांदाप्रश्नी अनेक शेतकरी सोबत
- डीसीपीएसधारक नोकरवर्गाचीही साथ
- हजारो महिला पुरुष शिस्तीत चालले
- पोलिस कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य

## या मागण्यांसाठी काढला ‘लाँग मार्च’

१. कब्जात असलेली वन जमीन पूर्ण मिळावी.

२. अपात्र दावे पूर्तता करून पात्र करावेत.

३. ७/१२ वरील पोटखराबा नाव कमी करून लागवडीलायक लिहावे.

४. ७/१२ वर कब्जा सदरी वनविभागाचे नाव कमी करून मूळमालक म्हणून नाव लावावे.

५. देवस्थान व गायरान जमीन नावे करावी.

६. प्रधानमंत्री आवास योजना ५ लाखापर्यंत करावी.

७. सुरगाणा तालुक्यात मोठे प्रकल्प उभारून पाणी गुजरातला देण्याऐवजी छोटे प्रकल्प उभारून सर्व पाणी कळवण, मालेगाव, येवला, नांदगाव, चांदवड या तालुक्यांना तथा खान्देश भागास पुरवावे.



(पान ३ वरून)

बांधावर कष्टाचे जग तयार करणाऱ्याला
कुणी एक बायको देता का बायको ?

हुंडा नको, सोन्याचा गंडा तर नकोच नको
लग्नाचा खर्च तर तिला नकोच नको
मातीतही माणूस जगतो हे मानणारी
श्रमपूजा श्रेष्ठ असते हे समजणारी
कुणी एक बायको देता का बायको ?

शेतातली पानेफुले केसात माळणारी
माती तुडवून सुगंधित होणारी
मृद्गंधाने बेभान होऊन नाचणारी
झाडाझुडपात लपून साद घालणारी
कोणी एक बायको देता का बायको ?

देवाच्या दारात नवस बोलणाऱ्यांना
पाय फुटेपर्यंत पदयात्रा काढणाऱ्यांना
लग्नाची स्वप्ने गळ्यात मिळवणाऱ्यांना
जखमी होत, हरत पण जिद्द बाळगणाऱ्यांना
कोणी एक बायको देता का बायको ?

अजूनही काही काही तरी बिनलग्नाच्या पोरांच्या मनात शिजत असेल. गदगदत असेल. या सर्वांचा योग्य वेळी समाजाने विचार केला नाही, या गोष्टीला सामाजिक प्रश्न मानले नाही, तर त्यातून कोणता आणि कसा स्फोट होईल, हे कुणालाही सांगता येणार नाही.

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

पाक्षिक द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर
नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!



www.peoplespost.in

डिजीटल स्वरुपात!

# महाडचा मुक्तीसंग्राम

**महाडचा धर्मसंगर हे डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीतील एक महत्त्वाचे क्रांतादर्शी पाऊल होते. प्रश्न केवळ महाडचा नव्हता, तर माणसासारख्या माणसास पाणी पिण्यास नकार देणे हा माणुसकीवरील घोर अन्याय आहे व हा अन्याय निवारण करण्यासाठी म्हणून डॉ. बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला होता. महाडच्या सत्याग्रही चळवळीतच अस्पृश्यांना हिन दर्जा देणाऱ्या मनुस्मृतीचेही डॉ. बाबासाहेबांनी जाहीररित्या दहन केले. महाडचा धर्मसंगर म्हणूनच सामाजिक समतेच्या दृष्टीने क्रांतीचा प्रारंभबिंदू ठरला.**



बी.व्ही. जोंधळे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ साली महाडच्या चवदार तळ्यावर जो सत्याग्रह केला, तो खरे तर दलितांच्या मुक्तीलढ्याचा प्रारंभबिंदू ठरला. ज्या तळ्यावर पशू-पक्षी पाणी पिऊ शकतात, ज्या तळ्यास अन्य धर्मियांनी स्पर्श केल्यावर तळे वा पाणी बाटत नाही, त्याच तळ्यातील पाण्यास अस्पृश्यांनी स्पर्श केल्यावर मात्र तळे बाटते, हा जो सामाजिक अन्याय माणसासारखे माणूस असलेल्या अस्पृश्य समाजावर होत होता त्या अन्यायाविरुद्ध फुंकलेले रणशिंग म्हणजे डॉ. बाबासाहेबांनी पुकारलेला महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह होता. महाडचा धर्मसंगर हे डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीतील एक महत्त्वाचे क्रांतादर्शी पाऊल होते. प्रश्न केवळ महाडचा नव्हता, तर माणसासारख्या माणसास पाणी पिण्यास नकार देणे हा माणुसकीवरील घोर अन्याय आहे व हा अन्याय निवारण करण्यासाठी म्हणून डॉ. बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला होता. महाडच्या सत्याग्रही चळवळीतच अस्पृश्यांना हिन दर्जा देणाऱ्या मनुस्मृतीचेही डॉ. बाबासाहेबांनी जाहीररित्या दहन केले. महाडचा धर्मसंगर म्हणूनच सामाजिक समतेच्या दृष्टीने क्रांतीचा प्रारंभबिंदू ठरला. महाडमध्येच डॉ. बाबासाहेबांनी दलितांच्या मुक्तीलढ्याचे निशाण रोवून विद्रोहाचा वन्ही चेतविला होता. डॉ. बाबासाहेबांनी महाडचा समतासंगर पुकारताना आपल्या अस्पृश्य बांधवांना उद्देशून म्हटले होते, ''जागृतीचा विस्तव तुम्ही कधीही विझू देता कामा नये. अस्पृश्योन्नतीच्या चळवळीचा उद्देश समाजक्रांती करण्याचा आहे व समाजक्रांती करताना जर धर्मक्रांती मला करावी लागली, तर तीही मी करेन.'' डॉ. बाबासाहेबांनी आपले हे बोल १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारून खरे करून दाखविले.



### ...तर त्यांना सरकारतर्फे मिळणारी वार्षिक ग्रँट बंद करण्यात येईल

वस्तुतः सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये, न्यायालये इत्यादी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मुक्तसंचार असावा या अर्थाचा कायदेवजा ठराव अस्पृश्योन्नतीसाठी झटणाऱ्या सी.के. बोले यांनी मुंबईच्या विधिमंडळात ४ ऑगस्ट १९२३ रोजी मांडला होता व तो मंजूरही झाला होता. या ठरावाची अंमलबजावणी सरकारी अधिकाऱ्यांनी करावी असा मुंबई सरकारचा आदेश असला, तरी अधिकारीवर्ग सवर्ण हिंदूच असल्यामुळे या ठरावाच्या अंमलबजावणीत त्यांना रस असण्याचे काहीच कारण नव्हते. झालेही असेच. पुढे तीन वर्षांनी म्हणजे ५ ऑगस्ट १९२६ रोजी सी.के. बोले यांनीच कायदेमंडळात असा ठराव पास करून घेतला, की लोकल बोर्ड, म्युनिसिपालट्या, जिल्हा बोर्ड यांनी कायद्याची अंमलबजावणी केली नाही, तर त्यांना सरकारतर्फे मिळणारी वार्षिक ग्रँट बंद करण्यात येईल. सुरेंद्रनाथ टिपणीस यांनी बोले ठरावाची पूर्ती महाड म्युनिसिपालिटीत केली होती; परंतु तरीही अस्पृश्यांना तळ्यावर जाऊन पाणी भरण्याचे साहस झाले नाही. या पार्श्वभूमीवर समतेच्या लढ्याचे निशाण महाडच्या भूमीवरच रोवावे, असे डॉ. बाबासाहेबांना वाटले तसेल तर नवल नव्हे.

### सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांच्या जेवणात माती कालविली

महाड येथे बहिष्कृत हितकारिणी सभेतर्फे १९ व २० मार्च रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात जे ठराव संमत करण्यात आले होते त्यातील एक महत्त्वपूर्ण ठराव म्हणजे, बहिष्कृत वर्गाला सार्वजनिक पाणवठ्यांचा वापर करता यावा. या ठरावानुसार २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर पाणी पिण्याचा सत्याग्रह करण्यात आला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाण्याला स्पर्श करून पाणी ओंजळीत घेऊन पाणी प्राशन केले व नंतर त्यांच्या अनुयायांनी त्यांचे अनुकरण करून तळ्यातील पाणी प्राशन केले. यामुळे सवर्ण हिंदूंची माथी भडकली. महारांनी तळे बाटवले, आता ते गावातील विरेश्वर मंदिरात प्रवेश करून देव बाटविणार, अशी त्यांनी गावभर अफवा पसरविली आणि त्यांनी महार बांधवांना मारहाण केली, सत्याग्रही मंडपावर हल्ला करून अस्पृश्यांच्या जेवणात माती कालविली. मारहाणीत पा.ना. राजभोज आदी मंडळी जखमी झाली. या संदर्भात 'महाड येथील धर्मसंगर व वरिष्ठ हिंदूंची जबाबदारी' या शीर्षकाच्या अग्रलेखात बिनतोड युक्तीवाद करताना डॉ. बाबासाहेबांनी लिहिले, ''हिंदू समाजाचे घटक, हिंदू धर्माचे अनुयायी या नात्याने इतर हिंदू जातीच्या मानाने आपण सारख्या योग्यतेचे आहोत, आपले हक्क सारखे आहेत किंवा नाहीत हे ठरविण्याविषयीचा प्रश्न या पाणी प्रकरणाच्या मुळाशी होता. या प्रश्नास महाड येथील वरिष्ठ हिंदूंनी धिंगाणा करून नकारार्थी उत्तर दिले, हे आता जगजाहीर झाले आहे.'' डॉ. बाबासाहेब पुढे लिहितात, ''माणसे ईश्वराची लेकरे आहेत. एवढ्यावरच न थांबता ती ईश्वराचीच रुपे आहेत, असे हिंदू धर्म सांगतो. असे असताना जी सामाजिक समता ख्रिस्ती व महंमदी राष्ट्रात दिसून येते, तिचा हिंदू समाजात कुठेही मागमूस नसावा व ती प्रस्थापित करण्याचे पवित्र प्रयत्न चालू असताना हिंदूधर्मीय म्हणविणाऱ्या लोकांकडून अडथळा करण्यात यावा, यावरून हिंदूधर्मीय लोकांस खऱ्या हिंदू धर्माची किती ओळख आहे, हे दिसून येते.''

**या दोन्ही गोष्टी एकदम होणे शक्य नाही**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सनातनी समाजव्यवस्थेविरुद्ध जे बंड महाडमध्ये पुकारले, त्यामुळे महाराष्ट्रातील 'केसरी' आदी पत्रांचा पोटशूळ उठून त्यांनी आपल्या मनातील मळमळ भडाभडा ओकायला सुरुवात केली. यात आघाडीवर होते भोपटकरांचे 'भाला' हे पत्र. त्याने २८/३/१९२७ च्या अंकात लिहिले, 'तुम्ही देवळे किंवा पाणवठे बाटवण्याचा प्रयत्न बंद करा. तसे न केल्यास आम्ही तुमच्या पाठी सडकू.' यावर डॉ. बाबासाहेबांनी उत्तर दिले, 'आम्ही आमचा प्रयत्न अजिबात बंद करणार नाही. आमच्या पाठी जो सडकील त्याची आम्ही टाळकी सडकू.' 'भाला'कारांनी पुन्हा एकदा ११/४/१९२७ च्या अंकात लिहिले, ''महारा-मांगांनी स्पृश्यांच्या घरी भिक्षा मागणे सोडावे म्हणजे त्यांची अस्पृश्यता एका पिढीत जाईल. पण एकीकडे अस्पृश्यांनी भिक्षेचे अन्नही खावयास पाहिजे आणि दुसरीकडे तळ्यातही शिरावयास पाहिजे. या दोन्ही गोष्टी एकदम होणे शक्य नाही. महार-मांग या जाती अत्यंत घाणेरड्या आहेत. ढोर व चांभार भिक्षा मागत नाहीत म्हणून ते उपाशी मरतात काय? भंगी लोक उष्टे घेत नाहीत. मग महारा-मांगांनाच उष्ट्या पत्रावळींची एवढी लज्जत का? यासाठी आंबेडकरांना आमची सूचना




आहे, की आम्हाला शिव्या देण्याऐवजी स्वजातीच्या अंगाचा वरील दुर्गुण काढण्याचा प्रयत्न त्यांनी करावा.'' यावर डॉ. बाबासाहेबांनी जबरदस्त प्रहार करताना लिहिले, १) अस्पृश्यांना कायमचे अस्पृश्यतेत जखडून टाकता आल्यास पहावे म्हणून 'भाला'कारांनी ओल्या अन्नाची भिक्षा मागणारा तो अस्पृश्य अशी अस्पृश्यतेची बालीश व्याख्या केली आहे. अस्पृश्यांनी ओल्या अन्नाची भिक्षा मागायचे सोडले, तर ते स्पृश्य होतील काय? २) ब्राह्मणाच्या घरचे ओले अन्न खाणारा अस्पृश्य होतो एवढे ब्राह्मणाघरचे अन्न अमंगल असते काय? ३) महार-मांगाप्रमाणेच ब्राह्मणांच्या घरचे शिळे-पाके उष्टे अन्न खाणाऱ्या मराठ्यांना अस्पृश्य का म्हणू नये? ४) खुद्द 'भाला'कारांच्या जातीतील माधुकरी मागणारे विद्यार्थी ओल्या अन्नाची भिक्षा मागतात, हेही अस्पृश्यच का? ५) ब्राह्मणांच्या घरात स्त्रिया पतीच्या उष्ट्या ताटात जेवतात. 'भाला'कार घरच्या ब्राह्मणीला अस्पृश्य म्हणून घराबाहेर काढतील काय? ६) 'भाला'कारांच्या म्हणण्याप्रमाणे ढोर, चांभार व भंगी लोक उष्टे घेत नाहीत. ओल्या अन्नाची भिक्षा मागत नाहीत. त्यांना स्पृश्य म्हणायला 'भाला'कार तयार आहेत काय?

**महाडचा समता संगर हा सामाजिक न्यायासाठी**

सनातनी पत्रांनी डॉ. बाबासाहेबांच्या समता संगराविरुद्ध मनुवादी मळमळ ओकायला सुरुवात केली होती. सनातन्यांना मुहतोड जबाब देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांना मग नव्या वृत्तपत्राची गरज तीव्रतेने जाणवू लागली. 'मूकनायक' बंद पडले होते. मग त्यांनी

३ एप्रिल १९२७ रोजी 'पुनश्च हरिः ओम' म्हणून 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. बाबासाहेबांनी महाडमध्ये जो समता संगर उभारला त्यामुळे अस्पृश्य समाजात एक नवा जोश, आत्मविश्वास निर्माण झाला. डॉ. बाबासाहेबांचे नेतृत्वही तळपू लागले. २४/४/१९२७ च्या 'बहिष्कृत भारत'मध्ये डॉ. बाबासाहेबांनी लिहिले, ''आजवर म. गांधींप्रमाणे अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे, असे आम्ही मानत होतो. पण आता आमची दृष्टी बदलली आहे. अस्पृश्यता हा आम्ही आमच्या नरदेहावरील कलंक मानतो. आमच्यावरील हा कलंक आता आम्हीच धुऊन काढू. या कार्याच्या सिद्धीसाठी आमच्यापैकी काहीजणांना आत्मयज्ञ करावा लागला तरी आम्ही मागे-पुढे पाहणार नाही. तुम्ही तळे शुद्ध करून आमची अपवित्रता सिद्ध करण्याचा महाड येथे जो नीचतम प्रयत्न केला, तसा आणखी हवा तर करा. पण आम्ही पवित्र आहोत. हे तुमच्या मुखे वदवून घेतल्याशिवाय आमची शांती होणार नाही. तुम्ही हिंदू धर्माला लावलेला कलंक आम्ही आमच्या रक्ताने धुऊन टाकावा असा जर ईश्वरी नेमानेम असेल, तर आम्ही स्वतःस अत्यंत भाग्यवान समाजतो.'' तात्पर्य, डॉ. बाबासाहेबांचा महाडचा समता संगर हा सामाजिक न्यायासाठी होता.

**...पण हिंदू धर्ममार्तंडांना हे मान्य नव्हते**

महाडचा समता संगर लढविताना डॉ. बाबासाहेब सनदशीर मार्गानेच सामाजिक न्याय व सामाजिक समता मागत होते. पण हिंदू धर्ममार्तंडांना हे मान्य नव्हते. धर्मांतराचा विचार म्हणूनच डॉ. बाबासाहेबांच्या मनात याचवेळी घोळत होता. त्यांनी हिंदू धर्ममार्तंडांना सवाल करताना म्हटले होते, ''आम्ही तुमच्या लाथा खाऊ. पण तुमच्या धर्मात राहू, असे आम्ही का म्हणावे? तुमचा आमचा धर्म एक, तर तुम्हाला-आम्हाला हक्क सारखेच. माणसामाणसात जो धर्म पंक्तीप्रपंच करतो, कोट्यवधी लोकांना त्यांचा अपराध नसताना गुन्हेगारापेक्षा वाईट रितीने वागवतो, विशिष्ट वर्गातील लोकांना नरकयातना भोगायला लावतो, माणूस असूनही त्यांना जनावरांना मिळणाऱ्या सवलतीही मिळत नाहीत तो धर्म कसला? अस्पृश्यता ही एक गुलामगिरी आहे. गुलामगिरी आणि धर्म एके ठिकाणी नांदू शकत नाहीत. मग माणुसकी प्राप्त करण्यासाठी आम्ही धर्मांतर का करू नये?'' डॉ. बाबासाहेबांचा सामाजिक न्यायाच्या संदर्भातला हा युक्तिवाद बिनतोड होता.

**मनुस्मृती ही जुन्या नियमांची एक जंत्री**

डॉ. बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पिऊन सनातनी हिंदू धर्मव्यवस्थेवर जसा पहिला प्रहार केला, तसेच मनुस्मृती दहन करून जीर्ण, शीर्ण, बुरसटलेल्या हिंदू समाजव्यवस्थेवर दुसरा घाव घातला. 'मनुस्मृती का जाळली?' या लेखात डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''आम्ही जे मनुस्मृतीचे वाचन केले आहे, त्यावरून आमची खात्री झाली आहे, की त्या ग्रंथात शूद्र जातीची निंदा करणारी, त्यांचा उपमर्द करणारी, त्यांच्याविषयी अनादर वाढविणारी वचने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यात धर्माची धारणा नसून असमतेची धुळवड मात्र आहे. सुधारणावाद्यास असला ग्रंथ मान्य होणे कदापि शक्य नाही व तो अस्पृश्य वर्गासही मान्य नाही. एवढेच दर्शविण्यासाठी महाड येथे त्याची होळी करण्यात आली. आमच्या दुसऱ्या एका मित्राचा आक्षेप असा, की मनुस्मृती ही जुन्या नियमांची एक जंत्री आहे. त्या जंत्रीतील नियम आज कुणास लागू होत नाहीत. मग असले जुने बाड जाळण्यात अर्थ काय आहे? मनुस्मृती हे जुने बाड आहे, असे आमच्या मित्राप्रमाणे आम्हासही म्हणता आले असते तर फार बरे झाले असते. पण दुर्दैवाने आम्हास तसे म्हणता येत नाही.'' डॉ. बाबासाहेबांचा हा युक्तिवाद बिनतोडच होता आणि आजही बिनतोडच आहे.

यासंदर्भात 'मनुस्मृती : काही विचार' या पुस्तकात प्रा. नरहर कुरूंदकर म्हणतात. ''मनुस्मृती फक्त जन्माने ब्राह्मण असणाऱ्या व्यक्तिंच्या इहलोकातील हितसंबंधांचा विचार करते व ते हितसंबंध सांभाळण्यासाठी इतरांना गुलाम करणाऱ्या विषम समाजरचनेला पूज्य ठरवण्याचा प्रयत्न करते. हा धार्मिकपणा आहे, की तोंडाने धर्माचा जप करत स्वार्थासाठी धर्म वापरण्याची पद्धत आहे? त्याचे असे उत्तर आहे, की इहलौकीक आर्थिक हितसंबंध सांभाळण्यासाठी हा धर्माचा वापर आहे. अशा वेळी विषमतेला पूज्य ठरविणारा ग्रंथ जर समतेच्या पुरस्कर्त्यांने जाळला, तर हे दहन समर्थनीय मानणे भाग आहे. पण अपरिहार्य व आवश्यकही आहे.'' (पृष्ठ-१६०)

**महाडचा सत्याग्रह हा दलित समाजातील परिवर्तनाची नांदी**

महाडचा सत्याग्रह हा दलित समाजातील परिवर्तनाची नांदी ठरला. डॉ. बाबासाहेबांनी यावेळी आपल्या समाजबांधवांसमोर भाषण करताना म्हटले, अस्पृश्य समाजाने गावकीची कामे करू नयेत. तुम्हाला जर माणूस व्हायचे असेल, तर तुम्ही स्वावलंबी झाले पाहिजे. महार समाज हा लाचारांचा तांडा झाला आहे. ही स्थिती बदलायला हवी. तुमच्या आचार, विचार आणि उच्चारात जोवर शुद्धी येत नाही, तोवर परिवर्तन होणे शक्य नाही. याचवेळी डॉ. बाबासाहेबांनी, अस्पृश्यांनी शेती केली पाहिजे असेही सांगितले. दलित-अस्पृश्य समाजाने शिकून शासनकर्ती जमात झाले पाहिजे, असे सांगतानाच त्यांनी आपल्या समाजबांधवांना हेही सांगितले, की ब्राह्मण समाज हा केवळ वेदशास्त्रसंपन्न असल्यामुळेच पुढे नाही, तर तो उच्च शिक्षणामुळे पुढे आहे.

महाड सत्याग्रहाच्या वेळी डॉ. बाबासाहेबांनी महिला वर्गाचीही स्वतंत्र परिषद घेऊन महिलांना मार्गदर्शन करताना म्हटले होते, विशिष्ट पेहरावामुळे आणि विशिष्ट दागिन्यांमुळे तुम्ही कोणत्या जातीचे आहात ते कळते. म्हणून तुम्ही तुमची वेषभूषा बदला, विशिष्ट प्रकारचे दागिने वापरणे सोडून द्या. इतकेच नव्हे, तर डॉ. बाबासाहेबांनी आपल्या ब्राह्मण आणि कायस्थ सहकार्यांच्या पत्नींना उपस्थित महिलांना साडी कशी नेसावी, हे शिकविण्यासही सांगितले होते. थोडक्यात, महाडचा दलित मुक्तीसंग्राम हा दलित समाजात प्रबोधनाची पहाट उजाडण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरला, हे विशेष.

तात्पर्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, मानवता, माणुसकी या मानवी मूल्यांसाठी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पेटविण्याचा जो सामाजिक पराक्रम केला, तो दलितमुक्तीच्या दृष्टीने मानवतावादाच्या इतिहासात अजरामर आणि तेजःपुंज असाच ठरला, याविषयी शंकाच नको. ●●●

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# एन. पी. एस. ही पेन्शन योजना नाही, कर्मचाऱ्यांची आर्थिक लूट



अस्मिता प्रशांत

**कर्मचाऱ्याने वेतनातून कपात होणारी ही रक्कम साध्या बँकेत जरी ठेवली, तरी दर महिन्याला त्याच्या खाती वाढत जाणाऱ्या रकमेवरील निवृत्तीवेळीचा व्याज हा त्याला एनपीएस योजनेतील मिळणाऱ्या रकमेपेक्षा जास्त असेल. पण इथे मात्र शासन एकरकमी रक्कम म्हणून एनपीएस योजनेतून कर्मचाऱ्यांची फसवणूक करत आहे.**

'एकच मिशन, जुनी पेन्शन' सध्या राज्यभरात जिकडे तिकडे हे एकच वाक्य व एकच मागणी ऐकायला मिळत आहे. वर्तमानपत्र असो, की टीव्ही, व्हॉट्सअप, फेसबुक, ट्विटर प्रत्येक प्रसार माध्यमावर गाजत असलेला जिवंत मुद्दा म्हणजे, ओ. पी.एस. (जुनी पेन्शन योजना).

जुनी पेन्शन योजना म्हणजे काय? तर १ नोव्हेंबर २००५ पासून जे विविध विभाग व खात्यांतर्गत कर्मचारी शासकीय सेवेत रूजू झाले, त्यांना पूर्वीची निवृत्तीवेतन योजना बंद करून नवीन पेन्शन योजना जिला एन.पी.एस. म्हटले जाते, ती लागू करणे. म्हणजेच १ नोव्हेंबर २००५ पासून जो कर्मचारी शासनाच्या सेवेत रूजू होईल, त्याला निवृत्तीनंतर किंवा मयत झाल्यानंतर शाश्वत पेन्शन मिळणार नाही.

एन.पी.एस. म्हणजे काय? तिचे काय स्वरूप आहे? शासनाकडून कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जेव्हा एन.पी.एस. सुरू करण्यात आली, तेव्हा जनता काय, तर खुद्द शासकीय कर्मचाऱ्यांमध्येही एनपीएसबद्दल एक भ्रम शासनाने पसरविला आणि तो म्हणजे कर्मचाऱ्याच्या पगारातून जी १० टक्के रक्कम कपात होईल व निवृत्तीपर्यंत त्याची जी रक्कम जमा होईल, अगदी तेवढीच रक्कम शासनाकडून त्या कर्मचाऱ्याला देण्यात येईल. म्हणजे निवृत्तीनंतर दुप्पट अशी घसघशीत रक्कम शासन कर्मचाऱ्याला जुन्या पेन्शनऐवजी देईल.

शासनाचा एनपीएसबद्दल पसरवलेला हा भ्रम म्हणजे, उघडउघड दुप्पट रकमेचे दाखवलेले आमिशच. जे कालांतराच्या अभ्यासाने ते फक्त आमिश किंवा खोटे आश्वासन नाही, तर एनपीएसच्या नावावर शासनाकडून कर्मचाऱ्यांची उघडउघड लूट, फसवणूक केली जात आहे, हे लक्षात येते.

जुन्या पेन्शनच्या मुद्यावरून सरकार जे स्टेटमेंट देते, त्यात एक वाक्य असे आहे, कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्या वेळी, एकरकमी रक्कम परत मिळेल. एकरकमी रक्कम म्हणून शासन या रकमेबद्दल गुप्तता पाळते. कारण त्या गौप्य रकमेची आकडेमोड केली, तर जे सत्य समोर येते ते कर्मचाऱ्यांसाठी संतापजनक आहे.

उदाहरणार्थ पाहायचे झाल्यास, समजा एका कर्मचाऱ्याच्या मासिक वेतनातून १० टक्के कपात होणारा निधी वर्षाकाठी ३०,००० रुपये होतो. यामध्ये शासन १४ टक्क्यांप्रमाणे ४२,००० रुपये जमा करणार. म्हणजेच त्या वर्षी त्या कर्मचाऱ्यांच्या एनपीएस अकाऊंटमध्ये ७२,००० रुपये जमा होणार. जर तो कर्मचारी १० वर्षे सेवेत राहिला, तर सरासरी याच हिशेबाप्रमाणे त्याच्या खात्यात जमा होणारी रक्कम ७,२०,००० एवढी असेल.

आता इथून पुढे एनपीएस कशी फसवी आहे, हे लक्षात येते. एकीकडे शासन म्हणते एकरकमी रक्कम आणि दुसरीकडे, जेव्हा कर्मचारी निवृत्त होईल, तेव्हा त्याला मिळणारी म्हणजे तो उचल करू शकणारी रक्कम असेल फक्त ६० टक्के. म्हणजेच कर्मचाऱ्याच्या खाती असलेल्या ७,२०,००० या रकमेतून तो फक्त ४,३२,००० एवढीच रक्कम उचल करू शकेल व उर्वरित २,८८,००० ही ४० टक्के रक्कम परत शासन विविध शेअर मार्केटमध्ये गुंतवेल.

कर्मचाऱ्याला जी ४,३२,००० रुपये उचल करता येणार आहे, त्यातील ३,००,००० (तीन लक्ष) ही रक्कम तर त्याचीच स्वतःची कपात झालेली रक्कम असेल. मग शासन इथे त्याला एकरकमी रक्कम काय देणार आहे? फक्त १,३२,००० (एक लक्ष बत्तीस हजार), जी शासन जमा करत असलेल्या १४ टक्के निधीतील फक्त सरासरी ४.०५ टक्के रक्कम आणि तीही त्या कर्मचाऱ्याने महिनाभर काम करून, पोटाला चिमटा मारून शासन खाती जमा केलेल्या १० टक्के निधीवर, जी महिन्याकाठी, वर्षाकाठी वाढत जाऊन शासनाकडे जमा होते. नियुक्तीपासून निवृत्तीपर्यंत कर्मचाऱ्यांची ती कपात शासनाच्या खाती जमा असते आणि त्याच्या आयुष्यभराच्या पुंजीवर, शासन फक्त ४.०५ टक्के रक्कम त्याला अतिरिक्त देते आणि एकरकमी रक्कम असा गवगवा करते. अशा प्रकारे शासन एनपीएस म्हणजे एकरकमी मिळणारी रक्कम असे भासवून उघडउघड कर्मचाऱ्यांची आर्थिक फसवणूक करीत आहे. शासनाचा हिस्सा व कर्मचाऱ्यांच्या हिश्याचा स्वतःच वापर करून सरकार कर्मचाऱ्यांची आर्थिक लुबाडणूक करीत आहे.

इथे शासन कर्मचाऱ्यांच्या म्हातारपणाशीही खेळते व त्यांच्या भविष्याशीही खेळते. (उर्वरित पान ३२ वर...)



# विवंचनेच्या वणव्यातच मनोहर झाले यशवंत



डॉ. प्रकाश राठोड

२६ मार्च २०२३ रोजी डॉ. यशवंत मनोहर यांनी वयाची ऐंशी वर्षे पूर्ण केली आहेत. वयाच्या या ऐंशीव्या वर्षात त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाकडे पाहिले तर त्यांच्या प्रतिभेने मराठी साहित्यातच नव्हे, तर एकूणच भारतीय विचारविश्वात अनेक सौंदर्यलेण्या चिरंतन केलेल्या दिसतात. कविता, वैचारिक निबंध, ललित निबंध, समीक्षा, पत्रलेखन, सौंदर्यशास्त्रीय लेखन, कादंबरी अशा सर्वच लेखनप्रकारांमध्ये त्यांनी आपल्या युगसाक्षी प्रतिभेचा अजिंठा अजरामर केला आहे; परंतु हे शिल्पांकन सहजासहजी घडले नाही. मनोहरांचे यशवंतपण हे अभावग्रस्ततेच्या क्षितिजातून उगवले आहे. विवंचनेच्या वणव्यात ते वाढले, विकसित झाले आणि इथल्या सांस्कृतिक विश्वाच्या परमउंचीवर पोहोचले. तयार वाटांवरून धावणे फार सोपे असते. मनोहरांच्या वाट्याला रेडिमेड असे काहीच आले नाही. त्यांनी स्वतःच स्वतःची पायवाट तयार केली. उसवलेल्या आयुष्याला जिद्दीने टाके घालतच आपले जगणे त्यांनी सर्जक, सुंदर आणि अन्वर्थक केले आहे. आयुष्याच्या कोऱ्या पानांना त्यांनी मानवी जीवनसौंदर्याचा अर्थ दिला. त्यामुळे भारतीय सांस्कृतिक विश्वाच्या महत्तम उंचीवर आपल्या युगीन प्रतिभेचे ध्वजारोहण ते करू शकले. असंख्य दुर्लंघ्य अडचणींना, जीवघेण्या प्रतिकूलतेला आणि चोहोबाजूंनी तळ ठोकून बसलेल्या विवंचनांना पराभूत करीत त्यांच्या गंभीर वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वातून हे देखणे सर्जनाविष्कार आकारास आले आहे.

**वंचित लोकसमूहांची संपूर्ण शोषणमुक्ती हीच विद्रोहाची प्रतिज्ञा**

काटोल तालुक्यातील येरला हे यशवंत मनोहर यांचे जन्मगाव. त्यांचे बालपण येरल्यातच गेले. गावात असतात तशा सगळ्याच प्रकारच्या अंधश्रद्धा येरल्यात होत्या. अंधश्रद्धा, अज्ञान, देव, दैव, जातीय विषमता, दारिद्र्य, ईश्वरशरणता अशा सगळ्याच गोष्टी येरल्यात मोठ्याच गुण्यागोविंदाने नांदत होत्या. या अतार्किक गोष्टींच्या ज्वाळांमध्ये येरला होरपळून निघत होतं. मनोहरांनी येरल्याचे हे होरपळणं पाहिलं होतं. या निर्दयी होरपळीत त्यांचे बालपण करपून निघत होते. त्यांनी दुःखे केवळ पाहिलीच नव्हती, तर ती भोगलीही होती. ही दुःखे प्रातिनिधीकच होती. येरल्याची दुःखे ही येथील तमाम वंचितांचीच दुःखे होती. येरल्यातील जातीय, वर्गीय आणि वर्णीय विषमतेचे भोगवटे मनोहरांच्या बालवयाला भोगावे लागले होते. पुढे जाणत्या वयात बालवयातील या भोगवट्यांनी त्यांना मानवी जीवनातील असंख्य भयावह प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. सर्वच प्रश्नांची उत्तरे उत्तरांच्या स्वरूपात मिळत नसतात. आयुष्यातील जळते अनुभवच उत्तरे घेऊन येत असतात. मनोहरांच्या वाट्याला असे असंख्य दाहक अनुभव आलेत. या अनुभवांनीच त्यांना मानवी जीवनाला हतबल करणाऱ्या प्रश्नांच्या उगमांच्या छावण्या आणि या छावण्यांच्या मनातील काळेबेरे दाखवून दिले. त्यामुळे कळायला लागले आणि मन जळायला लागले तेव्हापासून आपल्या लेखणीतून या छावण्यांवर विद्रोहाच्या तोफा ते डागत राहिले. वंचित लोकसमूहांची संपूर्ण शोषणमुक्ती हीच या विद्रोहाची प्रतिज्ञा होती. इथल्या काळोखप्रिय शोषणव्यवस्थेला आव्हान देत त्यांच्या साहित्यातील पराकोटीच्या विद्रोहाने निरामय माणूसपण दळदार करणारे अभियान हाती घेतले. मूल्यांतर करणे आणि त्या माध्यमातून इथल्या शोषणग्रस्त समाजघटकांचे संपूर्ण अवस्थांतर घडवून आणणे हीच या अभियानाची जन्मप्रतिज्ञा होती. मानवी जीवन सर्वांगसुंदर आणि सकलसमांतर व्हावे हाच या अभियानाचा मूल्यार्थ होता. या मूल्यार्थानेच त्यांना सर्जनशील जगणे समर्पित केले आहे. या मूल्यार्थानेच दुःखांचे सर्जन करणाऱ्या शब्दाला त्यांच्या साहित्याचा अंतःस्वर केला आहे.

**इहजीवनाचे सर्वकल्याण हाच या मूल्यांचा उत्कट ध्येयवाद**

मनोहरांचे साहित्य हे दुःखांचे सर्जन करणारे साहित्य आहे. मानवी जीवन दुःखमुक्त व्हावे यासाठी त्यांच्या साहित्याने आधुनिक मूल्यसंस्कृतीची कास धरली आहे. ही मूल्ये इहवादीच आहेत. इहजीवनाचे सर्वकल्याण हाच या मूल्यांचा उत्कट ध्येयवाद राहिला आहे. त्यामुळे ऐहिक मानवी जीवनातील प्रश्नांना बगल देऊन त्यांना बेदखल करणारे सगळेच तात्त्वज्ञानिक आणि वाङ्मयीन आविष्कार त्यांनी नाकारले आहेत. पारंपरिक मराठी साहित्य हे पारलौकिक स्वभावाचेच साहित्य आहे. परलोकनिष्ठा हीच या साहित्याची प्रकृती राहिली आहे. त्यामुळे या साहित्याच्या सांस्कृतिक अधिष्ठानावर त्यांनी सडेतोड प्रहार केले आहेत. सबंध मानवी जीवन समानुष व्हावे हाच या प्रहारांचा इत्यर्थ होता. त्यामुळे अमानुष वृत्ती-प्रवृत्तींचा

पुरस्कार करणाऱ्या सर्वच आविष्कारांच्या विरोधात त्यांनी बंड पुकारले आहे. या बंडाचीही एक संस्कृती आहे, मूल्ये आहेत. या मूल्यांच्या तात्त्विक अधिष्ठानावरच भारताचे संविधान उभे आहे. भारतीय समाजक्रांतीची संस्कृती हीच संविधानाचीही संस्कृती आहे. ही संस्कृती समन्यायी आणि समध्येयी स्वरूपाची आहे. भारतीय समाजात बंधुभाव आणि भगिनीभावाचे ताटवे सतत फुलारत राहावे, हीच या संस्कृतीची सदिच्छा राहिली आहे. मनोहरांनी सांविधानिक मूल्यसंस्कृतीने दिलेल्या या सदिच्छांचे अंतर्मन वाचले आहे. या सदिच्छांचे सर्वहितैषी व्यापकत्व त्यांनी समजून घेतले आहे. त्यामुळे आपल्या साहित्यातून सांविधानिक मूल्यसंस्कृतीच्या या सर्वहितैषी सुगंधाची पखरण करूनच मराठी साहित्याला त्यांनी सुगंधित केले आहे.

**...हीच या दातृत्वामागे त्यांची तळमळ**

डॉ. यशवंत मनोहर यांनी केवळ साहित्यनिर्मितीच केली नाही, तर आधुनिक मूल्यांवर अधिष्ठित असलेल्या सांविधानिक मूल्यसंस्कृतीचा उजेड वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित, शोषित आणि एकूणच सर्व साधनवंचित समाजघटकांपर्यंत पोचवणारे विद्यार्थी घडवले. व्यवस्थांतर घडवून आणण्याच्या इराद्याने पेटलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींना त्यांनी तत्त्वनिष्ठा शिकविली. बौद्धिक आणि वैचारिक रसद पुरविली. चळवळींना समर्थपणे पुढे नेणारे नेतृत्व दिले. सेवाभावी वृत्तीचे कार्यकर्ते दिले. उमेद दिली. मनोहरांची ही देण विलक्षण अशीच आहे. हा दातृत्वभाव त्यांच्या मनाच्या अस्वस्थतेतून आणि इहवादावरील त्यांच्या अविचल निष्ठेतून प्रसवला आहे. आपण भोगले ते भोग कोणाच्याही वाट्याला येऊ नयेत, आपल्या वाट्याला आलेल्या विवंचना, यातना, दुःखे ही कोणाच्याही वाट्याला येऊ नयेत हीच या दातृत्वामागे त्यांची तळमळ आहे. मनोहरांचे साहित्य हे या तळमळीचेच साहित्य आहे. त्यांच्या जीवननिष्ठ आशयाच्या सौंदर्यशास्त्रीय लेखनातूनही या तळमळीचे उत्कट दर्शन घडते. भारतीय समाज शोषणमुक्त आणि समतायुक्त व्हावा आणि या समाजात निरामय माणूसपण सुस्थापित व्हावे ही उत्कट उदात्तताच त्यांच्या साहित्याच्या केंद्रवर्तीस्थानी राहिली आहे. ही व्यापक आणि उत्कट उदात्तता घेऊनच इथल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन विश्वात अत्यंत समर्थपणे ते सज्ज झाले आहेत.

**मनोहरांची भाषिक सौंदर्यरूपे थक्क करणारीच**

डॉ. यशवंत मनोहर हे इहवादी विचारवंत या नात्याने सर्वपरिचित आहेत. इहवाद, बुद्धिवाद आणि समाजवाद या मूल्यांच्या संदर्भबंधात राहूनच भारतीय सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नोपप्रश्नांची ते समीक्षा करतात. आंबेडकरवादानेच त्यांना या सुंदर संदर्भबंधाची आणि या संदर्भबंधाने झपाटलेल्या भारतीय समाजक्रांतीच्या परंपरेच्या ध्येयवादाची ओळख करून दिली आहे. सबंध मानवी जीवनाचे समांतर उन्नयन हाच या परंपरेचा ध्येयवाद होता. या जीवनोपकारक उदात्ततेने ते झपाटले आणि या क्रांतिपरंपरेच्या कुटुंबाचे ते सेनानी झाले. मनोहरांचा एकूणच वैचारिक पिंड हा आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाच्या सौंदर्यमूल्यांवर पोसला गेला आहे. या तत्त्वज्ञानानेच त्यांना मानवी जीवनातील दुःखांची कारणमीमांसा करणारी दृष्टी दिली. माराच्या जागा हेरून त्यावर अचूक हल्ले करण्याचे प्रशिक्षण दिले. त्यामुळे त्यांच्या साहित्यात अजिबातच अंतर्विरोध दिसत नाही. इहवाद, समाजवाद, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद अशी एक विशुद्ध वैचारिक भूमिका घेऊनच इथल्या शोषणव्यवस्थेच्या विरोधात ते संतप्त होतात. ही संतप्तता त्यांच्या सुंदर भाषिक वैशिष्ट्यांमधून अभिव्यक्त झाली आहे. आशय व अभिव्यक्तीचे सेंद्रिय सौंदर्य त्यांच्या भाषेत आहे. मानवी जीवनातील सौंदर्यस्थळे पाहून ती जितकी मोहक होते, तितकीच जीवनातील अमानुषता पाहून दाहक होते. त्यांची ही भाषिक सौंदर्यरूपे थक्क करणारीच आहेत. विरुद्धची संतप्तता शब्दांच्या हाती देताना त्यांची भाषा सुंदर काव्यमय रूप धारण करते. ती कधी आगपाखड करते तर कधी ती चांदण्याचे झाड होते. त्यांच्या भाषेत उत्कटता, संताप आणि उपरोध आहे. काव्यमयता आणि तात्त्विक पीळ यांची सेंद्रियता आहे. शब्दांचा चपखल वापर, आक्रमक शैली, भाषिक पातळीवरील नवनिर्मिती, चिंतनशीलता आणि धुंदावून सोडणारी भाषिक कौशल्ये आहेत. त्यामुळे विशुद्ध इहवादी भूमिकेचा एक शैलीदार विचारवंत या नात्याने जागतिक विचारविश्वात ते वंदनीय ठरले आहेत. त्यांच्या अष्ट्यब्दीपूर्तीच्या निमित्ताने त्यांना मनःपूर्वक हार्दिक सदिच्छा!

●●●

**(लेखक वाशिम येथील तिसऱ्या**
**अ.भा. बंजारा साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष आहेत.)**

# एन.पी.एस. ही पेन्शन नाही, कर्मचाऱ्यांची आर्थिक लूट

**(पान ३० वरुन)** एनपीएसच्या नावावर उघडउघड कर्मचाऱ्याला फसवते आहे. एकीकडे म्हणते, १४ टक्के आम्ही शासनहिस्सा जमा करतो, तर दुसरीकडे त्या निधीचा व कर्मचाऱ्यांच्या निधीचा वापर स्वमर्जीने करते. निवृत्तीनंतर फक्त नाममात्र रक्कम परत करून, आपला वाटा जशाचा तसा जमा ठेऊन, तोदेखील मार्केटमध्ये गुंतवून कर्मचाऱ्याचे आयुष्य व भविष्य अंधारात ढकलते. कारण याच ४० टक्क्यांवर जी पेन्शनस्वरूप महिन्याकाठी रक्कम देऊ असे शासन म्हणते, ती रक्कम त्या वेळच्या मार्केट किमतीवर आधारित असते. अशा वेळी त्या कर्मचाऱ्याला अनियमित मिळणारी रक्कम, मग तो आकडा कितीही असू शकतो, तो ५०० रुपयेही असू शकतो, तो १,००० रुपयेदेखील असू शकतो किंवा काही वेळेला तो मायनसमध्येही असू शकतो.

कर्मचाऱ्याने वेतनातून कपात होणारी ही रक्कम साध्या बँकेत जरी ठेवली, तरी दर महिन्याला त्याच्या खाती वाढत जाणाऱ्या रकमेवरील निवृत्तीवेळीचा व्याज हा त्याला एनपीएस योजनेतील मिळणाऱ्या रकमेपेक्षा जास्त असेल. पण इथे मात्र शासन एकरकमी रक्कम म्हणून एनपीएस योजनेतून कर्मचाऱ्यांची फसवणूक करत आहे.

●●●

**(लेखिका स्त्री दर्पण विशेषांकाच्या संपादिका असून**
**स्त्रीवादी साहित्यिका आहेत.)**



एकनाथ बागूल

# ''एक धांडोळा; सुसंवादी तनामनासाठी केलेला''

'सुसंवाद तनामनाचा' शीर्षक असलेले व सुबक, कलात्मक, समर्पक व प्रतीकतेने साकारलेल्या व डोळ्यांना सुखावणाऱ्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील लेखकाचे राजा माणगांवकर (आय. पी.एस.) हे नाव वाचल्यावर प्रदीर्घ काळ वृत्तपत्रकारितेत घालवलेल्या माझ्यातल्या पत्रकारास प्रथमदर्शनी प्रचंड आश्चर्य वाटले. बहुतेक करून ह्या पुस्तकात क्लिष्ट व गुंतागुंत असलेल्या गुन्ह्यांचा ठराविक साचेबंद, वृत्तांती, ठोकळ स्वरुपाचा शोध, तपासकथा असतील असे वाटले. पुस्तकातील अनुक्रमणिकेतील लेखाशीर्षके व पुस्तक वाचल्यावर पोलिसात ३८ वर्षे 'भाकरीसाठी चाकरी' केलेल्या व मानवी मन अभ्यासलेल्या माणसानं हा चारशेहून अधिक पानांच्या पुस्तकातील चाळीस लेखात तनामनाच्या संवादाचा पसारा आटोपशीरपणे मांडलाय, ह्यावर विश्वासच बसत नाही. मनोगतात व्यक्त केल्याप्रमाणे ''अनेकविध अनुभवांच्या रूपानं कमावलेलं 'जरतारी चिंध्यांचं गाठोडं' नक्कीच आहे'', या विधानातील सत्यता जाणवते.




वयाच्या सत्तरीत वाटचाल करणाऱ्या या नवोदित (होय, हे त्यांचं पहिलंच पुस्तक आहे) लेखकास 'लिहिते' व्हायला एवढा उशीर का झाला, हेही एक अगम्य 'कोडं' आहे. कदाचित त्यामागे नोकरीतील कार्यबाहुल्य, सेवेतील काही लिखित अलिखित बंधने अगर अन्य कारणे असावीत असे वाटते. अंतर्मनात साचलेलं, तुंबलेलं, सगळं काही निवृत्तीनंतर विरेचनाच्या रूपानं बाहेर पडलं, ही त्यांना 'व्यक्ती' म्हणून व्यक्त झाल्याची मुक्तीची भावना वाटते, हे मात्र निसंशय सत्य वाटते. ''जरठ विवाहानंतर अकाली आलेल्या मातृत्वासारखं, प्रसवतांना थोडं जड गेलं. व्यक्त होताना प्रौढत्वातील 'खनिजी' तत्त्वामुळे कधीमधी ठोस विचार मांडले गेले असतील. तो ठाम भावाविष्कार असावा. बिनबुडाच्या गाडग्यासारखं नव्हतं.'' असा पोलिसी खात्याचा हुकमी पण अधिकारवाणी असलेला स्पष्टवक्तेपणाचा 'स्पष्टवक्ती ठामपणा' नक्कीच नोंदणीय वाटतो.

पुस्तकातील अनुक्रमणिकेतील विषयानुसार चाळीसपैकी तनामनाशी संबंधीत असे १४ विषयांचे लेख, ललित अंगाने जाणारे ६ लेख, रंगवैविध्याचे मानसशास्त्रीय व सौंदर्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून विश्लेषण केलेले १० लेख, ललितेतर चिंतनीय, वैचारिक व साहित्यिक मूल्ये जाणवणारे ८ लेख, पोलीस-जनता संबंध व पोलीस वर्तनाच्या अभ्यासाची पोलिसांना आवश्यक असलेली यशाची गुरुकिल्ली हा १ विस्तृत लेख, अन् शेवटचा आत्मकथनपर संवादी लेख असे २ लेख मिळून ४० संमिश्र लेखांची संयक्त बांधणी या सुंदर दृश्य पुस्तकी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या छोट्याशा ग्रंथात एकवटल्याचे जाणवते. संपूर्ण पुस्तक निगुतीने अन् चवीने वाचल्यावर त्याचे प्रत्यंतर नक्कीच येईल.

प्रत्येक लेखाचे शीर्षक, त्या लेखातील विषयाचा गर्भित आशय सांगण्याचा प्रयत्न करते. उदा. १) सुसंवाद, संवाद, वाद २) लगत जीवाच्या वसतो तो जीवलग ३) वय शरीराला, मनाला कुठे असतं? ४) आईचं 'काळीज' असलेली 'बाप' माणसं ५) साहित्यिकांच्या 'देण्याचे' कृतज्ञ उत्तराईपण ६) वार्धक्य भयाच्या संध्याछाया ७) मृत्युभय, अंधारसावट की प्रकाशवाट? ८) भिजत घोंगड अन् जनावरचं गुऱ्हाळ ९) पंचेंद्रियांची सौंदर्यशास्त्रीय बलस्थाने १०) डोळे... अढळस्थानी विराजलेलं मुकुटमणी ज्ञानेंद्रिय व ११) 'स र वा'त्मका सर्वेश्वरा ही शीर्षके लेखाच्या विषयाचे सूतोवाच करण्यात व संक्षिप्त दर्शन घडवण्यात यशस्वी होतात. त्यातील भाषासौंदर्य व नेमकेपणा मनाला भावतो.

मानसशास्त्रीय विषयाशी संबंधित असलेल्या व मनाला भयग्रस्त करणाऱ्या मूळ सहा भीती व अनेक भयगंडाबद्दल लिहिलेल्या लेखामधून त्यांनी केलेला मानसशास्त्रीय अभ्यास व त्यास ललित साहित्यिक लिखाणाची दिलेली जोड वाचकास जखडून ठेवते. दारिद्र्य, टीका, हरवणे, विरह किंवा सोडून जाणे, आजारपण, वार्धक्य व शेवटी मृत्यू याविषयीची भीती म्हणजे माणसांच्या पाचवीला पुजलेलं भय, ते कधी संपत नाही. दारिद्र्याची भीती मरणाहून भयंकर, तर टीका, निंदेच्या भीतीत सकारात्मकतेचा आशावाद जाणवतो. प्रियजनाचा विरह अगर त्यांच्या मृत्यूची वाटणारी चिंता, 'मन चिंती ते वैरी न चिंती' याची जाणीव करून देते. आजार व शरीरव्याधींची सततची चिंता तर सावलीसारखी. वार्धक्याची चाहुल, मृत्यूच्या दिशेने वाटचाल करणारी नैराश्याची काळी कुट्ट सावलीच जणू...! चिंता, भय व अन्य भयगंडाबद्दल त्यांनी केलेला

मानसशास्त्रीय अभ्यास व इंग्रजी, मराठी साहित्याचे त्यांच्यावरील झालेले संस्कार यांचा मिलाप त्यांच्या तनामनाच्या संदर्भात केलेल्या लिखाणावरून लक्षात येतो. त्यावर केवळ विवेचनात्मक न लिहिता तणाव, चिंतेच्या व्याधींचे निराकरण व उपचार पद्धती काय असावी याचाही विचार त्यांनी प्रामुख्याने ''चिंत्या रोगासाठी दवा, दारू अन् दुवा'' या लेखात व अन्य लेखातील संदर्भिलेली कला, साहित्य व अनेकविध छंद जोपासली व सकारात्मक जीवनशैलीचा अंगीकार करण्याच्या आवाहनातून केल्याचे दिसते. मानवी वर्तनासारख्या बोजड व क्लिष्ट विषयाचे ललित लिखाणाच्या अंगाने लिहिलेला निरूपणात्मक अध्यायी ग्रंथ वाचल्याचा भास होतो. लिखाणात कुठे उपदेशक, मार्गदर्शक असल्याचा आविर्भाव ते न आणता स्वतःच्याच वाईट मनास त्यांच्यातील चांगल्या मनाने केलेला उपदेश आहे, असे मत मांडतात, अन् त्यात ते बरेचसे यशस्वी झाल्याचे दिसते. शरीराची पाच ज्ञानेंद्रिये व डोळ्यांबाबतच्या भावात्मक लेखाच्या विस्तृत लिखाणात ज्ञानेंद्रियाच्या खऱ्या सौंदर्यशास्त्रीय बलस्थानाबद्दल भाष्य करतात.

एकूणच तन, मन व त्याच्यातील अपेक्षित सुसंवादाबद्दल त्यांनी विस्तृतपणे केलेल्या लिखाणाने बऱ्यापैकी उंची गाठल्याचे जाणवते. सद्य मानवीव्यवहार व नातेसंबंधांतील संवादाबद्दलचे त्यांचे १) सुसंवाद, संवाद, वाद २) लवचिकता महात्म्य ३) उतारवयातील स्थितप्रज्ञता ४) सुसंवाद तनामनाचा हे लेख वाचकांना अंतर्मुख करायला लावणारे आहेत. एका व्यक्तीच्या अंतर्मनातील सज्जन व दुर्जन या दोन मनांचा व्यक्तिगत स्वरूपाचा विसंवाद ते विश्वस्तरावरील सर्वच क्षेत्रांतील विषवल्लीसारखा फोफावलेला व पसरलेला द्वेष व वैरत्व भाव हा चिंतेचा विषय झाला आहे. सर्व प्रकारचे वैषम्य दाटलेल्या वातावरणात माणसातल्या एकमेकातील व परस्पर संबंधांच्या संवादातील शुष्कता जाणवायला लागलेल्या काळात स्नेहार्द संवादासाठी माणसांचे हपापलेपण प्रकर्षाने अधोरेखित होत आहे. प्रत्येक व्यक्तीने 'स्व'चा या भावनेने विचार करून स्वतःशीच सुसंवादी झाल्यास सकल 'विश्वची माझे घर' हा भाव वृद्धिंगत होऊ शकतो, असा आर्जवी विचार, भावना लेखक व्यक्त करतात.

रंगांच्या संदर्भातील दहा लेखांची शीर्षकेही अशीच चपखलरित्या देऊन प्रत्येक रंगाचे अनवट पद्धतीने मांडलेलं व्यक्तिमत्व मनास भिडतं. रंगांचा वैविध्यपणे मांडलेला लेखाजोखा व सौंदर्यशास्त्राच्या नजरेतून चितारलेलं इंद्रधनुष्य, हा रंगविश्वातील महत्त्वाचा दस्तऐवज व रंगमुद्रा रसिक वाचकाच्या मनाला जाणवल्याशिवाय राहत नाही. नऊ रंगांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देताना लेखशीर्षकांना चपखल बसणाऱ्या अलंकारिक शब्दरचनेची आखणी विचारपूर्वक केल्याचे जाणवते. उदा. १) सदासुहागन 'गुलाबी केसरिया' २) अजून यौवनात मी विलासी 'नारंगी' ३) ऐश्वर्यी बावनकशी, सोनेरी 'पिवळा' ४) वैभवशाली वसुंधरेची समृद्ध 'हिरवाई' ५) सागरी अथांगतेची आसमंती 'निळाई' ६) मनमोराचा नीलहरीत, चुंबकीय 'मोरपंखी' ७) अनवट विद्रोही कृष्णकमळी 'जांभळा' ८) अनाकलनीय काळासावळा 'कृष्णवर्णी' अन् ९) सर्वसमावेशक 'शुभ्रधवल' रंगशिरोमणी. नवरंगांच्या दुनियेतील हा रंग व्यक्तिमत्वाचा शोध घेणाऱ्या वाचकांना नक्कीच आवडेल. अस्वस्थ, तणावग्रस्त मनाच्या व्याधीवर उपचार म्हणून रंगथेरेपी सर्वश्रुत आहेच, त्याशिवाय मानवी जीवनातील रंगांचं स्थानही तितकंच महत्त्वाचं व अनोखं आहे. रंगहीन जीवन म्हणजे काळकुट्ट अंधारी जीवनचं म्हणावं लागेल, असा सूर रंग महात्म्याचे वर्णन करताना लेखक लावतात. नकारात्मक मनोव्यापार, ताणतणाव निर्माण करणाऱ्या चिंता व भयगंड, याशिवाय वैचारिक, चिंतनपर व ललितेतर काही लेख, लेखकाची धीरगंभीर, तटस्थ व बुद्धीला चालना देण्याची मानसिकता दर्शवितात. उदा. १) नेतृत्व, एक जन्मजात अंगभूत गुण २) व्यक्तिमत्व विकास, एक निरंतर प्रगतीचक्र ३) साहित्यिकांच्या 'देण्याचे' कृतज्ञ उत्तराईपण ४) मध्यंतर विसाव्याचं संजीवक प्रयोजन ५) भिजत घोंगडं अन् जनावरचं गुऱ्हाळ ६) काळ, काम, वेगाचं त्रैराशिक ७) सर्जनशीलता, संपन्न दीर्घायुष्याचं गुपित अन् ८) 'स र वा' त्मका सर्वेश्वरा, हे ते लेख होत. निखळ ललितात मोडणारे १) लगत जिवाच्या वसतो तो जिवलग २) वय शरीराला, मनाला कुठं असतं? ३) आईचं काळीज असलेली 'बाप' माणसं हे लेख पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटणारे आहेत.

अडतीस वर्षांच्या पोलिस सेवेतील कृतज्ञपणाच्या भूमिकेतून लिहिलेला 'मानवी वर्तनाचा अभ्यास, पोलीस यशाची एक गुरुकिल्ली' हा लेख व 'तळातून वर येतानाचे माझे जीवनगाणे' या आत्मवृत्तपर असलेल्या लेखातून जीवनाचा सारीपाट संक्षिप्तपणे मांडला गेला आहे. त्यामुळे वाचकांच्या मनातील लेखकाविषयीचे औत्सुक्य कमी व्हायला मदत होते.

राजा माणगांवकर यांना सान्निध्य लाभलेले त्यांचे महाविद्यालयीन काळातील प्राचार्य व पितृस्थानी असणारे प्रसिद्ध समीक्षक श्री. म.द. हातकणंगलेकर, व्यंकटेश माडगुळकर, कुसुमाग्रज, नारायण सुर्वे, बाबूराव बागूल, उत्तम कांबळे इत्यादींचा त्यांच्या लिखाणावर प्रभाव झाल्याचे वाटते. त्यांच्याप्रती ते कृतज्ञभावही व्यक्त करतात.

प्रत्येकाला तन, मन आहे. सर्वसामान्यांचा तर तो शाश्वत पिंड असतो. पुस्तकाच्या आशयाच्या मध्यभागी साधा, सर्वसामान्य माणूसच केंद्रीत केला गेला आहे. एवढेच नव्हे, तर कृष्णासारख्या देवातसुद्धा साधा माणूस सामावल्याचे वेळोवेळी लिखाणात आले आहे. त्यामुळे तनामनाच्या व्यापारांचे सार्वत्रिकरण झाल्यामुळे वाचकास त्याचे स्वतःचे प्रतिबिंब प्रत्येक लेखात शोधताना कष्ट, श्रम पडत नाहीत. ताणतणाव, चिंता हा दैनंदिन जीवनाचा भाग. त्यामुळे चिंतित मनाचा नुसताच उलगडा न करता त्यावर उपायही या पुस्तकात सूचित केले आहेत. जेव्हा केव्हा असे चिंतेचे मळभ मनावर दाटून येतील, तेव्हा या पुस्तकातील सकारात्मक आशावाद अन् जीवनसंघर्षाशी दोन हात करण्याचे बळ देणारे हे पुस्तक नक्कीच 'दखलपात्र' आहे. कोणत्याही वयोगटातील व्यक्तीसाठी केवळ वाचनीय नाही, तर संग्राह्यसुद्धा आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व माजी संपादक आहेत.)**

**''सुसंवाद तनमनाचा''**

**लेखक : राजा माणगांवकर (आय.पी.एस.)**


**प्रकाशक : सु.वा. जोशी, उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे-४ । पृष्ठे : ४०८ । मूल्य : ६०० रुपये**

कोणता भारत..

# तुरुंग भरलेत? काळजी नको, आता गुन्हेगार पाठवा नरकात

एक लक्षात घ्यायला हवं, की न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर आपण टीका करू शकत नाही. पण त्याचबरोबर एक गोष्ट अजून तरी चांगली आहे आणि ती म्हणजे आपण निर्णयावर चर्चा करू शकतो. काही काही वेळेला न्यायालयाचे निर्णय चर्चा फुलवण्याला वाव देतात. असाच एक निर्णय अहमदाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शमीद अहमद यांच्या पीठाने दिला आहे. उत्तर प्रदेशच्या गोहत्या बंदी कायद्यासंदर्भात मोहम्मद अब्दुल खालिक यांच्या याचिकेवर बोलताना न्यायमूर्तींनी जे भाष्य केले, ते कोणत्याही साधू-संताच्या ओठावर शोभावे असे आहे. न्यायमूर्ती म्हणाले, की गाय पवित्र तर आहेच; शिवाय ती विविध देव-देवतांशी जोडली गेली आहे. विशेषतः शिवाशी ती जोडली आहे. शिवाचे वाहन नंदी आहे आणि नंदीचा जन्म गाईपासून होतो. इंद्रासाठी ती कामधेनू आहे. भगवान श्रीकृष्ण गाईबरोबरच वाढले. याशिवाय अनेक अर्थांनी ती मातृगुणी आहे. हिंदू धर्मात सर्वात पवित्र तीच आहे. वैदिक काळापासून तिची पूजा होते. गाईचे दूध, मूत्र, दही, लोणी आरोग्यासाठी औषधाप्रमाणे काम करते. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे आणि आपण सर्वांनी हिंदू धर्माचा सन्मान केला पाहिजे. गाय म्हणजे देव-देवतांचे आणि नैसर्गिक अर्थकारणाचे एक साधन आहे. अशा गाईची हत्या करणे महापाप आहे. ती करणारा माणूस नरकात सडत असतो. गोहत्येवर बंदी असली पाहिजे.

खरे तर, न्यायमूर्तींचा धार्मिक अभ्यासही किती खोलवर असतो. याचे दर्शन घडले. वैदिक काळाचे, देव-देवतांचे दर्शन त्यांनी केलेल्या विवेचनातून घडले. खरे तर, अजून थोडा वेळ घेऊन थोडे अधिक विवेचन केले असते, तर बरे झाले असते. पण न्यायालयापुढे कामे खूप आणि वेळ कमी असतो. वैदिक काळापासून गाईला पूजनीय मानले जाते. हे जसे खरे आहे, तसेच वैदिक यज्ञात तिचा बळी दिला जात होता, हेही खरे आहे. बळी कोण देत होते आणि तिचे सेवन कोण करत होते, याविषयी अलीकडे कोणी भाष्य करत नाही. डॉ. रुपाताई कुलकर्णी यांनी छोटी पुस्तिका लिहून त्याविषयी भाष्य केले आहे. न्यायमूर्तींपर्यंत ते पोहोचले नाही, यात त्यांचा काय दोष? हिंदू धर्मात केवळ गायच नव्हे, तर दगडापासून सूक्ष्म आणि मोठ्या जीवांपर्यंत अनेकांची देवा-धर्माशी सांगड घालण्यात आली आहे. त्यात मुंगी, डुक्कर, बैल, घोडा, बोकड, साप, बेडूक असे असंख्य जीव येतात. त्यांचे रक्षण करणारा कायदा नाही. मुंगूस तर कुबेराचे वाहन आणि उंदिर श्री गणपतीचे वाहन आहे. या जीवांची




अवस्था आज काय आहे, यावर कोण भाष्य करते. उंदिर मारण्याची साधने रोज जन्माला येतात. असो. गाईला राष्ट्रीय प्राणी, राष्ट्रमाता वगैरे दर्जा मिळाल्यास कोणी वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. हिंदू राष्ट्रामध्ये ती महत्त्वाच्या ठिकाणी असते आणि तेहतीस कोटी देवांना सांधू शकते. अशा गाईची हत्या करणे म्हणजे नरकात जाणे, हे न्यायमूर्ती जे काही बोलले ते योग्यच आहे आणि न्यायदेवता योग्यच बोलतात.

आता प्रश्न येतो नरकाचा. एखाद्या गुन्हेगाराला कठोर शिक्षा देण्याची जागा नरक असेल, तर गोहत्येसारखे गंभीर गुन्हे करणाऱ्यांनाही तेथेच पाठवायला हवे. अलीकडे देशातील तुरुंग अपुरे पडत आहेत. नरक हा चांगला उपाय असू शकतो. तेथे सरकारला कोणताही खर्च नाही. सुरक्षा व्यवस्थेची गरज नाही. तर आता हे नरक कुठे आणि किती असतात, याचे उत्तरही महाभारतात देऊन ठेवले आहे. पृथ्वीच्या दक्षिणेला पाण्यात ते असते. वेगवेगळे दुष्कर्मे करून आलेल्यांना तेथे वेगवेगळी शिक्षा मिळत असते. माणूस वाईट वागणार, त्यांची संख्या वाढत जाणार हे गृहीत धरून की काय, आपल्याकडे ८४ लाख नरक आहेत आणि आपली लोकसंख्या दीडशे कोटीच्या आसपास आहे आणि आपण गर्व बाळगायला पाहिजे, की लोकसंख्येच्या बाबतीत आपण जगात नंबर एक आहोत. वाढती लोकसंख्या गृहीत धरून

आपल्या धर्मग्रंथांनी, पुराणांनी अगोदरच नरकांची संख्या वाढवून ठेवलेली असावी. भावी पिढीचा गांभीर्याने विचार केला असावा. नरकांची संख्या जरी जास्त असली, तरी त्यातही टॉप एकवीस नरक आहेत. त्यांना घोर नरक म्हणतात आणि हे सर्व पाताळात पृथ्वीच्या खाली आहेत. स्वार्थी, नास्तिक, अधर्मी, लुबाडणूक करणारा, खून करणारा, पाप करणारा आदी अर्थांनीच न्यायमूर्तींनी म्हटल्याप्रमाणे गोहत्या करणारी आदी एक मोठी गँग नरकात जाऊ शकते. महत्त्वाचे म्हणजे जेथे पापी लोकांचा खूप छळ करण्याची तरतूद आहे, अशा २८ नरकांत १) तामिस्त्र २) अंधसिस्त्र ३) रौवर ४) महारौवर ५) कुम्भीपाक ६) कालसूत्र ७) आसिपंवन ८) सकूरमुख ९) अंधकूप १०) मिभोजन ११) संदेश १२) तप्तसूर्मी १३) वज्रकंटकशल्मली १४) वैतरणी १५) पुयोद १६) प्राणारोध १७) विससन १८) लालभक्ष १९) सारमेयादन २०) अविची २१) अय:पान आणि याशिवाय २२) क्षरकर्दम २३) रक्षोगणभोजन २४) शूलप्रोत २५) दंदशूक २६) अवनीरोधन २७) पर्यावर्तन २८) सूचीमुख अशी ही नरककथा आहे. ज्यांना हिंदू राष्ट्र मनुस्मृतीवर आणायचे आहे, त्या मनूने आणि साक्षात गतीमध्ये या काही नरकांचा उल्लेख येत असतो.

शेवटी प्रश्न उरतोच न्यायमूर्तींनी नरकाचा विषय काढला आणि गोहत्येबद्दल नरक हे मुक्कामाचं ठिकाण ठरवलं. आता प्रश्न आहे तो ८४ लाखांपैकी कोणत्या नरकात कोण जाणार, हेही कधी तरी सांगायला हवे. माणूस ८४ लाख योनींतून प्रवास करत माणसापर्यंत पोहोचतो. हे सर्व नरक माणसांसाठीच आहेत, की ८४ लाख जीवांची सोय त्यात आहे, हेही अद्याप गुलदस्त्यातच आहे. कोणी तरी याचिका दाखल करेल, असे समजायला हरकत नाही.

## ऐकलंत का? चला, चला तिकडं हिंदू राष्ट्र जन्माला आलंय...

अगदी पुढच्या वर्षी भारतात हिंदू राष्ट्र जन्माला येईल, अशी आरोळी नागपूरमधील एकानं ठोकली असली आणि त्याकडे व्यवस्थेला सरकवले जात असले तरी तिकडे इक्वेडोर नामक देशाच्या एका बेटावर 'युनायटेड स्टेट्स ऑफ कैलास' या इंग्रजी नावाने एक हिंदू राष्ट्र स्थापन झाले आहे. अखंड हिंदुस्थानची हद्द फारफार अफगाण आणि रंगूनपर्यंत होती; पण एका पठ्ठ्याने ती इलॅस्टिकप्रमाणे ताणत नेऊन थेट इक्वेडोरपर्यंत पोहोचवली. इक्वेडोर भारतापासून फक्त सतरा हजार किलोमीटरवर आहे. विमानात कुणी लघुशंका करण्याची भानगड केली नाही तर सहा-सात तासांत विमान तेथे पोहोचते. इक्वेडोरच्या राष्ट्राध्यक्षाचा मृत्यू आकाशातल्या विमानाला झालेल्या अपघातामुळे घडला होता. तर या देशाच्या मालकीचे एक बेट घेऊन तेथे हिंदू राष्ट्राची स्थापना करण्यात आलीय. बीबीसीसारख्या विश्वासार्ह संस्थेसह अनेकांनी या नव्या राष्ट्राची माहिती दिलीय. अर्थात, हे स्वयंघोषित राष्ट्र आहे. त्याला कोणाची मान्यता नाही. युनोच्या एका समितीत जेथे कुणालाही बोलायची परवानगी असते तेथे कैलास राष्ट्राच्या महिला प्रतिनिधीने भाषण ठोकलंय. म्हणून या राष्ट्राला मान्यता मिळालीय, असं आपण समजायचं.



कट्ट्याच्या ताकदीवर आणि अल्पावधीत कथित हिंदू राष्ट्र स्थापन करणारा हा बहाद्दर कोण, असा प्रश्न सर्वांनाच पडणे स्वाभाविक आहे, तर त्याच नाव आहे स्वामी नित्यानंद. अर्थात, हे नाव ऐकताच अनेकांच्या कानावर येईल, की ज्याच्यावर अपहरणाचे, विनयभंगाचे, पिळवणुकीचे, फसवणुकीचे, अश्लील सीडी बनवण्याचे आरोप आहेत आणि जो तुरुंगात जाऊन जामिनावर सुटला तो हा नित्यानंद. ज्याने जगाचे लक्ष आपल्याकडे खेचून घेण्यासाठी आईन्स्टाईनचा सिद्धांत चुकीचा आहे, असा दावा केला. मग तो इतका महाशक्तीमान बनला, की तब्बल चाळीस मिनिटे आपण सूर्याला उगवण्यापासून रोखून धरले, असा दावा केला. अर्थात, सूर्य उगवत-मावळत नाही हे त्याला कोणी सांगितलं नसावं. आपली भुतांशी मैत्री आहे, आपण परग्रहावर पाणी शोधतोय, परग्रहावरचे लोक सॅटर्डे-संडे पिकनिकसाठी पृथ्वीवर येतात आणि आपण अल्पावधीत पाचशेपेक्षा अधिक ग्रंथ लिहिली आहेत, असे असंख्य दावे त्यांनी केले. चमत्काराच्या जोरावर शिष्यगण मिळवले. त्याच्या वेबसाईटवर गेल्यानंतर या साऱ्या गोष्टी याची देही याची डोळा कुणालाही वाचता येतील. अगदी विंचू तात्यालाही. एवढ्या वर्षात तो पाचशे तुकडे लिहू शकला नाही. पण हा... सदैव आनंदात राहणाऱ्यानं म्हणजे नित्यानंदानं मात्र पाचशे ग्रंथ लिहिल्याचा दावा केला. तामिळनाडूत एका गरीब कुटुंबात जन्मलेला मेकॅनिक अभियंता असलेला आणि अगदी तरुण वयात कर्नाटकात आश्रम स्थापन करून महागुरू बनलेला हा नित्यानंद. अवघ्या ४५ वर्षांचा आणि हिंदू राष्ट्राचा निर्माता बनू पाहणारा. माकडांना आणि अन्य चतु:स्पाद प्राण्यांना आपण संस्कृत आणि प्राचीन तमिळ भाषा शिकवतो. सूर्य रोखतो असा दावा करणाऱ्याला राष्ट्र स्थापन करणे म्हणजे कस्पटासमानच म्हणावं लागेल.

कैलास राष्ट्र हिंदू असल्याने तेथील सगळ्याच गोष्टी हिंदुत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या असतील, यात शंका नाही. हा देश लवकरच संयुक्त राष्ट्राचा सदस्य होईल, भारतातही राजनैतिक कचेरी सुरू करेल हे ओघानेच आले. धर्मांध, पागल काहीही करू शकतो. कैलास राष्ट्राच्या स्वतंत्र बँकेचे नाव असेल हिंदू गुंतवणूक. त्याची रिझर्व्ह बँकही असेल. ही बँक कोणत्याही राष्ट्राला आणि भांडवलदारालाही कर्ज देऊ शकते. भारतात विमा आणि बँकांनी अदानीला कर्ज दिलंयच की... येत्या गणेश चतुर्थीला नव्या राष्ट्राची नाणी जारी

करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, या हिंदू राष्ट्राची दोन चलने असणार आहेत. एक देशांतर्गत आणि दुसरा देशबाह्य. या राष्ट्राचा जन्मदाता आणि प्रमुख नित्यानंदच असणार हेही ओघाने येईल. खाजगी भूखंडावर उभे राहणाऱ्याला कैलास असं नाव असलं, तरी ते प्रत्यक्षात हिंदू राष्ट्र असणार आहे. तर नित्यानंदाच्या नित्य भानगडी ऐकून कंटाळलेल्या आम जनतेला ही नव्या देशाची नवी भानगड ऐकून कदाचित बरे वाटेल. सूर्य रोखणारा आता चक्क हिंदू राष्ट्र जन्माला घालतोय हे काय थोडं झालं? शेवटी धर्मांधतेकडे झुकवत नेल्या जात असलेल्या जनतेच्या मनात हे शक्य आहे का, असा प्रश्नही येणार नाही. बलात्काराच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या काही वेड्या, आंधळ्या शिष्यांनी आसारामसारख्या वासनांधाला अवतार समजलंच होतं की...

## स्त्री शक्तीच्या नावानं चांगभले चांगभले...



आपल्या देशात निम्मी शक्ती स्त्रियांची आहे. संख्येनं त्या निम्म्या आहेत. राजकारणातही त्या निम्मी शक्ती बाळगून आहेत. निम्म्या मतदार त्याच आहेत. स्वाभाविकच सारे राजकीय पक्ष या मतांवर डल्ला मारण्यासाठी नाना तऱ्हेचे डावपेच खेळत असतात. त्याला कोणताही पक्ष अपवाद असत नाही. भाजप त्यात आघाडीवर आहे. गेली दहा वर्षे चौकाचौकात सिलिंडरवाल्या महिलेबरोबर कारभाऱ्याचे फोटो कसे झळकतात हे आपण सारे पाहतोच. अर्थसंकल्प केंद्राचा असो, राज्याचा असो, झेडपी किंवा महापालिकेचा असो, त्यात महिलांच्या कथित उद्धारासाठी खूप जागा मिळताना दिसते. आता महाराष्ट्रात सादर झालेल्या अर्थसंकल्पातच पहाण्या सर्व योजना अतिशय आकर्षक आणि चुंबक बनून मते खेचणाऱ्या आहेत.

'लेक लाडकी' योजनेत मुलगी जन्माला आल्यापासून धनाची पेटी तिच्याभोवती जमा व्हायला लागते. ती जन्माला आली, की पाच हजार, शाळेत पाऊल ठेवले की चार हजार, सहावीत सहा हजार, अकरावीत आठ हजार आणि अठरात गेली, की पंच्याहत्तर हजार रुपये तिला मिळणार आहेत. म्हणजे जवळपास एक लाखाच्या घरात ही रक्कम जाते. अर्थात, अठरा वर्षानंतर. चकाकणारे पैसे पाहून कोणालाही आनंद वाटेल. पण काही प्रश्न उरतात. ते म्हणजे या पोरीला कोणत्या लायकीचे शिक्षण मिळणार, ती शिक्षणात टिकून राहण्यासाठी कोणते प्रयत्न होणार, अठरा वर्षांनी या पैशांची किंमत किती असणार, ही सर्व रक्कम मुलीच्या हातात जाईल की पालकांच्या, असे अनेक प्रश्न निर्माण होतात. अशा काही योजना यापूर्वीही सुरू होत्या. 'पहिली बेटी धनाची पेटी' असे तिचे नाव होते. नवी योजना त्यापेक्षा वेगळी आहे का आणि कशी, याचा खुलासा मायबाप सरकारने करायला हवा होता. दुसऱ्या एका योजनेद्वारे महाराष्ट्रातील महिलांना सरसकट पन्नास टक्के सवलत दिली जाणार आहे. एस.टी. महामंडळाच्या बससाठी ही सवलत असणार आहे. एवढी गब्बर सवलत असतानाही आपली जनता सरकारी दवाखाना, सरकारी शाळा, सरकारी बसमध्ये का जात नाही, हेही जनतेकडूनच सरकारने ऐकायला हवे होते. ज्यांना बसमध्ये सवलत नाही, असा खूप कमी वर्ग शिल्लक आहे आणि मुळातच त्याला या प्रवासाशी देणेघेणे नाही. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात चाळीस-पन्नास टक्के वाढ आहे. पण हेही खरे आहे, की महागाई दोनशे टक्क्यांनी वाढली आहे. या महिलांना मानधनाशिवाय अन्य कसल्याही सुरक्षितता नाहीत. आपल्या पांढऱ्या हत्तींना दीड-दोन लाखांची पेन्शन आणि छोट्या पोरांसमोर रांगून रांगून शिकवणाऱ्यांचे वेतन फक्त पाच हजार रुपये. कोणती न्यायाची कल्पना बाळगून सरकारने हा निर्णय घेतला आहे, हे समजायला मार्ग नाही. महिलांचे मासिक २५ हजार रुपयांचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. खरे तर, वाढत्या महागाईत या २५ हजारालाही काही अर्थ उरलेला नाही. झोपडपट्टीत जगणाऱ्या बाईलाही आपले कुटुंब व्यवस्थित जगवण्यासाठी खूप काही कमवावे लागते. ते कमवण्याची संधी, व्यवस्था सरकार करणार नाही. माता सुरक्षित योजनाही अशीच नुसती चकाकणारी आहे. मोठ्या आवाजात, टाळ्या घेत करण्यात आलेल्या घोषणा कदाचित मते खेचतीलही; पण महिलांचा समग्र विकास करण्यात त्यांची काही भूमिका असणार नाही. आपल्याकडे रोजगाराच्या काळात मासिक पाळीमुळे तो बुडू नये म्हणून हजारो ऊसतोडणी महिला कामगारांनी आपली गर्भाशये काढून टाकली आहेत. काही जणी दगावल्या आहेत. त्यांची गर्भाशये सुरक्षित रहावीत म्हणून सरकारकडे काहीच नाही. नोकरदार महिलांच्या सवलती कष्टकरी महिलांना नाहीत. महिला म्हणून सर्वांचे काही प्रश्न समान आहेत; पण विकासाच्या बाबतीत भेदभाव आहे. नोकरदार महिलांना बाळंतपणाच्या रजा ज्या द्यायलाच पाहिजेत; पण कष्टकरी महिलांच्या वाट्याला असे का येत नाही? खेड्यापाड्यातल्या महिलांसाठी मुळातच चकाकणाऱ्या योजना जाहीर होतात. त्यांचा आढावा घेण्याची, त्या फलदायी ठरल्या की नाही, हे पाहण्याची व्यवस्था सरकारकडे नसते. निकोप अंमलबजावणी नसते. निवडणुकीने बांग दिली, की योजना बाहेर पडतात. ●●●

**– तात्या विंचू**

कविता

# मनोहरा!

तुझ्या पेटलेल्या मनाला,
अपूर्व क्रांती झालेल्या तुझ्या प्रज्ञे-
ला आणि
जळून राख झालेल्या हृदयाला
तुझ्या
मी समजावू तरी कसे?

आभाळ झालेले तुझे बालपण
आणि फाटक्या वस्त्यांमधून
वाहणारे अश्रूंचे महापूर
तुझ्या कोवळ्या हृदयाला
भेगा पाडत होते...

होताच जाणिवा संवेदनशील
तुझ्या,
तुझे मन अण्वस्त्र होण्याच्या
तयारीत होते.
या अमानुष
विषमतावादी व्यवस्थेला
ते हिरोशिमा, नागासाकीप्रमाणे
बेचिराख करू पाहत होते...

पण मनोहरा !
अपार करुणेने
भरलेले तुझे हृदय
मानवतेकडे झेपावत होते...

ज्या ज्या चिल्यापिल्यांना तू
हृदयात घेतले,
त्या सर्वच पिलांना आता
मानवी क्रांतीचे पंख लाभले.

तुझ्या प्रज्ञेने जे जे प्रज्वलित झाले
ते सारेच
आज उजेडमय झाले.
करोडो आयुष्यांचे मोल
तुझ्या एकट्या जीवनाला
लाभले आहे

काल घनघोर अंधारांनी
माखलेले तुझे सर्व शिष्य
आज प्रकाश झाले आहेत

– विक्रम जाधव
झरंडी, जि. अकोला

# आम्ही डोंगरासाठी लढतो तेव्हा..

आम्ही बसलो आमचे अस्तित्वाशी जुळलेले डोंगर
वाचवण्यासाठी ठिय्या देऊन तर
पोलिसांनी घेरून घेतले आम्हाला
दुसऱ्या दिवशी त्यांचे 'साहेब'ही येऊन गेले
आणि म्हणाले,
डोंगराखालच्या लोखंडाचे सोने होईल
तुमच्या पोराबाळांना नोकऱ्या मिळतील
शहरासारखं चकचकीत होईल
हे जंगलातील गाव
एकूण काय आपला 'विकास' होईल.

आम्ही नाही भाळलो त्यांच्या शब्दांवर
दुसऱ्या दिवशी झुंडीने पोलीस आले
दंडा उगारून हुसकावू लागले.

काल साहेबांनी 'विकास' होईल आणि 'लोखंडाचे सोने' होईल त्याचे काय!
ठिय्या देणाऱ्या गर्दीतील एक माणूस हळूच कानाजवळ येऊन म्हणाला.
पुढे
गर्दीतील तो माणूस असेही म्हणाला,
नियामगिरीचा लढा आठवतो का !
किंवा
आताच आलेला
'जयभीम' पाहिलास का !

– प्रभू राजगडकर

# ऊर्जेचे वेल्हाळ

ऊर्जेचे वेल्हाळ स्वत:भोवती लपेटून घेणाऱ्या
एक सूर्यकुलीन ऊर्जेचेच नाव
आंबेडकरी क्रांतीसंस्कृतीचा आराखडा
मांडणाऱ्या शिल्पकारांचे गाव

माणसांच्या जगण्याचे विश्वसौंदर्य
सतत लिहीत राहणारे हात
वाताहतीचे हात हातात घेणारी
साहित्यसृष्टीची नवी प्रभात

बाबासाहेबांपासून बाबासाहेबांपर्यंत
धावणारी नक्षत्रांची वेल
दारात उगवलेल्या चांदण्यांची आणि
पर्यायांची रेलचेल

सौंदर्यशास्त्राचा आदिबंध बांधणाऱ्या
बहिणींचा आणि भावांचा सरनामा
अंधाराच्या कारागृहात अडकलेल्या
तुरुंग तोडणाऱ्या उठावांचा जमानतनामा

सेक्युलर संस्कृतीच्या संग्राम साहित्याचे
गगनाध्यक्ष
इहवादी तत्त्वप्रांतातल्या उजेडाच्या भाषणांचे
राज्याध्यक्ष

संविधाननिष्ठ आंबेडकरी चळवळीचे
क्रांतिकारी विश्वभाषण
बाबासाहेबांच्या पायथ्याशी उभे राहून
सूर्यप्रकाशाशी संभाषण

बाबासाहेबांच्या बुद्ध जयंती सोहळ्याचे
सारसूत्र
जीवनवृत्ती संघाच्या छाताडावर नाचणारा
भीमपुत्र
मनोहरी साहित्यसभेचे संग्रामनायक
युगसाक्षी प्रज्ञाप्रतिभेचे मंगल दायक
आसवांच्या मातृभाषेचे सुश्राव्य गायक
वणव्यातील तगमग, तडफडीचे वाहक

उकळता तडफता लोकांना सत्य सांगणारा शब्द
लोकांना अप्रिय आणि कडू विचार सांगणारा,
जबाबदार करणारा इहवादी आवाज
मानवमुक्तीचा भारतीय विचारप्रबंध डोक्यात
घेणारा सौंदर्यसिद्धांत

सममूल्यतेसाठी चाललेली अखंड धडपड
सलोख्यासाठी आकांत मांडणारी निरंतर तडफड
सूर्याच्या नव्या पालवीतून उगवणारी
नव्या शब्दांची पहाट
नव्या प्रतिभांना जगवणारी
आपल्यासोबतच नेऊन भीमसागर होणारी लाट

आंबेडकरी साहित्याच्या संवर्धनाची आणि
नवनिर्माणाची कार्यशाळा
बुद्धत्वाच्या अखिल लोककल्याणकारी
हितसंबंधांसाठीची युद्धशाळा

आंबेडकरी सूर्यकुळातील सूर्यकवी
क्रांतिकारी पुनर्रचनेचा तत्त्वसिद्धांत मांडणारा
नव्या सूर्यपालव्यांच्या सर्जनऊर्जेवर
साहित्यसौंदर्याचे पहाटपण लिंपणारा

आणिक दोन दशके किमान करावे चैत्यचिंतन
सूर्यसंस्कृतीचे आम्हा सूर्यभान देणारे चैत्रलेखन
शताब्दी साजरी करू द्यावी आपल्या भोवती
पसरलेल्या ऊर्जेच्या वेल्हाळाला अभिष्टचिंतन

प्रेम आणि अंतहीन करुणेच्या आयुष्याची
हेडलाईन
एका हाताने ज्वाळांच्या मिठ्या सोडवत, दुसऱ्या
हाताने सूर्यप्रतलावरची साईन

शब्दांच्या या अफाट यशवंत महासागरास
युनिव्हर्सल अभिवंदन!!!

– प्रज्ञाधर ढवळे, नांदेड

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी **"द पीपल्स पोस्ट"** चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक - ४) / (६ महिने - २)

**चेक किंवा डीडी ने पेमेंट**

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ---------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------------------------ पत्ता : ------------------------------

------------------------------------------ शहर : ------------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------ फोन नं. (घर) : ----------------------

मो. नं. : ------------------------ इ-मेल : ----------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

www लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

